
साप्ताहिक

# माणूस

२ ऑक्टोबर ८२, दोन रुपये

## उंबरठा.....
## जब्बारचा?
## स्मिताचा?





शांततेसाठी अणुबॉंब/ फसवणूक/ विरोधाभास/ नैतिक अधिष्ठान नाही/

वाचक चर्चा

संगमनेर

पोलीस अधिकाऱ्यावरचा खटला.

'घटना' काय सांगते?

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : बाविसावे

अंक : सतरावा

२ ऑक्टोबर १९८२

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

अनंत सालकर

¤

## निसर्गाच्या सान्निध्यात

# ' स्नेहसेवा ' शिबिर-परिसर

रोज स्थापन होणाऱ्या नवनवीन संस्था आणि त्यांचे अभिनव उपक्रम हे पुणे शहराचे वैशिष्ट्य आहे. ' स्नेहसेवा' ही आहे अशीच पुण्यात या वर्षी स्थापन झालेली एक नवीन संस्था. संस्थेने हाती घेतलेला उपक्रमही खरोखरच अभिनव आणि अतिशय स्वागतार्ह असा आहे. पुण्यापासून २५ कि. मी. अंतरावरील खानापूरच्याजवळ संस्थेनं एक कायम स्वरूपाचा शिबिरपरिसर विकसित केला आहे. येत्या रविवारी, तीन ऑक्टोबरला पुण्याचे महापौर श्री. विठ्ठलराव लडकत यांच्या अध्यक्षतेखाली शिवशाहीर श्री. बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते या सुसज्ज शिबिरपरिसराचे उद्घाटन होणार आहे.

ज्या ठिकाणी हा शिबिरपरिसर कॅम्पिंग साइट स्थापन करण्यात आला आहे, तो अतिशय निसर्गरम्य परिसर आहे. पुणे पानशेत-रस्त्यावर, खडकवासला धरणाच्या वरच्या अंगास एका उंचटचावर हे ठिकाण आहे. चहू बाजूंनी डोंगर, त्यात एका बाजूला सिंहगड, दुसऱ्या बाजूला खडकवासला धरणाच्या शेपटाकडचा विस्तीर्ण जलाशय पसरलेला आणि पुन्हा त्याही पलीकडे दिसणारे निळे डोंगर. इथे शिबिरासाठी येणारी शाळेतील मुले हा परिसर पाहूनच खूष व्हावीत, नव्हे होतात असा अनुभव आहे. कारण यापूर्वीच, इथे तंबु-राहुटया ठोकून चार शिबिरे पार पडली आहेत. इथल्या मोकळया वातावरणाचा, भन्नाट वाऱ्याचा आणि खुणावणाऱ्या डोंगरांच्या रागडया संगतीचा मनमुराद आनंद या मुलांनी लुटला आहे आणि शिबिरासाठी पुन्हा पुन्हा इथे यायला ही मुले उत्सुक आहेत.

याच परिसरात १९७६ च्या डिसेंबरमध्ये ' रोटरॅक्शन ७६ ' या पुण्यात भरलेल्या शिबिरातील युवकांनी श्रमदान केले होते. त्या वर्षीच्या जूनमध्ये झालेल्या तुफानी पावसाने या भागातील शेतांच्या जुन्या मोठमोठ्या बांधांना भगदाडे पडली होती; ती बुजविण्यासाठी आणि हरिजनवस्तीकडे जाणारा रस्ता करण्यासाठी हे श्रमदान होते. या ठिकाणी एक कायम स्वरूपाचा शिबिरपरिसर तयार करावा अशी कल्पना श्री. श्यामराव गोडबोले यांच्या मनात तेव्हापासून घर करून राहिली होती. तेव्हा ते रोटरीचे सदस्य होते; परंतु दरवर्षी बदलणारे नवे पदाधिकारी आणि त्यांचे कार्यक्रम यामुळे रोटरीच्या माध्यमातून ही कल्पना प्रत्यक्षात आणणे त्यांना शक्य झाले नाही. मात्र आता श्री. बबनराव साठे, सौ. लताबाई परांजपे, रमेश जोशी, श्री. प. दि. सोहोनी या व अन्य माजी रोटेरियन असलेल्या सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी ही कल्पना प्रत्यक्षात आणली आहे. खानापूर येथे सह्याद्री विकास मंडळाच्या माध्यमातून गेली अनेक वर्षे सामाजिक काम करणारे डॉ. गोपाळराव मोडक यांनी जेव्हा ही कल्पना ऐकली तेव्हा या कामासाठी मंडळाची सहा एकर जमीन त्यांनी लगेचच देऊ केली. आता या जागेमध्ये एक प्रशस्त शेड उभी करण्यात आली आहे. त्या शेडमध्ये २८'×२८' चे एक प्रशस्त सभागृह आहे आणि त्याच्या चारी बाजूंनी ऐसपैस व्हरांडे आहेत. एका वेळी शंभर मुलांचे निवासी शिबिर घेण्यासाठी आवश्यक त्या सर्व किमान सोयी या ठिकाणी करण्यात आल्या आहेत. स्वैपाकासाठी आवश्यक ती भांडी, जळणाची सोय, संडास-मोऱ्यांची व्यवस्था, विजेचे दिवे या सर्वांचा त्यामध्ये समावेश आहे. झोपण्यासाठी आपापला बाडबिस्तरा मात्र शिबिरार्थींना घेऊन यावा लागेल. राहण्यासाठी शेडशिवाय तंबूही मिळू शकतील. जादा सुखसोयी करण्याचे मात्र इथे कटाक्षाने टाळण्यात आलेले आहे. इथे शिबिर घेणाऱ्या संस्थेला एका दिवसासाठी किमान शंभर रुपये शुल्क द्यावे लागेल. यामध्ये

जास्तीत जास्त पन्नास विद्यार्थ्यांची व्यवस्था होऊ शकेल. त्यापेक्षा संख्या जास्त असल्यास जादा विद्यार्थ्यांमागे दर दिवशी माणशी दोन रुपये अधिक द्यावे लागतील. जेवणासाठी जो शिधा लागेल त्याचा खर्च त्या त्या संस्थेने करायचा आहे. सह्याद्री विकास मडळाचे एक कार्यकर्ते श्री. निळूभाऊ भिडे यांनी या परिसराच्या देखभालीची जबाबदारी आनंदाने स्वीकारलेली आहे.

मुला-मुलींना निसर्गाच्या सान्निध्यात; खुल्या पण स्वयंशिस्तीच्या वातावरणात राहता यावे; सामूहिक जीवनाचा त्यांना अनुभव मिळावा; त्यांनी स्वत:च्या हातांनी श्रमाची कामे करावीत; भोवतालचे ग्रामीण समाजजीवन जवळून पाहावे, त्यात बदल घडविण्यासाठी आखलेल्या योजनांत सहभागी व्हावे आणि या सर्वांशी आपले काही जवळचे नाते आहे, ही भावना मनात ठेवून परत जावे या अपेक्षेने 'स्नेहसेवा'ने या शिबिर-परिसराची योजना केलेली आहे. इथे येणाऱ्या शिबिरार्थीकडून 'स्नेहसेवा'ची आणखी एक अपेक्षा आहे. या भागातील बराचसा भाग झाडे तुटल्याने उजाड झाला आहे. तो पुन्हा हिरवागार करण्याचा 'स्नेहसेवा'चा संकल्प आहे. वनखात्याने त्यासाठी सर्वतोपरी सहकार्य देऊ केले आहे. सध्या जंगलखात्याच्या दहा एकर जमिनीत झाडे लावण्याची मुभा त्यांनी 'स्नेहसेवा'ला दिली आहे. 'स्नेहसेवा' शिबिर-परिसरात होणाऱ्या सर्व शिबिरांमध्ये या जागेत शिबिरार्थींनी झाडे लावण्याचा एक कार्यक्रम करायलाच हवा अशी 'स्नेहसेवा'ची अट आहे.

'स्नेहसेवा' शिबिर-परिसरात शिबिरे घेण्याच्या योजनेला पुण्यातील शाळांकडून चागला प्रतिसाद मिळाला आहे. शालेय अभ्यासक्रमात 'समाजसेवा' या विषयाचा अलीकडे समावेश करण्यात आला आहे व प्रत्येक शाळेने दरवर्षी दोन-तीन दिवसांचे एक समाजसेवा-शिबिर घ्यावे अशी शासनाची अपेक्षा आहे सध्या संयोजनातील अनेक अडचणींमुळे बहुतेक शाळा ही शिबिरे घेऊ शकत नव्हत्या. आता 'स्नेहसेवा'च्या शिबिर-परिसरामुळे ते शक्य होईल.

परिसरातील खेड्यातील लोकांनाही हे केंद्र आपले वाटावे या दृष्टीनेही काही उपक्रम करण्याचे स्नेहसेवाने ठरविले आहे. त्यामध्ये या खेड्यांतील शाळांसाठी विनाशुल्क शिबिरे घेण्याची एक योजना आहे. त्याशिवाय या गावांच्या विकासातील अडचणी सोडविण्याच्या दृष्टीनेही काही प्रयत्न करण्यात येणार आहेत. इथे होणारे प्रत्येक शिबिर त्यामध्ये सहभागी होईल अशी अपेक्षा आहे. इथे होणाऱ्या शिबिरामध्ये विविध विषयांवर व्याख्याने देण्यासाठी येण्याचे अनेक क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींनी मान्य केले आहे. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, गिरिभ्रमण, पक्षी-निरीक्षण यांसारखे छंद जोपासणारे तरुण, सामाजिक कार्यकर्ते या सर्वांनाच हा शिबिर-परिसर उपयुक्त ठरेल. पुढे मागे याच ठिकाणी एक वनस्पतिशास्त्रीय उद्यान वा संग्रहालय इथे येणाऱ्या शाळेतील मुलांच्या मदतीनेच उभारावयाचीही योजना आहे. शहरांपासून दूर जाऊन, तीन-चार दिवस निसर्गाच्या सान्निध्यात राहू इच्छिणाऱ्या कुटुंबासाठी किमान सोयींनी युक्त अशी छोटी-छोटी काही घरकुलेही बांधण्याची कल्पना आहे. या घरकुलाचा लाभ घेणेही निश्चितच अनेकांना आवडेल. या सर्व योजनेमागे 'स्नेहसेवा'ने पैशाचे पाठबळ कसे उभे केले असा प्रश्न साहजिकच आपल्या मनात येईल. आतापर्यंत या योजनेसाठी दीड लाख रुपये खर्च झाले आहेत. बँकेचे कर्ज व या योजनेत सध्या पुढाकार घेणाऱ्या कार्यकर्त्यांनी आपल्या खिशातून घातलेले काही हजार रुपये यातून सध्या हा भाडवली खर्च करण्यात आला आहे. देणग्या जमवून बँकेचे कर्ज फेडावे व शिबिर-शुल्कातून नित्याचा खर्च भागवावा अशी कल्पना आहे. सपर्क : श्री. बबनराव साठे, ११२३/अ. शुक्रवार पेठ, पुणे २.

—अनिल काळे, ग्रामायन

मुंबई वार्ता

# महानगरी : व्यवस्थापनापलीकडे

माणसं मुंबईच्या अगदी प्रेमात तरी असतात, नाही तर अगदी शत्रुत्वात तरी. मुंबईबद्दल निर्विकार असलेला मनुष्य-प्राणी एकूण विरळाच. 'सुंदर मुंबई', 'हरित मुंबई' वगैरे घोषणा अधून-मधून केल्या जातात खऱ्या; पण प्रत्यक्षात मुबईत रहाणं अधिकाधिक कष्टाचं होत चाललं आहे, हा अगदी मुंबई-प्रेमिकांचाही अनुभव आहे. ऐतिहासिक महत्त्व असलेली, व्यापारीदृष्ट्या सोईची आणि झाडा-माडांच्या गर्दीत विसावलेली ही मुंबई; पण दिवसेंदिवस तिचं सौंदर्य आणि शातता, सोइस्करपणा इतिहासजमा होत चालला आहे.

मुंबईच्या या दुर्दशेचं प्रमुख कारण तिची वाढती लोकसंख्याच आहे, हे तर कुणीही सांगू शकेल. ८२ लाखाची ही अजस्त्र महानगरी दिनीप्रतिदिनी अधिकच विस्तारते आहे. रोज निदान पाच-एकशे माणसं इथे येऊन डेरेदाखल होतात आणि मग या साऱ्यांची वीज, पाणी, सुरक्षितता, सर्वसामान्य सुखसोई, आरोग्यसेवा याची जबाबदारी आपसूकच महापालिकेवर पडते. ताळतंत्र बसवायला कठीण असं हे काम महापालिका कसं चालवते? देशाच्या केवळ १·२% लोकसंख्या आणि जवळजवळ ३३% उत्पादन. (तरीही कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी मुदतबंद ठेवीतून पैसे काढायची वेळ यावी, अशी ओढाताण!) तेव्हा मुबईचं व्यवस्थापन एखाद्या अतिभव्य, गुतागुतीची उलाढाल करणाऱ्या कपनीसारखं असलं पाहिजे.

'बॉम्बे मॅनेजमेंट असोसिएशन'नं 'मॅनेजिंग द सिटी' या विषयावर नुकताच एक परिसंवाद आयोजित केला होता. योगायोग असा की, महापालिकेच्या सेवकवर्गाच्या संपाच्या नेमक्या पहिल्याच दिवशी तो घडून आला. या संपाचा संदर्भ ताजा. तशात आयोजन करणारे आणि परिसंवादात भाग घेणारे दोघेही प्रस्थापित व्यवस्थापकवर्गातले. त्यामुळे एकूण सारी चर्चा किंवा भाषणं कामगार-विरोधी, जनताविरोधी सूर लावूनच झाली; पण एका प्रतिष्ठित सस्थेमध्ये, *सुजाण नागरिकांसमोर* बोलायचं असल्यामुळं महापालि-

केच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जबाबदारीनं उत्तरं दिली काहीजणांच्या बोलण्यातून नुसतीच आकडेवारी मिळाली. काहींनी अधिक विधायक माहिती दिली. बहुतेक सगळी भाषणं संपली ती मात्र जनतेचं अधिक सहकार्य अपेक्षित आहे याच सुरावर.

मुंबईच्या पाणीवाटपाबाबत हैड्रॉलिक इंजिनियर के. डी. मुळेकर बोलले. मुंबईची पाणीवाटपयंत्रणा आणि व्यवस्था १२० वर्षे वयाची आहे. ८ लाखांच्या लोकव्यवस्थेला ७ ते ८ मिलियन गॅलन पाणीपुरवठा करणारी ही व्यवस्था आज ८२ लाखांच्या वस्तीला ४५० मिलियन गॅलन इतका पाणीपुरवठा करते आहे यामध्ये लोकसंख्या वाढली हे तर खरंच; पण उद्योगधंदेही वाढले. दरडोई पाण्याचा वापर वाढला म्हणजे पाण्याची मागणी वाढली. पुरवठ्यात मात्र अशी ताबडतोब वाढ कधीच शक्य नसते. मुंबईत चार ठिकाणी पाण्याचे साठे आहेत; पण असे साठे बांधण्याची किंमत दिवसेंदिवस वाढत चालली आहे ज्या वैतरणाच्या बांधकामाला वीस कोटी रुपये पडले, तिची किंमत आज ३०० कोटींच्या घरात जाईल! दुसरी अडचण म्हणजे पाणी–वाटपात येणारी असमानता. पण आता याला तरी आम्ही काय करणार? १९६०–७० नंतर दक्षिण मुंबईच्या मानानं उत्तर मुंबईची, उपनगरांची लोकसंख्या, पाण्याची गरज अतोनात वाढली. त्यामुळे पाणीवाटपात असमतोल आला. याशिवाय आमचं चोरून घेतलं जाणारं पाणी ही डोकेदुखी आहेच.

आणि आता नागरिकांबद्दल तक्रार. गळके नळ, मोडके आणि मोड घातलेले पाण्याचे पाइप्स या गोष्टी इमारतीचे मालक किंवा भाडेकरू स्व–खर्चानं दुरुस्त करत नाहीत; त्यासाठी ते महापालिका–कर्मचाऱ्यांची वाट बघत बसतात आणि असे कर्मचारी (ज्यांचं किमान दरमहा वेतन ६५० रुपये मोजावं लागतं!) संख्येनं कमी असतात. त्यामुळं नादुरुस्ती चिघळत जाते आणि गिरगाव नाही तर महेश्वरी उद्यान–प्रकरणांसारखा त्यांचा स्फोट होतो.

नंतर बोलले सिटीइंजिनियर एस. एम. परुळकर. त्यांनी मुख्यतः रस्ते आणि वाहतूक समस्येवर लक्ष केंद्रित केलं होतं. मुंबईच्या रस्त्यांवर होणारी वाहतूक इतकी बहुविध असते की, तिचं नियमन आणि तिच्या गरजेप्रमाणे रस्ते बांधणं फार कठिण जातं. मर्सिडीजपासून व्हिक्टोरिया-बैलगाडीपर्यंत आणि ट्रकपासून हातगाडीपर्यंत सगळी वाहनं असणाऱ्या वाहतुकीसाठी कसे आणि किती रस्ते बांधावेत?

मुंबईच्या पूर्व–पश्चिमेला जोडणारे रस्ते केवळ आठ आहेत. या रस्त्यांमध्ये वाढ झाली, तर वाहतुकीस बरीच शिस्त आणि सोय होईल; पण हे काम पूर्ण व्हायला १५–२० वर्षं तरी लागतील. त्याला खर्चही बराच येईल आणि रेल्वेमार्ग ओलांडून हे पूल बांधायचे म्हणजे त्याला रेल्वेप्रशासनाची संमती हवी, निम्मा खर्चही त्यांनी करायला हवा.

शासकीय लाल फीत या गोष्टींना किती दिरंगाई करू शकते? परुळकरांनी स्वतःच याचं उदाहरण दिलं. वडाळा रेल्वेमार्ग ओलांडून जाणारा पूल बांधायला तब्बल दहा वर्षं लागली! कारण महापालिका, मध्यरेल्वे; पोर्ट ट्रस्ट यांच्यातला पत्रव्यवहार मुळी आटपता आटपेना! याशिवाय एका खात्यानं नवा रस्ता बांधावा आणि दुसऱ्याच दिवशी टेलिफोनवाले, सांडपाणीवाले, वीजवाले, पाणीवाले अशा कोणी तरी तो येऊन उकरावा हाही नित्याचा प्रकार आहे. श्रम, वेळ, पैसा याची उधळपट्टी आणि गैरसोयीचा हा प्रकार घडतो. कारण दोन खात्यांच्या कारभारात एकसूत्रीपणा नसतो. आता मात्र यासाठी समित्या स्थापन होताहेत. नाही तर या वर्षी ४०००० नवे टेलिफोन्स दिले जाणार, म्हणजे त्या प्रमाणात रस्त्यांना खड्डे पडणार हे आत्ताच सांगितलेलं बरं! भरपूर पाऊस आणि सततची वाहतूक यामुळंही रस्त्यांची दुर्दशा होते. शिवाय आपल्याकडे तयार होणारी खडी मऊ असते. तिचे रस्ते टिकत नाहीत आणि काँक्रिटची टंचाई, अशी रस्त्यांची कथा आहे.

सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटचे चेअरमन एफ. ए. अत्तरवाला यांनी आपल्या भाषणात बराच सुगंध पसरला. (इति चीफ फायर ऑफिसर मेहरवानजी!) मुंबईची वसती तिच्या कचऱ्याच्या सहाय्यानं कचऱ्याची भर टाकून जमीन निर्माण करून झाली आहे. आज मात्र ती आपल्याच कचऱ्यात बुडून जाईल की काय अशी धास्ती निर्माण झाली आहे. मुंबईत रोज ३५०० टन कचरा निर्माण होतो आणि १६ ते १८००० माणसं ७०० वाहनांच्या सहाय्यानं दिवसातून एकदा, दोनदा किंवा तीनदा तो हलवतात. म्हणजे साधारण पाचशे माणसांमागे एक सफाई-कामगार झाला. (संपाच्या संदर्भात आमचा ५० टक्के खर्च कामगारांवरच होतो.) कचरा विभागाचं काम कितीही साफसूफ असो, त्यावर शिंतोडे उडवल्याशिवाय कोणी रहात नाही, पण आमचे कामगार संपावर असतात तेव्हा बघा काय परिस्थिती होते ती! तेव्हा या शहराची स्वच्छता एरवी राखली जाते याला तोच पुरावा आहे! सकाळी ८–८॥ च्या सुमाराला मुंबईतले सगळे रस्ते झाडून स्वच्छ केलेले असतात; पण ९–९॥ ला दुकानं उघडतात आणि त्यांची साफ–सफाई होते, तेव्हा परत एकदा रस्ते घाण होतात! म्हणजे अर्थातच उपाय एकच-जनतेचं सहकार्य! या शहरात साधारण ५००० कचराकुंड्या आहेत; पण कचरा कुंडीत पडण्यापेक्षा बाहेरच पडलेला असतो!

कचऱ्याची वाहतूक आणि विल्हेवाट ही आणखी मोठी समस्या. वाहनं अपुरी. भरवस्तीत वाहनांसाठी गॅरेज बांधायची परवानगी जनतेकडून मिळत नाही. तसा कचरा टाकण्याचा डेपो आपल्या घराजवळ असू नये असंही वाटतं; पण शहर एवढं आडवं-तिडवं पसरतं आहे, की कचरा शहराबाहेर म्हणजे


वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

मूल्य : रुपये पंधरा

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पुणे ३०

कुठे टाकायचा ? कचऱ्याचं इन्सिनरेशन करणं किंवा तो जाळणं, याला दर टनामागे १०० रु. आणि ३ रु. अनुक्रमे खर्च येईल. हे बरेच खर्चिक आहे. त्यापासून खतं करायची, तर पुरेशी यंत्रणा नाही व त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचा कचरा निराळा ठेवला जायला हवा, तसाही तो नसतो. युरोपियन राष्ट्राप्रमाणे कचऱ्यापासून ऊर्जा निर्माण करणं आपल्याला शक्य नाही त्यांच्या कचऱ्यात ५०%कागद असतो आणि पत्र्याच्या डब्यापासून ते टेलिव्हिजनपर्यंत सगळं कचऱ्यात जातं. आपल्या कचऱ्यात ५% कागद असतो आणि ६० ते ७०% गोष्टी दमट असतात. तेव्हा कचऱ्याच्या समस्येला नजीकच्या भविष्यात काही उत्तर दिसत नाही.

चर्चेच्या शेवटी पालिकाआयुक्त द. म. सुकथनकरानी श्रोत्यांच्या प्रश्नाना आणि शंकांना उत्तरं दिली.' पालिकेच मुख्य ऑफिस मुंबईबाहेर हलणार का ?

नाही. मात्र ते वांद्रयाला हलणार आहे.

पदपथ-विक्रेत्याचा पादचाऱ्यांना अतोनात उपद्रव होतो. त्यासाठी काही करता येणार नाही का ?

. अधिकृत पदपथ-विक्रेते फक्त ३०००० आहेत. उरलेले सगळे एक-दीड लाख अनधिकृत. त्यांच्या बंदोबस्तासाठी कायदा अपुरा पडतो आणि पालिकेची यंत्रणा देखील. तेव्हा लोकांनी त्यांच्याकडून काही खरेदी न करणं हा सर्वांत उत्तम उपाय.

यानंतर बहुधा व्यवस्थापनक्षेत्रातल्या कुणाकडून तरी आलेला प्रश्न.

पालिका कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता पातळी कशी आहे ? यासंबंधी काही पहाणी केली जाते का ?

अशी पहाणी करण्याची महापालिकेत प्रथा नाही; पण नवीन खर्च, भरती करताना प्रॉडक्टिविटी डिपार्टमेंटचा सल्ला घेतला जातो. पण माझं वैयक्तिक मत विचाराल, तर त्याची कार्यक्षमता अगदी कमी आहे. कामावर निष्ठा नाही आणि उधळमाधळ बरीच चालते

पण या उधळमाधळीत एकट्या कर्मचाऱ्यांचाच भाग असतो काय ? अधिकारीवर्ग हा प्रशासनाचा भाग समजला जातो. हे अधिकारी आपली कामावर निष्ठा असण्याचा निःसंशय पुरावा देऊ शकतील काय ? पदपथ-विक्रेत्यावर घातल्या जाणाऱ्या धाडीचा त्यांना आधीच पत्ता लागतो, असं आयुक्त म्हणतात. हा पत्ता कुठून झिरपत खाली येतो ? किमान या गोष्टी तरी कडक अंतर्गत शिस्त आणि व्यवस्था ठेवून टाळता येतील आणि निदान इथे तरी अधिकारीवर्ग नक्कीच काही करू शकेल. त्याचबरोबर एवढ्या श्रीमंत शहराच्या पालिकेवर अशी कंगाल परिस्थिती का आली याचाही खुलासा व्हायला हवा.

अर्थात आपल्यावरची जबाबदारी टाळणं हा मार्ग नव्हे आणि लोकशाहीतले सुबुद्ध नागरिक या गोष्टी कोणी तरी घडवून आणेल म्हणून स्वस्थही बसून राहू शकत नाहीत. शासन आणि नागरिक या दोहोंच्याही सहकार्यानंच शहराचं व्यवस्थापन सुरळीत चालू शकेल. टेनिसच्या खेळातल्याप्रमाणे, चेंडू आता तुमच्या बाजूला आहे, असं म्हणून जबाबदारीची टोलवाटोलवी करून मात्र हाती काही लागणार नाही !

—ललिता बर्वे

## स्वा. सावरकर जन्मशताब्दि निमित्ताने—कथालेखन-स्पर्धा

श्रीमती लीलाताई आगाशे यांच्या सौजन्याने आणि 'मुंबई व्यासपीठ' व 'हिंदु विद्यार्थी सभा' यांच्या सहकार्याने नंदादीप समिती कथालेखन-स्पर्धा आयोजित करीत आहे.

**स्पर्धेचे स्वरूप व नियम :—**

१) स्पर्धेचे नियम मान्य असलेल्या कोणत्याही व्यक्तीस या स्पर्धेत भाग घेता येईल.

२) कथा विषय—स्वा. वि. दा. सावरकर याच्या जीवनातील कोणताही प्रसंग.

३) स्पर्धा ३ वयोगटात घेण्यात येईल.

| गट क्र. | वयोमर्यादा | शब्दमर्यादा | प्रवेशमूल्य |
|---|---|---|---|
| १ | ११ ते १६ | ८०० ते १००० | रु. ३/— |
| २ | १७ ते २४ | १००० ते १५०० | रु. ५/— |
| ३ | २५ च्या वर | १००० ते १५०० | रु. ५/— |

४) स्पर्धेचे प्रवेशमूल्य कथेबरोबरच पोस्टल ऑर्डरने 'नंदादीप समिती' या नावे पाठवावे.

५) पारितोषिकासाठी कथेची निवड करताना प्रसंगाची निवड, लेखनशैली, कथेची मांडणी आणि प्रचलित नियमाप्रमाणे शुद्धलेखन याचा प्रामुख्याने विचार केला जाईल.

**पारितोषिके :—**

गट क्र. १ — प्रथम क्रमांक रु. ५१/— द्वितीय क्रमाक रु. ३५/—

गट क्र. २ व गट क्र. ३ — प्रथम क्रमाक रु. १०१/— द्वितीय क्रमाक रु. ७५/— प्रत्येकी

अध्यक्ष
**श्रीमती लीलाताई आगाशे**

कार्यवाह
**सौ. क्रांतिगीता महाबळ**

कार्याध्यक्ष
**सौ. स्नेहलता साठे**
'२' यशोधरा, वीर सावरकर मार्ग,
कीर्ती महाविद्यालयाजवळ, दादर, मुंबई २८.
दूरध्वनी : ४६ ४७ ३९

## कामगार वृत्त

# महापालिकेचा संप ! ताण वाढला !

आमचे एक मित्र आहेत अॅडव्होकेट आहेत. तसे वयस्करच; पण राजकारणात आणि कामगार चळवळीत उठणारी अनेक लहान-मोठी वादळे त्यांनी पाहिली आहेत. परवा अशाच गप्पा चालल्या असता ते म्हणाले की, संप केव्हा चालू करावयाचा आणि तो केव्हा मागे घ्यावयाचा हे ठरविणे ही एक कसोटी असते. त्यासाठी सदसद्‌विवेकबुद्धीने निर्णय घ्यावा लागतो. हा निर्णय जर चुकला तर नेत्याचं स्वतःचं अस्तित्वही राहील की नाही ही शंका असते.

मुंबईत चालू असलेल्या दोन संपांबाबत त्यांचं हे वाक्य तंतोतंत लागू पडतं. येथील २।। लाख गिरणीकामगार गेल्या आठ महिन्यांपासून लढा देत आहेत. हा लढा अद्यापही निर्णायक अवस्थेत असताना मुंबई महानगरपालिकेच्या सव्वा लाख कर्मचाऱ्यांनी गुरुवार मध्यरात्रीपासून बेमुदत संप चालू केला आहे. म्हणूनच म्हटलं की, संप केव्हा मागे घ्यावयाचा आणि तो केव्हा चालू करावयाचा हा निर्णय घेणे ही एक कसोटी असते. या कसोटीत डॉ. सामंत आणि खा. जॉर्ज फर्नांडिस कितपत यशस्वी होतील हे आताच सांगणे सोइस्कर होणार नाही.

मुंबई महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांचा प्रश्न गेल्या कित्येक वर्षांपासून तसाच रेंगाळत पडला आहे. नवीन वेतनश्रेणी लागू करण्यात यावी, महागाईभत्ता निर्देशांकाशी निगडित असावा, प्रवासभत्ता–घरभाडेभत्ता मिळावा, राहण्यास जागा मिळावी या त्यांच्या प्रमुख मागण्या आहेत. आपल्या या मागण्या पूर्ण होण्यासाठी येथे कार्य करीत असलेल्या निरनिराळ्या युनियननी एक 'समन्वय समिती' स्थापून त्याद्वारे महापालिकेकडे २५ कोटींची मागणी केली आहे.

ही २५ कोटींची मागणी करीत असताना महापालिकेची आजची आर्थिक स्थिती काय आहे, हे पाहिले पाहिजे. मुंबई महानगरपालिका सध्या आर्थिक संकटात आहे असे आयुक्त द. म. सुकथनकर यांनी पूर्वीच जाहीर केले आहे. त्यासाठी त्यांनी १८ कोटींची करवाढ लागू करण्याची सूचना स्थायी समितीला केली आहे. ही करवाढ लागू करणे अपरिहार्य आहे असे आयुक्तांचे म्हणणे आहे. या करवाढीवर आयुक्त आणि नगरसेवक यांची चांगलीच जुंपली असताना 'म्युनिसिपल मजदूर युनियन'ने अचानक बेमुदत संप सुरू केला आहे.

येथे कार्य करीत असलेल्या समन्वय समितीतील ३३ संघटनांनी या संपाला विरोध केला आहे. वाटाघाटी फिसकटल्या नसताना 'म्युनिसिपल मजदूर युनियन'ने जो ७२ तासांचा इशारा-संप दिला आहे, त्यात कर्मचाऱ्यांनी भाग घेऊ नये असे पत्रक ऑफिसकर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री. यशवंत सरपोतदार यांनी काढले होते.

या ३३ संघटनांनी जरी संपाला विरोध केलेला असला तरी संपाला पाठिंबा चांगला मिळाला आहे. वाहतूकखात्यातील कर्मचारी संपावर असल्याने खुद्द महापौर आणि आयुक्त सुकथनकर यांना होमगार्डच्या गाडीने कार्यालयास जावे लागत आहे. अनेक दवाखान्यांतील रोग्यांना घरी जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे. प्रथम हा संप फक्त ७२ तासांचा इशारा-संप होता; पण ७२ तास संपल्यानंतर लागलीच या संपाचे बेमुदत संपात रूपांतर झाले. गुरुवारी एका जाहीर सभेत म्युनिसिपल मजदूर युनियनचे अध्यक्ष खा. जॉर्ज फर्नांडिस यांनी तशी घोषणा केली. या संपाला साथ देण्यासाठी बेस्ट आणि टॅक्सीवालेही संपात सामील होतील अशी फर्नांडिसना आशा आहे.

बेस्ट, टॅक्सी आणि त्यापाठोपाठ हॉटेल-कामगारांनाही या संपात खेचणे म्हणजे ही सरळसरळ अडवणूक आहे असे आयुक्तांचे म्हणणे आहे. आयुक्त सुकथनकर यांनी संप सुरू होण्यापूर्वीच जाहीरपणे सांगितले की, पालिकेची जेवढी कुवत होती ती आम्ही देऊ केली आहे. युनियननेत्यांनी ५ कोटी रुपये घेण्याची तयारी प्रथम दाखवली असतानाही आम्ही ९ कोटी देऊ केले आहेत. आता २५ कोटीच हवेत हा युनियन–नेत्यांचा अट्टाहास आहे, असे आयुक्तांचे म्हणणे आहे. ९ कोटींच्या वर जादा पैसे देणे आर्थिकदृष्ट्या पालिकेला परवडणारे नाही हे आयुक्तांनी खंबीरपणे सांगितले आहे.

आयुक्तांच्या या म्हणण्याला अनेकांचा आतून पाठिंबा आहे; पण जाहीरपणे तसे कोणीही बोलून दाखवत नाही. मुंबई महापालिकेतील अनेक नगरसेवकांनी गिरणी-कामगारांसाठी धरणे धरली, सत्याग्रह केला; पण पालिका–कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत हे नगरसेवक गप्प आहेत. त्याला काही कारणे असलेली दिसतात. एक म्हणजे पुढील वर्षीच्या मार्च महिन्यात पालिकेची निवडणूक आहे. कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी जर करवाढ करण्यात आली तर निवडणुकीवर त्याचा विपरीत परिणाम होईल याची त्यांना धास्ती आहे. दुसरी गोष्ट म्हणजे गेल्या बऱ्याच वर्षांपासून फर्नांडिसांचे नाव झळकत नसल्याने केवळ राजकीय चालीने हा संप पुकारला गेला आहे असे अनेकांचे म्हणणे आहे. मुंबईचे महापौर हे भारतीय जनता पार्टीचे आहेत. त्यांच्या कारकीर्दीत जर असा संप झाला तर त्याचा आपणाला फायदाच होईल असा समाजवादी लोकांचा समज आहे. त्यांच्यातही एकी नाही. शिक्षकांनी या संपात भाग घेतला म्हणून आ. प्रा. सदानंद वर्दे यांनी आपल्या अध्यक्षीय पदाचा राजिनामा दिला आहे. इंदिरा काँग्रेसचे नगरसेवक डोळे उघडे ठेवून सर्व काही पाहात आहेत म्हणूनच कर्मचाऱ्यांना जादा पैसे द्या असे नगरसेवक जाहीरपणे बोलू शकत नाहीत.

नागरिकांना वेठीस धरून आपण आपल्या मागण्या पदरात पाडून घेऊ असे फर्नांडिसांच्या युनियनला वाटते. मुंबईत कचऱ्याचे ढीग दिवसेंदिवस वाढत आहेत. पावसाने त्याची दुर्गंधी सुटते आहे. आपल्या मागण्या मान्य झाल्याशिवाय संप मागे घेणार नाही असे फर्नांडिसांनी म्हटले असले तरी आयुक्त सुकथनकर जादा काही देऊ शकतील ही आशा खूपच कमी आहे. संपवाले घातपात करून हिंसक कारवाया करीत आहेत असा आयुक्तांचा आरोप आहे. यांच्यापुढे मी नमणार नाही असे त्यांनी ठामपणे सांगितले आहे. आणि म्हणूनच थातुरमातुर तडजोड घडवून आणून युनियनला आज नाही उद्या संप मागे घ्यावा लागेल अशीच दाट शक्यता आहे.

—मोहन शं. कुलकर्णी

परराष्ट्र ......

# गांधींची रशियाभेट

## अंतर्गत प्रश्नांचा अनुचित उल्लेख

वा. दा. रानडे

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींच्या रशिया-भेटीचा विचार त्यांच्या अमेरिकाभेटीच्या पार्श्वभूमीवर करायला हवा. अमेरिकेशी भारताचे संबंध सुधारले तर रशियाशी मैत्री व सहकार्याचे बंध त्यामुळे कमी होतील का ? अशी शंका रशियन नेत्यांच्या मनात डोकावली असणे शक्य आहे. श्रीमती गांधींच्या रशियाभेटीने ती दूर झाली. वास्तविक अमेरिकेच्या दौऱ्यातच इंदिरा गांधींनी स्पष्ट केले होते की, अमेरिकेशी आम्हाला संबंध सुधारावयाचे असले तरी रशियाशी असलेल्या आमच्या मैत्रीला व सहकार्याला त्यामुळे कोणताही बाध येणार नाही. ‘एका देशाशी मैत्री जोडताना दुसऱ्या देशाशी असलेली मैत्री आम्ही तोडणार नाही.’ अशा शब्दात मास्को भेटीतही तोच मुद्दा त्यांनी पुन: मांडला.

बांगला देश–युद्धाच्या वेळी भारताने रशियाशी पंचवीस वर्षांची मैत्री व सहकार्याचा करार केला तेव्हा भारत आता खऱ्या अर्थाने अलिप्त देश राहिला नाही, त्याची अलिप्तता रशियाकडे झुकली आहे, अशी टीका पाश्चात्य निरीक्षकांनी त्या वेळी केली होती; पण या टीकेत तथ्य नव्हते. भारताने रशियाशी मैत्री–करार केला असला तरी त्यामुळे इतर देशांशी तशाच स्वरूपाचा मैत्री–करार करण्यास कोणतीही आडकाठी येत नाही, हे पंतप्रधानांनी व परराष्ट्रमंत्र्यांनी त्यानंतर अनेकदा स्पष्ट केले होते. आपले परराष्ट्र-धोरण स्वतंत्र आहे, दोन्ही बड्या राष्ट्रांपैकी रशियाकडे आपला कल अधिक झुकलेला नाही अशी प्रतिमा निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न इंदिरा गांधी गेले काही महिने करीत असल्याचे दिसते. अफगाणिस्तानातून रशियाने फौजा काढून घेतल्या पाहिजेत ही भारताची भूमिका रशियाच्या दौऱ्यात त्यांनी स्पष्टपणे मांडली. त्याचबरोबर पाश्चात्य राष्ट्रांचा बाह्य हस्तक्षेप आणि बंडखोरांना मिळणारी मदतही थांबली पाहिजे हेही त्यांनी स्पष्ट केले. रशियाच्या गटातली कम्युनिस्ट राष्ट्रे रशियाच्या अफगाणिस्तानबाबतच्या धोरणास पूर्ण पाठिंबा देतात तशी भारताची भूमिका नाही हे त्यावरून स्पष्ट झाले. अफगाणिस्तान व पाकिस्तानात वाटाघाटींनी समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न भारताने करावा अशी अपेक्षा रशियाने व्यक्त केली. भारत तसा प्रयत्न करील; पण पाकिस्तान-अमेरिकेच्या प्रभावाखाली तोपर्यंत अशा प्रयत्नातून फारसे काही निष्पन्न होण्याची शक्यता नाही. अफगाणिस्तान अलिप्त देश न राहता रशियाच्या प्रभावक्षेत्रात गेल्याने अफगाणिस्तानचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्याची अलिप्तता पुन: प्रस्थापित केल्यानेच तो प्रश्न सुटेल. अलिप्त राष्ट्रांनी याबाबतीत आतापर्यंत केलेल्या प्रयत्नात फारशी प्रगती झालेली नाही; पण प्रयत्न चालू ठेवायला हवेत.

लष्करी व आर्थिक मदतीसाठी एकाच देशावर अवलंबून रहायचे नाही हे धोरण भारताने अनुसरले आहे. पाकिस्तानला अमेरिकेने मोठ्या प्रमाणात लष्करी मदत केल्याने उपखंडातला लष्करी तोल बिघडत आहे याकडे इंदिरा गांधींनी अमेरिकेच्या दौऱ्यात लक्ष वेधले होते; पण पाकिस्तानला आमची मदत चालूच राहणार असे रेगन यांनी स्पष्ट केले. भारतालाही लष्करी मदत देण्याची तयारी अमेरिकेने दर्शविली होती; पण भारताने नकार दिला. रशियानेही पूर्वी भारतास मिग विमाने पुरविली आहेत, मिग विमानांचे कारखाने उभारण्यास मदत केली आहे; पण भारताला आणखी लष्करी मदत रशियाकडून नको आहे. इंग्लंडकडून जग्वार विमाने व फ्रान्सकडून मिराज–२००० विमाने भारत घेणार आहे. कोणत्याही एका देशावर अवलंबून रहायचे नाही या धोरणाचेच हे निदर्शक आहे.

अणुशक्तीच्या विकासासाठी अणुइंधन मिळविणे हा भारतापुढे एक महत्त्वाचा प्रश्न आहे. तारापूर केंद्रासाठी अणुइंधन-पुरवठा पुढे चालू ठेवण्याची अमेरिकेची तयारी नाही, हे अमेरिकेने स्पष्ट केले होते; पण वॉशिंग्टनभेटीत अमेरिकेऐवजी फ्रान्स-कडून अणुइंधन मिळविण्याची व्यवस्था झाली; पण त्यासाठी भारताने काही अटी मान्य करायला हव्यात काय याबाबतचा घोळ अजून चालूच आहे. या पार्श्वभूमीवर भारतात एक हजार मेगॅवॅट वीज उत्पादन करणारे अणुशक्तिकेंद्र उभारण्याची तयारी रशियाने दर्शविली आहे तारापूरचे केंद्र ४०० मेगॅवॅटचे. त्याच्या अडीचपट मोठे हे केंद्र होईल. अमेरिका व फ्रान्सने अडवणूक केली तरी भारताचा अणुशक्तिविकास खुंटणार नाही. रशियाच्या मदतीने तो होईल हा दिलासा रशियाच्या मदतीमुळे मिळाला आहे. अमेरिकेला शह त्यामुळे बसेल; पण तेवढ्यावर समाधान न मानता अणुशक्तिनिर्मितीसाठी लागणारे अणुइंधन स्वदेशातच तयार करण्यावर भारताने लक्ष केंद्रित करायला हवे. असे इंधन तयार करण्याच्या प्रयोगात भारतीय शास्त्रज्ञांनी यश मिळविलेले आहे; पण यासाठी तारापूर केंद्रात वापरल्या जाणाऱ्या अणुद्रव्यावर पुन: प्रक्रिया करायला हवी. तारापूर-बाबत अमेरिकेशी केलेल्या कराराने वापरलेल्या अणुद्रव्यावर पुन: प्रक्रिया करण्याचा अधिकार भारताला आहे. त्यासाठी अमेरिकेच्या परवानगीची जरूर नाही, असे भारताचे म्हणणे, तर परवानगी घ्यावयास हवी असा अमेरिकेने कराराचा अर्थ लावला आहे. आम्हाला अधिकार आहे असे नुसते भारताने म्हणणे पुरेसे नाही. तो अधिकार भारताने कृतीने प्रस्थापित केला पाहिजे आणि अशा स्वरूपाचे करार करताना त्यातून तारापूर-सारखे घोळ पुढे निर्माण होणार नाहीत याची दक्षता घ्यावयास हवी.

रशियाच्या मदतीने पहिल्या भारतीयाला अंतराळयानातून अंतराळात पाठविण्याचा प्रयोग होणार आहे. त्यासाठी दोन भारतीयांची निवड झाली असून त्यांना रशियात आवश्यक ते शिक्षण दिले जाईल. रशियाने अशा सहकार्याची तयारी पूर्वीच दर्शविली होती; पण इंदिरा गांधींच्या भेटीची संधी साधून यासंबंधी अधिकृत घोषणा करण्यात आली. भारताने अंतराळात पहिला उपग्रह

पाठवितानाही रशियाचीच मदत घेतली होती; पण पुढे स्वत.चे तंत्रज्ञान विकसित करून स्वत.च्या बळावर उपग्रह पाठविण्यात भारताने यश मिळविले आहे. आता रशियाच्या मदतीने भारतीय तरुणास अंतराळ-प्रवासाची संधी मिळत आहे. या संधीचा जरूर फायदा घ्यावा; पण प्रगतीचा हा पुढचा टप्पा गाठण्यापूर्वी उपग्रह सोडण्यात आणि त्याचे कार्य व्यवस्थित चालविण्यासाठी आवश्यक असलेले तंत्रज्ञान आत्मसात करण्यावर आपण लक्ष केंद्रित करायला हवे, याची जाणीव इन्सॅटच्या बिघाडाने आपणास दिलेली आहे.

भारताच्या आर्थिक विकासास रशियाने पूर्वीपासून मदत केलेली असली तरी या सहकार्याला मर्यादा आहेत. त्याला काही बाबतीत भारत तर काही बाबतीत रशियाही जबाबदार आहे. पोलादासारख्या क्षेत्रात अधिक उत्पादनासाठी रशिया मदत करू शकेल; पण भारताच्या विकासाचा वेग मंद असून तो टप्पा अजून आपण गाठलेला नाही. रशियाच्या मदतीने उभारलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील कारखान्याचा कारभार अकार्यक्षमतेने चालू आहे. याचा दोष भारताकडेच येतो; पण 'भेल'साठी रशियाने दिलेल्या तंत्रज्ञानाच्या मर्यादा दिसून आल्या असून अद्ययावत तंत्रज्ञानासाठी भेलला पाश्चात्य कंपन्यांशी करार करावे लागले. समुद्रकिनाऱ्यालगत तेलसंशोधनात रशिया मोठ्या प्रमाणावर मदत करू शकत नाही. इलेक्ट्रॉनिक्सच्या बाबतीत पाश्चात्य राष्ट्रे व जपानच्या तुलनेने त्याची प्रगती कमी आहे हे दिसून आले आहे. भारताला मिळणाऱ्या आर्थिक मदतीपैकी ८० टक्के मदत पाश्चात्य राष्ट्राकडून मिळते.

परदेशदौऱ्यात अंतर्गत प्रश्न उपस्थित करणे व त्या अनुषंगाने विरोधी पक्षावर टीका करणे कितपत उचित हा प्रश्न इंदिरा गांधींच्या रशियाभेटीतील काही भाषणांमुळे उपस्थित झाला आहे. भारतातील डाव्या पक्षांच्या धोरणांवर त्यांनी दोन वेळा टीका केली आणि हे पक्ष आपल्या सरकारला मदत करण्याऐवजी ते कमकुवत करण्याचा आणि अस्थैर्य निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत असे सांगितले. हे पक्ष सरकारच्या परराष्ट्रधोरणाला पाठिंबा देतात आणि अंतर्गत धोरणांना मात्र विरोध करतात असा त्यांच्या टीकेचा रोख होता. वास्तविक या पक्षांनी कोणते धोरण स्वीकारावे हा त्यांचा प्रश्न आहे आणि ते ठरविण्याच्या बाबतीत त्यांना पूर्ण मोकळीक लोकशाही देशात मान्य करण्यात आलेली आहे. इंदिरा गांधींनी हा प्रश्न का उपस्थित केला? रशियाने दोन्ही कम्युनिस्ट पक्षांवर दडपण आणून त्यांना आपले अंतर्गत धोरण बदलायला लावावे व इंदिरा सरकारला पाठिंब्याचे धोरण स्वीकारायला सांगावे असा त्यांच्या मनातला उद्देश यामागे असावा, हे उघड आहे. आम्ही रशियाच्या तंत्राने चालत नाही. आमचे धोरण स्वतंत्र व येथील परिस्थितीच्या आमच्या विश्लेषणावर आधारलेले आहे, असा दोन्ही कम्युनिस्ट पक्षांचा दावा असतो तेव्हा हे दडपण ते मानणार नाहीत. अंतर्गत प्रश्नात परदेशांचा हस्तक्षेप आम्ही करू देणार नाही आणि दुसरीकडे रशियाने अशा प्रकारे हस्तक्षेप करावा अशी अपेक्षा करावयाची हे विसंगत आणि अनुचित आहे. □

---

## मुक्काम संगमनेर

# ९।३।८२ : रात्रीची घटना

---

दि. २७।८।१९८२.
अहमदनगर सेशन कोर्ट.

सेशन जज्ज श्री. गुरसहानी आज फैसला सुनावणार होते.

निर्विकार चेहऱ्याच्या आणि थंड नजरेच्या साहेबाच्या चेहऱ्यावरून अंदाज बांधणं कठीण होतं.

आपल्या हाती असलेल्या सत्तेच्या, अधिकाराच्या जोरावर झोपडपट्टीतल्या एका गरीब, दरिद्री बाईच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन तिच्यावर बलात्काराचा प्रयत्न झाला की, एका गुन्हेगार प्रवृत्तीच्या स्त्रीने एका कार्यक्षम अधिकाऱ्याला बदनाम करण्यासाठी हा डाव रचला– याचा फैसला गुरसहानींना करावा लागणार होता.

आरोपीच्या पिंजऱ्यात होते संगमनेर शहर पोलिसस्टेशनचे पी. एस. आय. श्री. साहेबराव पवार. फिर्याद दाखल केली होती द्रौपदी कुंडलीक गायकवाड या बाईनं.

दि. ९।३।८२ च्या रात्रीची घटना–

शहर पोलिसस्टेशन आणि कचेरीच्या मागच्या बाजूच्या कचेरीमैदानावरील झोपडपट्टीत द्रौपदी गायकवाडची एक झोपडी आहे.

त्या रात्री आपल्या लहान मुलांसह ती झोपलेली. झोपडीच्या बाहेर दारालगत एक मुलगा झोपलेला. मध्यरात्रीनंतर आपल्या मुलाच्या रडण्यामुळे द्रौपदीला एकदम जाग आली. उठून बघते तो समोर अंगावर फक्त बनियन असलेले साहेब उभे! त्यांनी द्रौपदीला मिठीत घेण्याचा प्रयत्न केला; पण द्रौपदीनं आपली शिताफीनं सुटका करवून घेतली आणि स्वरक्षणासाठी आपल्या शेजाऱ्यांच्या झोपड्यांच्या आश्रयाला धावली; पण साहेबांचा अधिकार, त्यांची सत्ता आणि त्यांचा प्रभाव लक्षात घेऊन शेजाऱ्यांनी तिला आश्रय द्यायचं नाकारलं. आश्रय नाही म्हणताच ती परत फिरली–तिनं बघितलं, नग्नावस्थेतील साहेब थोड्या अंतरावर ठेवलेल्या आपल्या मोटारसायकलच्या दिशेनं धावतायेत.

द्रौपदीनं आपलं मूल उचलल आणि आपल्या दुसऱ्या शेजारच्या कादरच्या आश्रयाला आली. दिवस उगवण्यापूर्वी आपल्या झोपडीतून निघून जाण्याच्या अटीवर कादरने द्रौपदीला तात्पुरता आश्रय दिला. उजाडण्यापूर्वी द्रौपदी आपल्या झोपडीत परतली. आपल्या झोपडीत तिला साहेबाचा ड्रेस, त्यातील वस्तू आणि मोटारसायकलची चावी पडलेली दिसली. तिनं त्या सर्व वस्तू उचलल्या. प्रथम कादरकडे आणि नंतर जवळच राहाणारे एक वकील आणि पुढारी श्री. संभाजी देशमुख यांच्याकडे आली. त्यांनी तिला सरळ अहमदनगरला जाऊन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना भेटण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे द्रौपदी नगरचे एक सामाजिक कार्यकर्ते, जिल्हा परिषदसदस्य श्री. प्रभाकर रूपवते यांच्याकडे गेली. रूपवते यांनी तिला एस. पी. समोर उभं केलं. तिथं तिची तक्रार नोंदविण्यात आली. आपल्याजवळच्या साहेबांच्या वस्तू तिनं एस. पी. च्या स्वाधीन केल्या.

–पण जेव्हा तिच्या लक्षात आलं, पोलि-

सांकडून काहीच कारवाई होत नाहीये—तिनं आपली तक्रार संगमनेर कोर्टात दाखल केली. कोर्टानं तक्रारीतील सर्वांच्या साक्षी नोंदविल्या आणि पी. एस. आय साहेबराव पवार याच्या विरुद्ध द्रौपदी कुंडलिक गायकवाडवर बलात्काराचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल झाला.

आपल्या दारिद्र्याचा आणि असाहाय्यतेचा फायदा घेऊन आपल्या अधिकाराच्या जोरावर साहेबांनी आपल्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न करण्याचं धाडस केलं असं फिर्यादी द्रौपदीचं म्हणणं.

पी. एस. आय. साहेबराव पवार यांची आणि द्रौपदीची पूर्वीची ओळख— एक गुन्हेगार आणि पोलिसअधिकारी या नात्यानं.

फिर्यादी द्रौपदी गायकवाड तिची बहीण, तिचा पती, तिचे आई-वडील आणि इतर नातेवाईक यांची नावं पोलिसाच्या 'ब्लॅक लिस्टला' आहेत. गुन्हा घडल्याच्या रात्री द्रौपदीचा पती पोलिसकस्टडीत होता. 'हातभट्टीचा' कुटीरोद्योग हा यांच्या उपजीविकेचा व्यवसाय. द्रौपदी आणि तिच्या आईवर एका चोरीच्या केसचा आरोपही होता. हातभट्टीचे अड्डे, लहानमोठ्या चोऱ्या, असल्या कारणावरून जेव्हा जेव्हा प्रसंग आला तेव्हा प्रत्येक वेळी साहेबांनी या बेकायदेशीर गुन्हेगारी कृत्यांबद्दल त्यांना अडकवलेल त्यामुळं त्यांच्यात शत्रुत्व असणं ओघानं आलंच. तेव्हा अशा कर्तव्यकठोर, कार्यक्षम अधिकाऱ्याला अडकविण्यासाठी बाईनं डाव टाकला आणि हे खटल्याचं नाटक उभं राहिलं, असं आरोपीचं म्हणणं.

'—समोर आलेल्या साक्षीपुराव्यावरून सेशन जज्ज गुरसहानी याचा फैसला करणार होते. जातीय तणावासाठी आणि अशांततेसाठी प्रसिद्ध असलेल्या संगमनेर शहरात हिंदु-मुस्लिमांच्या कोणत्याही उत्सवसणाला पोलीसबंदोबस्त चोख ठेवावा लागतो.

दि. ९।३।८२ ला होळी होती. जादा बंदोबस्ताची आवश्यकता होती. एस.आर. पी.ची जादा कुमक आलेली होती अॅडीशनल एस पी. श्री. ओझरकर त्या दिवशी संगमनेरात मुक्काम ठोकून होते. अशा स्थितीत पोलीस-अधिकाऱ्यांना जागरूक रहाणं आवश्यक होतं. संगमनेर पोलीसस्टेशनचे इनचार्ज या नात्यानं साहेबराव पवार यांची जबाबदारी मोठी होती. त्या दिवशी आपल्या वरिष्ठांसमवेत पवार रात्री २–२॥ वाजेपर्यंत होते. रात्री २॥ वाजण्याच्या सुमारास साहेब आपल्या बंगल्यावर परतले. मुलगा आजारी असल्यानं आपल्या पत्नीला डिस्टर्ब नको म्हणून अशा अपरात्री न उठवता बंगल्याच्या बाहेरच्या मोकळ्या व्हरांड्यात झोपणं साहेबांनी पसंत केलं. आपला ड्रेस, त्यातलं साहित्य, त्यातल्या रु. ७५० च्या रकमेसह त्यांनी व्हरांड्याच्या भिंतीवर ठेवला.

सकाळी साडेसहाच्या सुमारास जाग आली तेव्हा आपण रात्री व्हरांड्याच्या भिंतीवर ठेवलेला ड्रेस, सर्व वस्तूंसह गायब आहे हे त्यांच्या लक्षात आलं. १०।३।८२ च्या सकाळी सात वाजता पोलीसस्टेशनला येऊन आपला ड्रेस त्यातील वस्तूंसह चोरीला गेल्याची तक्रार त्यांनी नोंदविली.

कचेरीच्या मैदानाच्या एका बाजूला द्रौपदी रहात असलेली झोपडपट्टी आहे, तर मैदानाच्या दुसऱ्या बाजूला साहेबांचं निवासस्थान आणि पोलीसक्वार्टर्स आहेत आणि एस्.पी. समोर दाखल केलेला आणि कोर्टासमोर पुरावा म्हणून आलेला ड्रेस फिर्यादी द्रौपदीनं चोरला हे स्पष्ट व्हावं हा आरोपीचा मुद्दा!

सबंध खटल्यात द्रौपदीच्या बाजूचा,प्रत्यक्ष परिस्थिती बघणारा कोणीही साक्षीदार नव्हता. ज्या कादरकडे द्रौपदी उजाडेपर्यंत थाबली त्या कादरचं नाव साक्षीदारांच्या यादीतही नव्हतं. राहिलेल्या साक्षीदारांपैकी संभाजी देशमुख आणि प्रभाकर रूपवते यांची साक्ष द्रौपदीच्या सांगण्यावर आधारित होती. फक्त द्रौपदीची लहान मुलगी मैना हिच्या साक्षीवर विसंबून आरोपीला दोषी कसं समजणार ? आणि लहान मुलांना पढवणं थोडंच अवघड आहे ? शिवाय द्रौपदीच्या शरीरावर, कोणत्याही प्रकारची अशी जखम किंवा खूण नव्हती की ज्यावरून तिच्यावर बलात्कारासाठी जबरदस्ती झाली हे सिद्ध व्हावं !

शहरातल्या तणावाच्या वातावरणात, ड्युटीचा जबरदस्त मानसिक ताण असताना, वरिष्ठ अधिकारी शहरात असताना कोणतीही चांगल्या घराण्यातली, सुशिक्षित, जबाबदारीच्या पदावरील व्यक्ती असलं कृत्य करेल ? अशा मानसिक अवस्थेत असू शकेल? अशा प्रकारे आपला संयम आणि सारासार विवेक, विचार घालवून असलं कृत्य करेल हे विश्वसनीय वाटत नाही.

या बाईला कोणत्याही निमित्तानं बाहेर काढून 'योग्य जागी' जाऊन 'मजा करणं' साहेबांना अशक्य थोडंच होतं ? उघड्यावरच्या झोपडपट्टीत, शेजारी इतर झोपड्यातली माणसं असताना, झोपडीबाहेर लगतच आणि तिच्या आजुबाजूला मुलं झोपलेली असताना असलं धाडस करणं कसं शक्य आहे? सेक्सला तर 'प्रायव्हसी' हवी असते असं मानसशास्त्र सांगतं त्याचं काय ?

शिवाय आपला ड्रेस घेऊन पळणं साहेबांना अशक्य का होतं ? आणि मोटारसायकलची चावी जर झोपडीत राहिली तर साहेब आपली मोटारसायकल घेऊन गेले कसे ? आणि एवढा प्रसंग घडतो तरी झोपडीबाहेर झोपलेला तिचा मुलगा सकाळपर्यंत झोपलेला कसा ?

——द्रौपदीने रचलेल्या खटल्याच्या नाटकात असे किती तरी कच्चे दुवे तसेच राहून गेलेले होते.

हे राहून गेलेले कच्चे दुवे कोर्टाच्या निदर्शनास आणून दिले, आरोपीचे वकील श्री. विजयराव मोहिते, ए. बी. जोर्वेकर, बी. एस. घुमाळ आणि आठरे यांनी.

एक डॅशिंग पोलीसअधिकारी म्हणून साहेबराव पवारांची ख्याती ! कुठे, कितीही, कसाही जमाव असू दे, कसलाही प्रसंग असला तरी साहेबराव त्यात बेधडक शिरतात. त्यांचं धाडस अफाट आहे. तातडीनं निर्णय घेणं हे त्यांचं वैशिष्टच. नागरिकांच्यात मिसळणारा आणि 'पोलीस हे जनतेचे विश्वासू मित्र आहेत असं वागणारा, एक कार्यक्षम पोलीस-अधिकारी म्हणून शहरातले नागरिक त्यांना मानतात— त्यामुळं केसकडे सगळ्यांचं लक्ष लागून राहिलेलं. निर्णय ऐकायला कोर्टात तुफान गर्दी झालेली.

गुरसहानींनी निकालपत्र वाचलं—आपल्यासमोर सादर झालेल्या साक्षीपुराव्यानुसार कोर्टानं फैसला सुनावला. राहिलेल्या कच्च्या दुव्यांचा फायदा मिळून आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली; उलट खोटी केस दाखल केल्याबद्दल कारवाई का करू नये अशी नोटीस फिर्यादी द्रौपदी गायकवाडवर बजावण्याचा हुकूम झाला !

गुन्हेगार-प्रवृत्तीनं एका कार्यक्षम अधिकाऱ्याला बदनाम करण्याचा रचलेला डाव त्यांच्यावरच उलटला होता !

—विनय गुणे

## अवती भवती

शरद कृष्णन

# □ आंध्र प्रदेश : नवा गडी नवे राज्य

आंध्र प्रदेशचे नवीन मुख्यमंत्री विजय भास्कर रेड्डी यांनी सत्ता-ग्रहण केल्यावर सव्वीस सदस्यांचे आपले मंत्रिमंडळ घोषित केले आहे. गेल्या चार वर्षांमध्ये आंध्र प्रदेशात तीन मुख्यमंत्री आणि १०० मंत्री सत्तेवर येऊन गेले असल्याने आंध्र प्रदेशच्या जनतेला या बदलाचे मोठे अप्रूप वाटत नाही नवीन मुख्यमंत्र्यांनी जे सहकारी निवडले आहेत त्यांच्या नावांच्या यादीवरून नजर टाकली तरी त्यात फारसे अनपेक्षित असे काही आढळत नाही सर्व गटांना बरोबर घेऊन जाण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो माजी मुख्यमंत्री बी. वेंकटराम यांचा मंत्रिमंडळामध्ये समावेश होईल अशी वदंता होती; परंतु त्यांची वर्णी लागलेली नाही. नवीन मंत्रिमंडळामध्ये सहभागी होण्यास तेही फारसे उत्सुक नव्हते. आता असेही बोलले जाते की, त्यांना केरळमध्ये राज्यपाल म्हणून पाठवण्यात येणार आहे. तेथील राज्यपाल ज्योती वेंकटचलम यांची मुदत संपली असल्याने या नेमणुकीमध्ये तसा कोणताही अडथळा नाही. खेरीज इंदिरा काँग्रेसच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळ तेथे सत्तेवर असल्याने केरळचे राज्यपाल-पद या माजी मुख्यमंत्र्यांना चांगले भावेल. नको असलेल्या मुख्य-मंत्र्यांची राज्यपालपदी वर्णी लावण्याची परंपरा आहेच. त्या दृष्टीनेही मुख्यमंत्री म्हणून नको असलेले वेंकटराम राज्यपाल होणे ही इंदिरा काँग्रेसच्या परंपरेमध्ये बसणारी गोष्ट आहे. वेंकटराम यांच्या मंत्रिमंडळामधील १८ सहकाऱ्यांना पुन्हा मंत्रिमंडळामध्ये घेण्यात आले आहे. मुख्यमंत्रीपदासाठी ज्यांचे नाव घेतले जात होते ते श्री. जनार्दन रेड्डी यांच्याकडे शेतीखाते देण्यात आले आहे. दुसरे एक महत्त्वाचे मंत्री कोना प्रभाकर राव यांच्याकडे त्यांचे पूर्वीचेच अर्थखाते कायम ठेवण्यात आले आहे. जुन्या मंत्रिमंडळामधील ज्या मातब्बर मंडळींना दूर करण्यात आले आहे त्यामध्ये एम. बागा रेड्डी, जी. वेंकट-स्वामी, श्री. रामभूपाल रेड्डी, एन. अमरनाथ रेड्डी आणि के. केशवराव या नेत्यांचा समावेश आहे नवीन मुख्यमंत्र्यांना त्यांचे सहकारी निवडण्याच्या बाबतीत पुष्कळच स्वातंत्र्य दिले गेले असल्याने ते समाधानी दिसतात. मंत्रिमंडळाच्या शपथविधीनंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, 'जम्मू-काश्मीरच्या नवीन मुख्यमंत्र्यांनी ज्या पद्धतीने मंत्रिमंडळ बनवले त्या पद्धतीने सर्व जुन्या सहकाऱ्यांना वगळून मी माझे मंत्रिमंडळ बनवीन अशी काहींना अपेक्षा होती. जम्मू-काश्मीरमध्ये शेखसाहेबांच्या निधनानंतर डॉ. फरुख अब्दुल्ला हे सर्वेसर्वा आहेत. माझे तसे नाही. मी राष्ट्रीय पक्षाचा एक जबाबदार नेता आहे. पक्षाच्या हायकमांडच्या मार्गदर्शनाखालीच मला मंत्रिमंडळामधील सहकारी निवडावे लागतात आणि त्यात काही गैर आहे असे मला वाटत नाही. माझ्या मंत्रिमंडळामध्ये मी पाच नवीन सहकाऱ्यांना संधी दिली आहे. आंध्र प्रदेशामध्ये निवडणुका नियोजित वेळेच्या आधी घेतल्या जातील असे बोलले जाते. मुख्यमंत्री त्याबाबत बोलताना म्हणाले की, अशी कोणतीही शक्यता नाही. निवडणुका ठरल्या वेळी म्हणजे फेब्रुवारी ८३ मध्येच होतील.

मुख्यमंत्र्यांनी जे पाच नवीन सहकारी निवडले आहेत त्यामध्ये बी. वेमना, श्री विसम सन्यासी नायडू, आंध्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष हनुमंत राव, श्री. पी. व्ही. राघवल्लू व श्री. अमरसिंग यांचा समावेश आहे. या द्विस्तरीय मंत्रिमंडळामध्ये १७ कॅबिनेट दर्जाचे व ९ राज्यस्तरीय मंत्री आहेत. देशाच्या इतर भागामध्ये मंत्रिमंडळाची जडणघडण करताना जो जातीय विचार पहावयास मिळतो तोच विचार आंध्र प्रदेशातही पहावयास मिळतो. तसेच प्रादेशिक विभागांचाही विचार झालेला दिसतो. नवीन मंत्र्यांपैकी १७ मंत्री हे आंध्र विभागामधील असून १० मंत्री तेलंगण विभागामधील आहेत. सात मंत्री मागसलेल्या जातिजमातींचे आहेत. चार हरिजन मंत्री असून कामा समाजाचे ५ व रेड्डी समाजाचे ४ मंत्री आहेत. इतर अल्पसंख्य जमातींपैकी एक मुसलमान व एक ख्रिश्चन यांना मंत्रिमंडळामध्ये स्थान देण्यात आले असून लांबडा जमातीच्या एका प्रतिनिधीचा मंत्रिमंडळामध्ये समावेश करण्यात आला आहे.

जुन्या मंत्रिमंडळामध्ये सी जगन्नाथराव यांच्याकडे उद्योगखाते सोपवण्यात आले आहे. मात्र त्यांना उपमुख्यमंत्रिपद देण्यात आलेले नाही. आपल्या मंत्रिमंडळामध्ये उपमुख्यमंत्री असणार नाही असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. आपले सहकारी निवडताना मुख्यमंत्र्यांची इतकी धावपळ झाली की, ज्यांचा मंत्रिमंडळामध्ये समावेश झाला त्या सर्वांना निरोपही मिळू शकले नाहीत. त्यामुळेच मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला त्या वेळी टी. अमर सिंग हे मंत्री उपस्थित राहू शकले नाहीत. शपथविधी-समारंभाच्या समारोपाच्या वेळी राज्याचे मुख्य सचिव श्री. बी. एन. रामन यांनी श्री अमर सिंग व श्री. पी व्ही. राघवल्लू यांचा शपथविधी नंतर होईल अशी घोषणा केली. उपस्थित मान्यवर चहापानासाठी निघून गेले आणि तेवढ्यात राघवल्लू आले. तेव्हा त्यांचाही शपथविधी घाईगर्दीने उरकण्यात आला. थोडक्यात म्हणजे काहीशा गडबड-गोंधळातच हा समारंभ संपन्न झाला.

### विजय भास्कर रेड्डी

आंध्र प्रदेशचे नववे मुख्यमंत्री म्हणून सत्ता ग्रहण करणारे विजय भास्कर रेड्डी यांच्यावर केवळ सत्ता राबवण्याची जबाबदारी नाही तर आगामी निवडणुका यशस्वीपणे लढवून त्यांनी इंदिराकाँग्रेसला जर मोठे यश मिळवून दिले तर त्यांना भवितव्य आहे. गेली बारा वर्षे तशी त्यांनी वनवासातच काढली आहेत. हैद्राबाद अथवा ते ज्या जिल्ह्यातून येतात त्या कर्नूलमधील समारंभातूनही गेल्या दशकामध्ये त्यांचे फारसे दर्शन झाले नाही. ते प्रत्यक्ष सत्तेवर नसले आणि जास्त बोलत नसले तरी स्वतःच्या जिल्ह्याच्या राजकारणावर त्यांची घट्ट पकड सातत्याने टिकून असल्याचे दिसून येते. बावन्न वर्षांच्या रेड्डींना आज मिळत असलेले मुख्यमंत्रीपद हा त्यांचा मोठाच सन्मान म्हटला पाहिजे. आंध्र प्रदेशाच्या राजकारणामध्ये त्यांची आणि डी. संजीवैय्या यांची चांगली


गट्टी होती. ते दोघे वर्गमित्र. संजीवैय्या यांना राजकारणामध्ये जसजसे महत्त्व मिळत गेले तसतसा रेड्डी याचाही प्रभाव वाढत गेला. रेड्डी यांचे शालेय शिक्षण कर्नूलच्या म्युनिसिपल शाळेत झाले, तर महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते मदनापल्ली येथील बीसेन्ट थिऑसॉफिकल या संस्थेमध्ये दाखल झाले. तेथील अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर १९४७ साली मद्रास लॉ कॉलेजमधून त्यानी कायद्याची पदवी घेतली. के. उमाश्वेकरम या ज्येष्ठ वकिलाच्या हाताखाली त्यानी काही काळ काम पाहिले. पुढे त्यानी आंध्र प्रदेशाच्या राजकारणामध्ये रस घेण्यास सुरुवात केली. प्रारंभीच्या काळात त्यांना संजीवैय्या याचे सहाय्य झाले १९५५ मध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये त्यांना संजीवैय्या याच्यामुळेच तिकिट मिळू शकले. ते निवडून आले. १९६० पर्यंत त्यांचे संजीवैय्या यांच्याबरोबर सूत होते. तथापी १९६० साली आंध्र प्रदेशनचे मुख्यमंत्री असताना सजीवैय्या यानी विजय भास्कर रेड्डी याचे दुसरे खास स्नेही आनम सुब्बा रेड्डी यांना आपल्या मंत्रिमंडळामधून वगळले. परिणामी विजय भास्कर रेड्डी व संजीवैय्या यांच्या वीस वर्षांच्या दोस्तीमध्ये दुरावा निर्माण झाला. त्याचा स्नेह पुन्हा पहिल्यासारखा कधीच जुळून येऊ शकला नाही. त्यात पुढे काँग्रेसच्या अध्यक्षपदी असताना डी. संजीवैय्या यांनी रेड्डी यांच्या सहकाऱ्याना तिकिटे नाकारली स्वत: रेड्डी यानी निषेध म्हणून निवडणूक लढवली नाही. याच निवडणुकीमध्ये संजीवैय्या पराभूत झाले आणि त्याबरोबरच या दोघाच्या दोस्तीचीही अखेर झाली.

रेड्डी यांनी याच काळात आपल्या जिल्ह्याच्या राजकारणावर परिपूर्ण नियंत्रण मिळवले. १९६७ साली ते कर्नूल जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असताना त्या वेळचे मुख्यमंत्री के. ब्रह्मानंद रेड्डी यांनी मंत्रिमंडळामध्ये येण्याचे पाचारण केले आणि रेड्डी त्यांच्या मंत्रिमंडळामध्ये दाखल झाले. ब्रह्मानंद रेड्डी याच्याबरोबर त्यांचे अत्यंत जवळचे संबंध होते आणि त्यांनीही १९७९ पर्यंत रेड्डी यांचा सातत्याने पाठपुरावा केला. १९७९ मध्ये रेड्डी चरणसिंग मंत्रिमंडळामध्ये दाखल झाल्यावर त्यानी ब्रह्मानंद रेड्डीपासून फारकत घेतली आणि ते इंदिरा काँग्रेसच्या तंबूत दाखल झाले आणि वाट्याला आलेली खासदारकी सांभाळत असताना आज काहीशा अनपेक्षितपणे त्याच्यावर मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. ते प्रथम मंत्री झाले त्या वेळी ते आंध्र प्रदेशाच्या कोणत्याच गृहाचे सदस्य नव्हते आणि मुख्यमंत्री म्हणून आंध्र प्रदेशात दाखल होत असतानाही ते कोणत्याच गृह चे सदस्य नाहीत. सहा महिने तर त्याना मुख्यमंत्रीपद राबवता येईल आणि सार्वत्रिक निवडणुका त्यापूर्वीच होत असल्याने त्यांना पोटनिवडणूक लवढण्याचा प्रश्न येणार नाही. स्वाभाविकपणे आपले सारे सामर्थ्य व सघटनकौशल्य त्याना आता निवडणुकीसाठी खर्ची घालावे लागेल. या अग्निदिव्यातून ते किती यशस्वीपणे बाहेर पडतात यावर त्यांचे पुढील भवितव्य अवलंबून आहे. तेलगू देशमच्या आव्हानाला तोड देण्याची तयारी त्यानी सुरू केली आहे. या पक्षाचे नेते एन. टी. रामराव याच्या जामातांना त्यांनी आपल्या मंत्रिमंडळामध्ये स्थान दिले आहे. तथापी केवळ तेवढ्याने रामराव समाधान मानणार नाहीत आणि म्हणून आगामी निवडणुकीद्वारा मिळणारा जनतेचा कौल महत्त्वपूर्ण ठरणार आहे. मवाळ प्रवृत्तीचे श्री. रेड्डी एका जमान्यात दिवसाला शंभर सिगरेट ओढत असत, तथापी मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून त्यांनी सिगारेट सोडली आहे. रेड्डी याची त्यांच्या लाडागिरी या गावी शेतजमीन आहे; परंतु त्याचे स्वत:चे घर नाही. त्यांची सापत्तिक परिस्थिती सुखवस्तू म्हणता येईल इतपत आहे. त्यांना दोन मुलगे व तीन मुली असून कौटुंबिक जीवन समाधानाचे आहे. दिल्ली येथे नवीन मुख्यमंत्री निवडण्याबाबत धावाधाव चालू असताना ते हैद्राबाद येथे आपल्या घरी बसून होते. त्यांचे नाव चर्चिले जात आहे असे त्यांना बातमीदारानी फोनवरून कळवल्यावर ते म्हणाले, माझी पात्रता असेल तर माझ्यावर ही जबाबदारी सोपवली जाईलच. दिल्लीहून त्यांना फोन करून बोलावून घेतल्यावरच ते दिल्लीला गेले आणि हैद्राबादला ते परत आले त्या वेळी ते घोषित मुख्यमंत्री होते!

## □ मानवी देहाच्या सांगाड्यांचे व्यापारी !

वैद्यकीय महाविद्यालयातून मानवी देहाचे सांगाडे अभ्यासासाठी लागतातच. असे सागाडे उपलब्ध करून देण्याची जबाबदारी कलकत्त्याच्या सहा व्यापारी फर्मस पार पाडतात. केवळ देशामधील वैद्यकीय महाविद्यालयांची गरज या संस्था भागवतात असे नाही तर भारतीय माणसाच्या मृतदेहापासून बनवलेले सांगाडे परदेशी पाठवून या व्यापारी फर्मस् परकीय चलनही मिळवून देतात. त्यानी तयार केलेल्या या सांगाड्यांना अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया यांसारख्या देशांत, तसेच युरोपमध्ये सर्वत्र चागली मागणी आहे. सर्वांत जास्त मागणी अमेरिकेकडून असून परदेशी जाणाऱ्या या 'मालापैकी' ६५ ते ७० टक्के माल केवळ अमेरिकेमध्ये जातो.

हे सागाडे बनवायचे म्हणजे मृतदेह मिळवावाच लागतो. सांगाड्यासाठी मृतदेह मिळवतात तरी कसे हे पाहणे मोठे मनोरंजक आहे. सांगाडे बनवणाऱ्या या संस्थांना मृतदेह पुरवणारे दलाल आहेत. हे दलाल प्रत्यक्ष मृतदेह आणून देणाऱ्या इसमावर अवलंबून असतात या इसमांना कलेक्टर्स म्हणतात ! आता मृतदेह आणायचे म्हणजे काय सोपी गोष्ट आहे ? नातेवाइकानी दारिद्र्यामुळे आपण होऊन मृतदेह दिला असे क्वचितच होते. स्वाभाविकपणे या कलेक्टर्सना मृतदेह मिळवण्यासाठी खूपच धडपड करावी लागते. असे तयार मृतदेह मिळवून देणारा भाग म्हणजे नदीकिनारी असलेली बिहारमधील गावे, तसेच ओरिसामधील काही गावे. या नदीकिनाऱ्यांवर कलेक्टर्स मंडळीचे बारीक लक्ष असते. या गावातून इच्छा असली तरी दारिद्र्यामुळे अनेक मंडळीना आपल्या आप्ताचा मृतदेह जाळणे परवडत नाही. त्यावर तोड म्हणून त्यानी एक साधा उपाय काढला आहे. मृतदेहाच्या तोंडावर लाकडाचा तुकडा ठेवून आणि तो दगडविटानी बांधून मृतदेह गंगेत सोडण्यात येतो. काही दिवसांनी ते प्रेत फुगून वर येते आणि गंगेच्या किनाऱ्यावर लक्ष ठेवून असलेल्या या कलेक्टर्सना तयार माल मिळतो. पोलिसांना थोडी चिरीमिरी दिली जाते. मृतदेहाबाबत २–३ दिवसात तक्रार आली नाही की, पोलीस हरकत घेत नाहीत. मग सडलेला हा मृतदेह कलकत्त्याला संबंधित व्यापाऱ्यांकडे पाठवण्यात येतो. सर्व मांस सडून गेल्यावर मग हाडे मोकळी



हाडं जितकी मजबूत तितकी किंमत जास्त !

करण्यात येऊन या कामात पारांगत असलेल्या कारागिरांकडून सांगाडा बनवण्यात येतो. या सांगाड्याची किंमत कशी ठरवण्यात येते ? असा प्रश्न एका व्यापाऱ्याला विचारल्यावर त्याने उत्तर दिले की, हाडे जितकी मजबूत तितकी किंमत जास्त ! दलालाला प्रथम श्रेणीच्या सांगाड्यासाठी साधारणपणे हजार रुपये दिले जातात. त्यातील ३०० रुपये तो कलेक्टरला देतो. ही किंमत साधारणपणे कमाल एक हजार ते किमान चारशे रुपये अशी असून सांगाड्याच्या वर्गवारीप्रमाणे ती देण्यात येते. या सांगाड्यावर अंतिम संस्करण कलकत्त्यामधील संबंधित व्यापारी संस्थेकडून केले जाते. एक हजार रुपये दलालाला दिल्यावर व्यापारी हा सांगाडा साधारणपणे १७०० ते १८०० रुपयांस विकतात. सर्वसाधारणपणे प्रत्येक सांगाड्यामागे त्यांना २५० ते ५०० रुपये इतका किमान नफा मिळतो आणि सरासरी दरमहा २५ तो ३० सांगाड्यांची विक्री होते. सांगाड्याची जुळणी करणारे कामगार प्रत्येक फर्ममध्ये असून त्यांनाही त्यांच्या योग्यतेप्रमाणे मासिक वेतन दिले जाते. किमानवेतन सर्वसाधारणपणे २५० ते ३०० रुपये असून उत्तम अनुभवी कारागिराला दरमहा एक हजार रुपये दिले जातात. मानवी हाडांची जुळणी करून हे सांगाडे उभे करणाऱ्या कारागिरांना काय वाटते ? प्रारंभी किळस वाटली तरी आपल्याला अजिबात भीती वाटत नसल्याचे अजितबाबू या कामगाराने बोलून दाखवले. पोटापाण्याचा एक व्यवसाय याच दृष्टीने आपण या व्यवसायाकडे पाहतो असेही त्याने स्पष्ट केले. भुताखेताचा कधी अनुभव आला का ? असा प्रश्न जवळजवळ वीस कामगारांना विचारण्यात आला; परंतु असा कोणताही अनुभव आला नसल्याचे त्यांनी निक्षून सांगितले. एका फर्मचे मालक असीमभाई यांनी मात्र याबाबत एक आठवण सांगितली. ते म्हणाले, १९८० साली आमच्याकडे एक सांगाडा आला. आम्ही नेहमीच्या सर्व प्रक्रिया केल्या; परंतु सांगाड्याची जुळणी मनाप्रमाणे होईना. आमच्या एका कामगाराला स्वप्न पडले. कोणत्या तरी अद्भुतशक्तीने त्याला तो सांगाडा गंगार्पण करावा असे सुचवले आणि आम्ही सामान्यतः या गोष्टीवर विश्वास ठेवत नसलो तरी उगाच चर्चेला वाव मिळू नये आणि कामगारांमध्ये घबराट होऊ नये म्हणून आम्ही तो सांगाडा गुपचूपपणे गंगेमध्ये सोडून दिला. कामगारांशी बोलताना आणखी एक गोष्ट जाणवली ती म्हणजे बहुसंख्य कामगार एका विशिष्ट जमातीमधील असून त्यांना समाजाबाहेर रोटीबेटी व्यवहार करता येत नाही. स्वाभाविकपणे सांगाडे बनवणाऱ्या या सर्वच मंडळींचा एक गट तयार झाला असून ते सर्व एकमेकांना सांभाळून घेतात. अशा प्रकारचे सांगाडे कुठे तयार होतात ? असा प्रश्न एका फर्मचे मालक बी. सी. बखारिया यांना विचारला असता ते म्हणाले की, नाव घ्यावे इतक्या मोठ्या प्रमाणात असे सांगाडे फक्त मॅक्सिको येथे तयार होतात. मृतदेह मिळवण्यात येणाऱ्या अडचणींखेरीज अन्य कोणते प्रश्न आहेत का ? या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, अलीकडे प्लॅस्टिकचे सांगाडे वापरले जातात खरे; परंतु या सांगाड्यांची जाणवण्याइतकी स्पर्धा नाही. याचे कारण वैद्यकीय महाविद्यालये व संशोधनसंस्था मानवी सांगाड्याबाबत आग्रही असतात. हा व्यवसाय करणारी आपली तिसरी पिढी असून आता हे सारे आमच्या अंगवळणी पडले आहे. व्यवसायाला उपकारक अशा स्वरूपाचे हे काम असल्यामुळे आपल्यापरीने आम्ही मानवजातीची सेवा करतो अशीच आमची भावना आहे. आम्हाला विशेष उपद्रव नसला तरी कामगारांना अगदीच एकमार्गी जीवन जगावे लागते असेही त्यांनी सांगितले. □

'माणूस'च्या १४ ऑगस्ट अंकात 'अणुबाँबची भयानकता' हा डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर यांचा लेख प्रसिद्ध झाला होता. विसाव्या शतकात जगणाऱ्या प्रत्येकानं विचार करावा असा हा विषय.

म्हणून या विषयात वाचकांना सहभागी करून घेण्यासाठी एक निवेदन छापलं, काही प्रश्न समोर ठेवले.

वाचकांचा प्रतिसाद अपेक्षिल्याप्रमाणेच चांगला आला. त्यातल्या काही निवडक प्रतिक्रिया या अंकात दिल्या आहेत.

राहिलेल्या पुढील अंकात.




# अणुबाँब

## वाचक-चर्चा

## शांततेसाठी अणुबाँब-प्रचंड विरोधाभास !

**प्रा. श्री. द. महाजन,**
विभागप्रमुख-जीवशास्त्र, जी. के. गोखले कॉलेज, कोल्हापूर

शांततेसाठी अणुबाँब या भूमिकेमध्ये निश्चितपणे स्पष्ट विरोधाभास आहे. अगदी ऐतिहासिक काळापासून पाहिले तरी सर्वच राष्ट्रांना संरक्षणविचार करावा लागतो आणि लष्कर बाळगावे लागते. अगदी शांतताप्रिय राष्ट्रेसुद्धा यातून सुटू शकत नाहीत. कारण शांतता कधी एकतर्फी प्रस्थापित होत नसते. दुसऱ्या राष्ट्राने आक्रमण करावयास धजू नये आणि त्यामुळे शांतता भंग होऊ नये म्हणून आणि आक्रमण केलेच तर स्वसंरक्षणार्थ म्हणजेच पर्यायाने शांतता-प्रस्थापनेसाठी प्रत्येक राष्ट्राला स्वसंरक्षणदले सुसज्ज ठेवावी लागतात; परंतु संरक्षण-सामर्थ्याचा समतोल ढळला आणि सैनिकीकरणाची चढाओढ सुरू झाली म्हणजे त्यातूनच युद्धाची ठिणगी पडते, हे ऐतिहासिक सत्य आहे. दुसऱ्या महायुद्धापूर्वीपर्यंत अशा युद्धांमध्ये हजारो सैनिक मारले जात आणि जित व जेते या दोघांचेही नुकसान होत असे; परंतु सर्वसामान्यपणे हे युद्ध सैनिकांमध्येच खेळले जात असे आणि सामान्य नागरिकांना युद्धाची प्रत्यक्ष झळ विशेष लागत नसे. येथपर्यंत शांततेसाठी लष्करी सामर्थ्य हे तत्त्व ठीक होते; परंतु दुसऱ्या महायुद्धामध्ये युद्धशास्त्रामध्ये प्रचंड परिवर्तन झाले – बाँब-फेकी विमाने, रॉकेटस्, मिसाइलस् विनाशिका आणि या सर्वांवर कळस म्हणजे अणुबाँबचा शोध व त्याचा वापर-यामुळे अपरिमित जीवितहानी झाली. १९४५ साली हिरोशिमा व नागासाकी येथे टाकल्या गेलेल्या अणु-बाँबमुळे कदाचित दुसरे महायुद्ध लवकर संपुष्टात आले असेल, अर्थात् शांतताप्रस्थापनेला मदत झालीही असेल, नाही असे नाही; परंतु अणुबाँबची भीषण संहारकता, त्याचे मानवी जीवनावर व इतर सजीवांवर होणारे दूरगामी दुष्परिणाम पाहिले म्हणजे 'शांततेसाठी अणुबाँब' हे शब्द एकत्र उच्चारावेसेसुद्धा वाटत नाहीत !

त्यानंतरच्या काळात तर हायड्रोजन-बाँब, न्यूट्रॉन-बाँब यांसारख्या अणुबाँबच्या अतिभयंकर व महासंहारक आवृत्त्या तयार झाल्या आहेत. अनेक राष्ट्रांमध्ये त्यांचे प्रचंड साठे निर्माण झाले असून प्रचंड

व जीवघेणी अणुस्पर्धा सुरू झाली आहे. नवनवी राष्ट्रे त्यात अहमहमिकेने भाग घेण्यासाठी सरसावत आहेत. अशा परिस्थितीत जर तिसरे महायुद्ध झाले आणि अशा स्पर्धेचा तो अटळ परिपाकच असतो, तर काय होईल ? संपूर्ण मानवजातीचा, कदाचित् पृथ्वीवरील सर्व जीवसृष्टीचा सर्वनाश होईल ! मानवजात नामशेष होईल यात तिळमात्र शंका नाही ! पक्ष्यांची किलबिल, बालकांचे हास्य व बोबडे बोल, प्रेमिकांच्या गुजगोष्टी, रस्त्यावरील रहदारी, इतकेच काय पण विमानांची घरघर व प्रत्यक्ष अणुबाँब वापरणारे हात—सारे काही शांत शांत, थंड थंड होऊन जाईल ! अशा अर्थाने "शांततेसाठी" अणुबाँब–अगदी चिरशांतीसाठी अणुबाँब उपयोगी पडेल !

'युद्धस्य कथा रम्या' म्हणतात. कोठे तरी दूरदेशी युद्ध चालले आहे, सैनिक एकमेकांशी लढताहेत, आपल्या जवळचे कोणी सैन्यात नसावे, आपल्या देशाची किंवा आपल्या मित्रराष्ट्राची सरशी होत असावी म्हणजे युद्धाच्या गोष्टी रंजक वाटतात, हे ठीक आहे. अणुयुद्धाच्या गोष्टी सांगायला, ऐकायला कोणीच उरणार नाही—ना लिहायला ना वाचायला ! मुळात युद्ध हा मानवतेला लागलेला एक कलंक आहे—एक शाप आहे. त्यातून अणुयुद्ध हा तर महाभयंकर शाप ठरेल ! अगदी उःशाप नसलेला शाप ठरेल ! शांततेसाठी अणुयुद्ध म्हणजे डोकेदुखी थांबवण्यासाठी डोके उडविणे किंवा रोगाचे 'समूळ' उच्चाटन करण्यासाठी आत्महत्या करण्यासारखे आहे !

'शांततेसाठी अणुबॉम्ब' ही सत्तास्पर्धेतल्या बड्या राष्ट्रांची एक सोयिस्कर पळवाट आहे. आपणच प्रतिस्पर्ध्यापेक्षा अधिक समर्थ व्हावे, जगाचे स्वामी व्हावे अशी लालसा–साम्राज्यवादी लालसा—म्हणा वाटले तर—त्याच्यामागे आहे. अगदी साम्यवादी रशियासुद्धा त्यातून सुटलेला नाही ! अमेरिकेत अणुअस्त्राविरुद्ध चळवळ उभी राहिली आहे, लोकमत तयार करून शासनावर त्याचा प्रभाव पाडण्यासाठी निदर्शने आदी मार्गांनी प्रयत्न सुरू आहेत. रशियाच्या पोलादी चौकटीमध्ये हेही कठीण दिसते. मानवतेचा विचार करण्याच्या मनःस्थितीत कोणतेही राष्ट्रधुरीण दिसत नाहीत. अण्वस्त्रबंदीचा आंतरराष्ट्रीय करार वगैरे होणे व त्याची सर्वांकडून कार्यवाही होणे ही शांततेसाठी खरी आवश्यकता आहे; पण तसे होण्याची सुतराम शक्यता नजीकच्या भविष्यकाळात तरी दिसत नाही. तोपर्यंत आणि अणुयुद्ध होत नाही तोपर्यंत—जिवात जीव आहे तोपर्यंत 'शांततेसाठी अणुबाँब' ह्या भूमिकेतला विरोधाभास प्रत्येकाने समजून घेणे, दुसऱ्याला समजावून सांगणे, सार्वत्रिक जनजागृती करून त्याचा जबरदस्त प्रभाव प्रत्यक्ष किंवा निवडणुकाद्वारे राज्यकर्त्यांवर पाडणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे ! 'शांततेसाठी अणुबाँब' हे तत्त्व अणुबाँबइतकेच, काकणभर अधिकच हानिकारक आहे, विध्वंसक आहे, ह्याची जाणीव सर्वांना ज्या दिवशी होईल—नुसती जाणीव नव्हे तर कार्यवाही होईल तोच सुदिन ! सर्व राष्ट्रांकडे असलेले सर्व अण्वस्त्रसाठे निकामी करून दूर—अतिदूर अगदी सूर्यमालेच्या बाहेर नेऊन टाकण्यासाठी प्रचंड यंत्रणा उभारावी लागली व त्यासाठी संरक्षणखर्चाचे सर्व जागतिक बजेट खर्ची पडले तरी शांततेसाठी, मानवाच्या अस्तित्वासाठी व भविष्यकालासाठी ते करणे उचितच आहे !

□

# शांततेसाठी अणुबाँब ? फसवणूकच !

**नंदकुमार आचळे**
ग्रंथपाल, कृषिमहाविद्यालय, धुळे

अणुबाँबची भयानक विध्वंसक शक्ती आता सर्वमान्य झालेली आहेच. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात १९४५ मध्ये जपानमधील हिरोशिमा व नागासाकी या शहरांमधील असंख्य निष्पाप नागरिकांनी अणुबाँबच्या स्फोटाचे जे भयंकर परिणाम भोगले ते सर्व मानवजातीच्या दृष्टीने प्रातिनिधिक स्वरूपाचे आहेत.

'Hiroshima and Nagasaki. The Fate of The Earth'


इ. पुस्तकातून जपानी नागरिकांचे क्रंदन, दुःख व झालेले हाल वाचताना अंगावर काटा येतो. २५ जुलै १९८२ च्या Indian Express मध्ये व १४ ऑगस्ट १९८२ च्या 'माणूस'मध्ये ते वर्णन अंशात्मक स्वरूपात वाचावयास मिळाले तरी त्यावरून अणुयुद्धाचे गंभीर, भयंकर परिणाम लक्षात येऊ शकतात.


जोनाथन इस्थेल (Schell) नावाच्या लेखकाने पृथ्वीचे प्रारब्ध The fate of the earth हे पुस्तक लिहून या विषयाला आणखी गती दिली आहे. अणुयुद्धामुळे होऊ शकणारे भयंकर, विध्वंसक परिणाम जगापुढे ठेवून अखिल मानवजातीला अणुबाँब नष्ट करण्यासाठी प्रयत्न करण्याचेच एक आवाहन केले आहे. (संदर्भः २५ जुलै १९८२ च्या Indian Express मधील सदरहू पुस्तकाचे श्री. कार्लेकर यांनी केलेले परीक्षण).

अणुयुद्धामुळे लाखो लोक प्राणास मुकतील व जे जिवंत राहू शकतील त्यांचे इतके आत्यंतिक हाल होतील की, रशियाचे दिवंगत नेते निकिता ख्रुश्चेव्ह यांनी काढलेले अत्यंत दारुण उद्‌गार 'जिवंत व्यक्ती मेलेल्या व्यक्तींचाही हेवा करतील' खरे ठरतील.

सर्वसामान्य माणूससुद्धा अणुयुद्धाच्या भीतीने काळवंडून जात आहे. सत्तापिपासु शासनकर्ते अणुयुद्धाचा भडका केव्हा उडवून देतील याचा नेम नाही. अखिल मानवजातीचे भवितव्य व पृथ्वीचे प्रारब्ध हे महत्त्वाकांक्षी राज्यकर्ते अणुबाँबच्या सहाय्याने आपल्या हातात घेऊन बसले आहेत. अणुशक्तीचा उपयोग विकासासाठी, मानवाच्या कल्याणासाठी व शांततेसाठी केला जाईल अशी कितीही आश्वासने राज्यकर्त्यांनी दिली तरी त्याच्या भूलथापांना सामान्य माणसाने बळी पडू नये, यासाठी युरोप-अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर जागृती केली जात आहे. बुद्धिजीवीवर्गाचे ते कार्यच आहे व काळाचीही ती गरज आहे, मानवजातीच्या विकासाची वाटचाल, प्रगतीची पावले, सर्वसामान्य जनतेस बुद्धिजीवी वर्गाने दाखविणे जेवढे आवश्यक आहे तेवढेच किंवा त्याहीपेक्षा महत्त्वाचे असे कार्य म्हणजे मानवजातीला विनाशाकडे नेणारे मार्ग वेळीच दाखवून सामान्य जनतेस धोक्याचे इशारे देऊन जागे करणे, त्यांचा विनाश टाळणे हे होय. आज अणुबाँबविरुद्ध जागृतीचे असे कार्य सुरू झालेले आहे ही एक मोठी आशादायक व समाधानकारक घटना आहे. प्रत्येक गोष्टीचे फायदे सांगताना त्याचे तोटे व इतर होऊ शकणारे वाईट परिणामही

पृष्ठ २८ वर





# महात्मा आणि माणूस

२७ मार्च १९३१–काँग्रेसचं पंचेचाळिसावं अधिवेशन कराचीत सुरू झालं.
प्रत्यक्ष अधिवेशनावर गांधींचीच हुकमत होती. तरीही ब्रिटिशांशी बोलणी करण्याचे पूर्ण अधिकार गांधींना देण्याबद्दल अनेक प्रतिनिधींनी विरोध दर्शविला.
आपल्या अधिकारांचा असा संकोच गांधींना मान्य झाला नाही.
लंडनच्या परिषदेत गांधी एकटेच काँग्रेसचं प्रतिनिधित्व करणार होते.

३१ च्या एप्रिल महिन्यात व्हाइसरॉय बदलला.
लॉर्ड आर्यविनच्या जागी लॉर्ड विलिंग्डन आले.
शपथविधीचा थाट और होता; पण त्या दिवशी 'हिरो' मात्र गांधीच होते!

**'गांधी–अ मेमॉर'–विल्यम शिरर**
लिखित पुस्तकाचा परिचयात्मक
संक्षेप व स्वैर रूपांतर
**भाग सातवा । निखिल वागळे**

विलक्षण!

सिमला शहराचं वर्णन याच शब्दात होऊ शकतं. प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय हे अनोखेपण कळायचं नाही!

–आणि आता खुद्द गांधी सिमल्यात.

हे तर त्याहून विलक्षण!

तापणाऱ्या आणि तापवणाऱ्या भारतीय भूप्रदेशापासून आठ हजार मैल उंचीवर असलेला हा प्रदेश म्हणजे इंग्लंडचीच प्रतिकृती. ब्रिटिश भारतातल्या अंतर्विरोधांची ही परिसीमाच. गोरे राज्यकर्ते आपल्या काळ्या प्रजेपासून किती दूर आहेत हे इथल्या थंडीत पूर्णपणे स्पष्ट होत होतं. वर्षातले सात महिने गोरे अधिकारी सपत्नीक इथल्या हिरव्यागार थंडाव्याचा आस्वाद घ्यायचे. १८६४ मध्ये सर जॉन लॉरेन्स हा व्हाइसरॉय आणि त्याचे अधिकारी उन्हाळा असह्य होऊन पहिल्यांदा इथे आले. त्यांच्यापाठोपाठ त्यांच्या बायका, नोकर–चाकर आणि सरकारी कागदपत्रंसुद्धा! मार्चच्या अखेरीला आलेली ही मंडळी ऑक्टोबर संपेपर्यंत तळ ठोकून होती.

तेव्हापासून या रिवाजात खंड पडलेला नव्हता. सुरुवातीला पहाडाच्या या कुशीत दळणवळणाची साधनं नव्हती. कलका ते सिमला या साठ मैलांच्या प्रदेशात रस्ता बांधण्यात गोरे इंजिनियरही फारसे यशस्वी झाले नव्हते. अखेर १९०३ साली हजारो पौंडस खर्च करून या भागात एक नॅरो–गेज लोहमार्ग तयार करण्यात आला. मग मात्र सिमला ब्रिटिशांच्या दृष्टीनं उन्हाळ्यातली राजधानी झाली!

कलकाहून सिमल्याला येणं हे एक दिव्यच होतं. एकापाठोपाठ

एक शेकडो बोगदे आणि दुसरीकडे गरगरवणाऱ्या दऱ्या; पण एकदा का शेवटचा बोगदा पार पडला आणि सिमल्याचं दर्शन झालं की ही भीती पार पळून जाई. उत्तरेला आकाशाला भिडू पहाणारी हिमशिखरं आणि घनदाट देवदारवृक्ष यांच्या कोंदणात बसवलेला जणू हा हिराच ! अक्षरशः श्वास रोखून निरखावं असं सौंदर्य !!

पण सिमल्यातल्या अनेक गोष्टी धक्कादायक होत्या, रक्त तापवणाऱ्या होत्या. माझ्या दृष्टीनं तर तो उन्हाळा कासावीस करणारा होता. कधी एकदा इथून निघता येईल अशा विचारात मी होतो.

खरं तर मी ज्या सेसिल हॉटेलमध्ये उतरलो होतो ते भारतातलं एक उत्कृष्ट हॉटेल होतं. रोज संध्याकाळी इथल्या बॉलरूममध्ये गोरे पुरुष आणि बायका नृत्य करत. त्याचा पोशाखही ठरलेला. बायकाचे गाउन्स तर पुरुषाचे पांढरे टाय आणि हातमोजे. कधीकधी त्यांच्यापैकी काहीजणांना व्हाइसरॉयच्या घरी नृत्यासाठी बोलावलं जाई ही निवड सामाजिक प्रतिष्ठेनुसार होई व्हाइसरॉयच्या घरचं नृत्य हा महत्त्वाचा समारंभ मानला जात असे. या समारंभाला सर्वांनी गणवेषात किंवा ठरलेल्या पोषाखात यावं असा दंडक असे. कमांडर-इन-चीफ आणि पंजाबचे गव्हर्नरही त्या वेळी सिमल्यात असत. त्यांच्या घरीही असाच समारंभ होई

मोटार वापरण्याबद्दलही तेव्हा कायदा होता. व्हाइसरॉय, कमांडर-इन-चीफ आणि पंजाबचे गव्हर्नर यानाच ही परवानगी होती. इतरानी हमालानी ओढलेली रिक्षा वापरावी किंवा सरळ चालत जावं घोडा फक्त डोंगरकपारीत. शहरात नाही.

शहरात रस्ता एकमेव. साधारण मैलभराच्या या परिसरात चर्च, बँका, दुकानं भरपूर होती गोरी मंडळी दिवसातून एकदा इथे येत, आपला 'स्टेटसमन्' किंवा 'टाइम्स' घेत. जाताजाता दोन-चार गप्पा आणि चहाच्या दुकानात एखादी बैठकही होई रविवारी सकाळी सर्वांचा दौरा चर्चकडे. व्हाइसरॉय आणि इतर वरिष्ठ अधिकारीही ही प्रवचनं चुकवत नसत.

या रस्त्यावर जणू इंग्रजाचा हक्क होता ! महायुद्धापर्यंत भारतीयांना इथे पाय ठेवायचीही परवानगी नव्हती, असं मला काही जुन्या मंडळींनी सांगितलं. आत्ता काळ बदलला होता हे जरी खरं असलं तरी सर्व भारतीय काही या रस्त्यावरून जाऊ शकत नव्हते कपडे व्यवस्थित असतील तरच भारतीयाना तिथून जायची परवानगी मिळे. त्या उन्हाळ्यात तिथून जाणाऱ्या अनेक गरीब भारतीयांचा पोलीस पाठलाग करताना मी पाहिलं.

खेळ आणि मैदानं याचीही वानवा नव्हती. पोलो, क्रिकेट, टेनिस खेळण्यात दिवस-दिवस जायचे. फार झालं तर गोरे अधिकारी रेसवरही पैसे लावत नेमबाजीची मजा तर औरच ! 'मोठा धमालीचा खेळ आहे !' चित्ता, काळवीट किंवा अस्वलाची शिकार साधताना गोरे अधिकारी म्हणत.

डोंगराच्या चढ-उतारावर छाती फाटेपर्यंत रिक्षा ओढणाऱ्यांचं, ओझी ढोणाऱ्यांच जीवन मात्र मजेशीर नक्कीच नव्हतं. जे सामान इतर ठिकाणी ट्रकमधून नेलं जातं त्याची वाहतूक इथे हे काश्मिरी पठाण करत. त्याचे हाल अक्षरशः बघवत नसत ! ते दृश्य मी कधी विसरूच शकणार नाही. किती ओझं त्यांनी वाहून न्यावं याला काही मर्यादाच नव्हती !

त्या उन्हाळ्यात नगरपालिकेतल्या भारतीय प्रतिनिधींनी याबाबत एक कायदा करण्याचा प्रयत्न केला. कोणत्याही परिस्थितीत एका हमालाकडचं ओझं ८६ पौंडापेक्षा (एक मण) अधिक असू नये असं त्यात म्हटलं होतं; पण गोऱ्या अधिकाऱ्यांनी हा कायदा फेटाळून लावला !

अलाबादहून प्रसिद्ध होणाऱ्या 'द पायोनियर' या पत्राची संपादिका एक गोरीबाई होती. ब्रिटिशांनी हा कायदा धुडकावल्याचं पाहून तिला धक्काच बसला. खूप वाईटही वाटलं.

'भारतातल्या दीर्घ वास्तव्यामुळं ब्रिटिशांच्या चांगल्या भावनाच बोथट झाल्या आहेत !' तिनं लिहिलं. आपल्या एका मैत्रिणीची गोष्टही तिनं सांगितली. ही मैत्रिण सिमल्यात पहिल्यादाच आली होती. अवजड पियानो वाहून नेण्यासाठी धडपडणारे हे हमाल पाहून तिला धक्काच बसला. सुसंस्कृतपणावरचा हा काळा डाग आहे असं तिला वाटलं.

या गोऱ्या संपादिकेनं नगरपालिकेतल्या भारतीयांना पाठिंबा दिला. 'जास्तीत जास्त ओझं एक मण असावं. सध्या हे हमाल तीन ते चार मण ढोताहेत !' तिनं पुढं म्हटलं.

तीन मण...म्हणजे २५८ पौंड आणि चार मण...म्हणजे ३४४ पौंड...मी फक्त स्वत:शीच हिशोब केला !

◻

अगदी व्हाइसरॉयच्या आगमनाची वेळ साधून मी सिमल्याला पोचलो. हिवताप आणि हगवणीने पार बेजार झालो होतो हवापालट म्हणून डॉक्टरांनीच सिमल्याला जायचा सल्ला दिला. मलाही लॉर्ड विलिंग्डन काय माणूस आहे हे जाणून घ्यायची इच्छा होती लंडनच्या सरकारनं गांधीशी वाटाघाटी कराव्यात म्हणून तो अनुकूल वातावरण निर्माण करतोय की नाही हेही चाचपायचं होतं. गांधीही थोड्या दिवसांनी सिमल्याला येणार होते. विलिंग्डन मुंबईत त्यांच्याशी ज्या तऱ्हेनं वागला होता, त्यावरून ते फारसे आशावादी नव्हते. 'क्षितिजावर अपशकुनाची चिन्हं दिसताहेत...' त्यांनी त्या आठवड्यात 'यंग इंडिया'त म्हटलं होत.

हिमालयाच्या कुशीतल्या त्या विरळ हवेतही व्हाइसरॉयच्या स्वागतसमारंभाचा भपका कायम होता. तोफांची सलामी लॉर्ड आणि लेडी विलिंग्डननी आपल्या सोनेरी गाडीतून स्वीकारली. हिरवळीवर ऐटबाज पोशाखातले हजारो गोरे अधिकारी सपत्नीक जमले होते. पोशाखाविषयीच्या खास सूचना आमंत्रणपत्रिकेत देण्यात आल्या होत्या.

## शिररला दिसलेला विलिंग्डन

मी मात्र माझ्याकडे असलेला त्यातल्या त्यात बरा पांढरा सूट घालून गेलो होतो. सहाजिकच त्या दिवशी मला व्हाइसरॉयशी संपर्क साधता आला नाही. त्या 'तशा' कपड्यात मला व्हाइसरॉयच्या जवळपास फिरकू द्यायची कुणाचीच तयारी नव्हती !

पण नंतर त्या आठवड्यात मला व्हाइसरॉयनं जेवणाचं निमंत्रण दिलं. पोशाखाबद्दलही त्याच्या फारशा काही अटी नव्हत्या.

भारताबद्दल मी आजवर जे जे काही लिहिलं होतं त्यावर सरकारी गोटाचा राग होता. त्या मानानं व्हाइसरॉयन माझं हार्दिक स्वागत केलं. ब्रिटिश साम्राज्याचं रक्षण करण्यात धन्यता मानणाऱ्यांपेक्षा तो फारसा वेगळा वाटला नाही. काहीसा भपकेबाज आणि

उथळही ! मुंबई प्रांताचा किंवा कॅनडाचा गव्हर्नर–जनरल म्हणून त्याने आपला काही खास ठसा उमटवला होता अशातलाही प्रकार नाही. ब्रिटिश साम्राज्यात बढतीसाठी जे काही लागतं ते सारं त्याच्याकडे होतं इतकंच ! आता तो सर्वोच्च पदावर होता आणि पुढची पाच वर्षं भारतावर राज्य करायचं ही कल्पना त्याला सुखदायक वाटत होती; पण भारतातल्या राष्ट्रीय चळवळीची खोली त्याला उमगली असल्याचं काही मला दिसलं नाही. भारतातल्या अनेक राजकारण्यांपैकी गांधी एक होते आणि तीच परिस्थिती काँग्रेसची असं तो मला पुन्हा पुन्हा सांगत होता. आपण गांधींचा गंभीरपणे विचार करतो आहोत असं त्याला माझ्यापुढं दाखवायचं नव्हतं; पण त्याच्या शब्दांतून ते मला जाणवलंच. गांधी गोलमेज परिषदेला जातील की नाही याच मुद्द्यावर तो एकसारखा येत होता. लंडनमधल्या सत्ताधिशांकडून तशी एकसारखी विचारणा होत असावी !

'तुम्ही गांधींना खूप चांगलं ओळखता, नाही का ?' त्यानं विचारलं; पण त्याला तो प्रश्न अभिप्रेत नसावा. मी गांधींना चांगला ओळखतो याबद्दल त्याची खात्री होती. माझ्या बातमीपत्राबद्दल त्याला सांगण्यात आलं होतं.

'गांधींना मी चांगला ओळखतो असं पाश्चिमात्य माणूस म्हणू शकेलसं मला वाटत नाही ' मी उत्तरलो. नंतर थोडा वेळ थांबून मुद्दामहून पुढं म्हटलं, 'अगदी तुमचे वरिष्ठ अधिकारीसुद्धा हे म्हणू शकणार नाहीत.'

'खरंच तुम्हाला असं वाटतं ?' तो सहजपणे मिशीला पीळ देत म्हणाला ...

त्या वेळी आणि पुढे दोन–तीनदा मी व्हाइसरॉयच्या घरी गेलो; पण लॉर्ड आयर्विनला जी कल्पनाशक्ती, जी तल्लख बुद्धी होती ती विलिंग्डना नाही असं माझं मत झालं. फार फार तर काय तो लंडनच्या आदेशावर नाचेल आणि स्वराज्याच्या लढ्याची प्रगती मंद करण्याचा प्रयत्न करेल असा मी विचार केला.

¤

तेरा मेला गांधी सिमल्याला पोचले आणि एकेक अशा घटना घडत गेल्या ज्या त्या खास इंग्लिश खाक्यातल्या राजधानीनं कधीच पाहिल्या नव्हत्या. थोड्या दिवसांसाठी का होईना सिमल्यावर एक भारतीयत्व पसरलं. हे भारतीयत्व पोलो खेळणाऱ्या, पार्ट्या झोडणाऱ्या सत्ताधाऱ्यांना नवं होतं.

१९२१ नंतर गांधी पहिल्यांदाच सिमल्यात येत होते. त्या वेळी पंजाबमधले सरकारी अत्याचार बंद झाले नाहीत तर कायदेभंग-चळवळ चालू राहील असं व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंगला सांगायला ते आले होते. रीडिंगनं त्या बदल्यात त्यांना तुरुंगात टाकलं आणि सहा वर्षांची सजा दिली होती !

आता दहा वर्षांनंतर हे पहाडी लोक या महात्म्याचं स्वागत कसं करताहेत हे पहायला मी डोंगर उतरून कलकाला गेलो. काहीही फरक नव्हता. देशातल्या इतर भागात जे मी पाहिलं होतं नेमकं तेच दृश्य, तोच जयघोष !

सिमला एक्स्प्रेसमधून गांधी उतरले आणि एका छोट्या मोटारीत बसले. प्रत्येक नाक्यावर त्यांच्यावर फुलांचा वर्षाव होत होता. 'बेताज बादशा की जय !'–'अनभिषिक्त राजाचा विजय असो !'–ही एकमेव घोषणा त्या पहाडाच्या कुशीत निनादत होती. गांधींना एकीकडून कस्तुरबांनी धरलं होतं तर दुसरीकडून मिस स्लेडनी. गांधींबरोबर एका 'गोऱ्या बाईला' पाहून जमावातल्या काहीजणांना आश्चर्य वाटलं; पण त्यामुळं त्यांच्या उत्साहात मात्र फरक पडला नाही।

दोनेक तासानंतर गाडी सिमल्याला पोचली, तेव्हा शहरातल्या त्या एकमेव रस्त्यावर अनेक गोरे स्त्री–पुरुष जमा झाले होते. मिस स्लेडसारख्या एका गोऱ्या बाईचं गांधींबरोबरचं अस्तित्व त्यांनाही खुपलं असावं. सध्याकाळी सेसिल हॉटेलमध्ये जेवणाच्या वेळी मला त्याबद्दल बरीच शेरेबाजी ऐकायला मिळाली.

गांधींना रस्त्यावरून मोटारीतून जायची परवानगी दिली गेली हेही बऱ्याच जणांना आवडलं नव्हतं. यापूर्वी असं कधीच घडलं नव्हतं. आता निदान व्हाइसरॉयच्या भेटीच्या वेळी तरी त्यांना मोटारीतून जायची परवानगी दिली जाऊ नये वगैरे चर्चा त्या दिवशी सेसिल बारमध्ये चालू होती. भारतीयांचं सोडाच; पण ब्रिटिश-जनरलसाठीसुद्धा यापूर्वी कधी असा कायदा मुरडण्यात आला नव्हता !

गांधींना देण्यात आलेली आणखी एक सवलत गोऱ्या साहेबांना आवडली नव्हती. शहरातल्या मोठ्या चौकात आजवर फक्त कवायतीच होत. तिथे सभा घ्यायची परवानगी गांधींनी मिळवली होती.

'हे भयंकरच म्हणायला हवं ! असंच होत राहिलं तर एक दिवस सकाळी उठल्यावर व्हाइसरॉयनं गांधींना पंतप्रधान केल्याचं आपल्याला समजेल. छे, यावर विश्वासच बसत नाही !'... सेसिलमधली गोऱ्या अधिकाऱ्यांची त्या दिवशीची संध्याकाळ चिंताक्रांतच होती.

नंतर मी गांधींच्या घरी गेलो. प्रवासाचा शीण असूनही ते उत्साहात होते. ते गोलमेज परिषदेला जाणार की नाही याविषयी ब्रिटिशांचे तर्कवितर्क चालू होते. त्यामध्ये हस्तक्षेप करायचा त्यांचा विचार नव्हता. दिल्ली करारामुळे हा प्रश्न सुटलायसं मला वाटत होतं; पण गांधींनी स्पष्टपणे सांगितलं, 'प्रश्न सुटलेला नाही. लंडनला जायचं की नाही हे मी अजून ठरवलेलं नाही अडथळे अनेक आहेत. उदाहरणार्थ, ब्रिटिश दिल्ली कराराच्या अटी पाळत नाहीत. अनेकजण अजूनही तुरुंगात आहेत. मी नुकतेच गृहखात्याच्या सचिवांबरोबर तीन तास घालवले. सरकारनं करार कुठेकुठे मोडला आहे याची यादीच मी त्यांना सादर केली.'

'पण त्याहीपेक्षा महत्त्वाचा अडथळा म्हणजे हिंदू–मुस्लीम प्रश्न !' ते पुढे म्हणाले, 'जोपर्यंत एकात्म भारताचा आवाज माझ्या पाठीशी उभा नाही तोपर्यंत लंडनला जाण्यात मला रस नाही !'

'पण त्यासाठी आता वेळ कुठेय ?' मी विचारलं,

'मी आशावादी आहे.' ते हसतहसत म्हणाले कितीदा त्यांनी मला हे सांगितलं होतं हेच जणू ते आठवत होते. 'या जातीय प्रश्नावर एका पंधरवड्यात तोडगा निघेल असं मला वाटतंय.'

ते खरोखर आशावादी आहेत...त्या वेळी मला वाटलं

लंडनच्या परिषदेनंतर अमेरिकेला भेट द्यायचा गांधींचा विचार आहे का यासंबंधी गेले काही आठवडे शिकागोतल्या माझ्या संपादकांकडून विचारणा होत होती. एका वृत्तसंस्थेने तशी बातमी तिथे दिली

होती. मी त्यांना त्यासंबंधी विचारलं.

'तुमच्या महान देशाला भेट द्यायची माझी इच्छा आहे.' ते म्हणाले, 'तसं एक निमंत्रणही आहे; पण भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत असली चैनबाजी मला करता येणार नाही. अहिंसा आणि प्रेमाचा संदेश मला अमेरिकेत न्यायचाय. त्याआधी भारतात त्याचा विजय झाल्याचं मला अमेरिकन लोकांना दाखवून दिलं पाहिजे; तरच माणूसपणाचे हक्क शांततेनं मिळवण्याच्या आणि बंधुत्वाच्या या हत्याराचं मोल जगाला पटेल!'

मी त्याचा शब्द न् शब्द टिपून घेतला. ते जर अमेरिकेला गेले नाहीत तर त्याचा 'प्रेम आणि अहिंसेचा संदेश' तिथे कसा पोचणार?...मला हे अजबच वाटलं.

¤

त्यानंतर काही दिवस गांधीचा ब्रिटिशांशी पाठशिवणीचा खेळ चालला होता. गोलमेज परिषदेला ते जाणार की नाही हा संभ्रम तसाच कायम होता. गांधीशिवाय परिषदेला काही अर्थ नव्हता; पण व्हाइसरॉय त्याच्याकडून निश्चित असं काहीच कबूल करून घेऊ शकला नाही.

सिमल्याला आल्यानंतर दुसऱ्याच दिवशी गांधींची सभा झाली. सिमल्यातली ती पहिलीच जाहीर सभा. मुसळधार पावसातही दहा हजार लोक गांधीचं भाषण ऐकायला आले होते!

थंडीनं गांधी कुडकुडायला लागले तेव्हा मिस स्लेडनी त्यांच्या खांद्यावर एक शाल टाकली आणि डोक्यावर छत्री धरली.

भाषणात मुद्दे नेहमीचेच पूर्ण स्वराज्य, गोलमेज परिषद, एकजूट वगैरे.

दुसऱ्या दिवशी गांधी लॉर्ड विलिंग्डनला भेटायला गेले तेव्हा त्यांची भूमिका फार टोकाची नव्हती गोलमेज परिषदेबद्दल त्यांनी ताकास तूर लागू दिला नाही हे खरं; पण व्हाइसरॉय एकूण भेटीवर खूष होता असं कळलं.

## भर पावसात गांधी निघाले!

पण सिमल्यातले भारतीय मात्र त्या दिवशी नाराज होते. व्हाइसरॉयनं गांधींना आपल्या घरी आणण्यासाठी मोटारीची व्यवस्था केली नव्हती किंवा त्यांना स्वतःच्या मोटारीतून यायची परवानगी दिली नव्हती. गव्हर्नरजनरलच्या कौन्सिलमध्ये यावर बरीच चर्चा झाल्याचं मला सांगण्यात आलं. गांधींनी रिक्षातून यावं किंवा चालावं हा याच मंडळींचा निर्णय होता.

गांधींनी रिक्षातून जावं म्हणून त्यांच्या मित्रांनी आर्जवं केली; पण ते बधले नाहीत. 'माझ्याच भावंडांनी माझं वजन वाहावं हे मला कधीही सहन होणार नाही! त्यापेक्षा मी चालणं पसंत करीन!' काहीशा कठोरपणे ते म्हणाले.

सहा मैलाचा हा प्रवास. कडाक्याची थंडी. पावसाची संततधार आणि खाचखळगे गांधींना त्याचं काहीच वाटलं नाही. 'मिठाच्या सत्याग्रहासाठी आपण दोनशे मैल चाललो, हे त्यापुढं काय?' असं त्यांनी आम्हा पत्रकारांना विचारलं. डॉक्टरना मात्र गांधींना न्यूमोनिया होतो की काय अशी भीती वाटत होती!

ब्रिटिश अधिकाऱ्याच्या या कद्रूपणाचं मात्र मला दुःख झालं. गांधी एकसष्टीचे होते त्यांच्या अंगात ताप होता. आधीची दगदग तर होतीच. यापैकी एकही गोष्ट या अधिकाऱ्यानी लक्षात घेतली नव्हती. साध्या सौजन्याचा, सभ्यतेचा हा प्रश्न होता. शिष्टाचाराचे साधे नियमही त्यांना पाळता आले नव्हते. भारतावर राज्य करण्याची वासना त्यांना कुठवर नेणार होती कोण जाणे!

गांधींना तसं चिंब भिजलेलं पाहून व्हाइसरॉयला काही वाटलं नसेल असं नाही; पण त्यानं तसं भासवलं नाही. त्याच्या प्रसिद्धि-अधिकाऱ्याला मात्र पत्रकारांनी याबद्दल विचारलेलं रुचलं नाही. गांधींनीही याबाबतचे सगळे प्रश्न हसण्यावारी नेले.

चालण्याच्या श्रमामुळे गांधी ढेपाळले मात्र नव्हते. दिल्ली कराराच्या अटी सरकार पाळत नाही हे त्यांनी विलिंग्डनला स्पष्ट सांगितलं. लंडनला जाण्याबाबतचे इतर अडथळेही त्यांनी मांडले. व्हाइसरॉयनं त्यात लक्ष घालायचं आश्वासन दिलं आणि आपल्याला हवे ते सर्व प्रश्न गांधी परिषदेत उपस्थित करू शकतील असंही सांगितलं.

लॉर्ड विलिंग्डन अपेक्षेपेक्षा अधिक उदारमतवादी असल्याचं गांधींना आढळलं होतं त्यांची चर्चाही मित्रत्वाच्या पातळीवरून झाली. "मी भारताचा पहिला घटनात्मक व्हाइसरॉय होऊ इच्छितो." असं विलिंग्डन म्हणाला तेव्हा गांधींनी उत्तर दिलं, "भारतीयांच्या इच्छा आकांक्षाप्रमाणे सरकारला आकार देऊन तुम्ही आताच तुमच्या राजवटीची सुरुवात करू शकता."

अर्थात व्हाइसरॉय आपलं बोलणं मनावर घेईल अशा भ्रमात गांधी नक्कीच नव्हते. लवकरच त्यांच्या व्हाइसरॉयवरच्या विश्वासाला तडे जायला सुरुवात झाली.

दुसऱ्या दिवशी लेडी विलिंग्डननं कस्तुरबांना बोलावलं होतं. एखाद्या भारतीय नेत्याच्या पत्नीला व्हाइसरॉयच्या पत्नीनं आमंत्रण दिल्याचं त्यापूर्वी कधी घडलं नव्हतं. साहजिकच काही गोरे अधिकारी वैतागले. त्यांच्या बायकांनी नापसंती व्यक्त केली.

कस्तुरबा अशिक्षित असल्या तरी आपल्या पतीच्या राजकीय आशाआकांक्षाच मनात जपत होत्या. लेडी विलिंग्डनबरोबरच्या भेटीत त्याचा प्रत्यय आला.

रिक्षा करून त्या व्हाइसरॉयच्या घरी गेल्या. गांधींनी त्यांना तेवढी सवलत दिली होती.

आपल्याला खादीचं कापड हवंय असं लेडी विलिंग्डननं कस्तुरबांना सांगितलं "भारतीयांच्या जवळ जाण्याचा तो एक प्रयत्न असेल" ती म्हणाली

"मी तुम्हाला खादीचं कापड नक्कीच पाठवीन!" कस्तुरबा उत्तरल्या, "भारतीयांच्या जवळ जायची तुमची कल्पना मला आवडली; पण इथं असं डोंगरावर रहाण्याऐवजी तुम्ही जमिनीवर रहाल तर भारतीयांना अधिक जवळून पाहू शकाल!"

सिमल्याहून गांधी काही दिवसांकरता नैनितालला गेले. ते लंडनला जाणार की नाही याबाबत अजून हवाच होती. आपल्या बोलण्याच्या वेळी गांधींनी जायचं कबूल केलं असं व्हाइसरॉयला वाटलं.

बावीस मेला, त्यांच्या भेटीनंतर आठवडाभरानं, सरकारी गोटात गोंधळाचंच वातावरण होतं लंडनच्या अधिकाऱ्यांनी २९ जून ही तारीख परिषदेसाठी नक्की केली होती. त्याप्रमाणे भारतीय प्रतिनिधींची १९ तारखेची तिकिटही काढली होती; पण बावीस मेला गांधींनी व्हाइसरॉयला तार केली की, निघण्याचा दिवस फार आधी आहे. त्यामुळे हिंदू-मुस्लिम तेढ मिटवायला त्यांना फक्त तीनच

आठवडे मिळत होते. शिवाय दिल्ली करारावाबत इतर मतभेद होतेच.

त्याच दिवशी आणखी एक तार व्हाइसरॉयला मिळाली. सर तेजबहादूर सप्रू हे उदारमतवादी पुढारी कॉंग्रेस आणि सरकारमधले मध्यस्थ होते. गांधीशिवाय परिषदेला काही अर्थ नाही असं त्यांनी व्हाइसरॉयला कळवलं.

मी गांधींना नैनितालला फोन लावला. ते बाहेर गेले होते. त्यांचे सचिव महादेवभाई देसाई फोनवर आले. गांधी याबाबत तीन जूनला नेमकं काय ते बोलतील असं त्यांनी सांगितलं. लवकरच ही मंडळी गुजरातमध्ये बोरसाडला जाणार होती. तिथे शेतकऱ्यांची जप्त केलेली मालमत्ता परत द्यायला सरकार हिचकिचत होतं.

दोन दिवसांनी – चोवीस मेला – देसाईंनी मला फोन केला. गांधींनी लंडनला जाण्याबाबत काहीही लेखी आश्वासन द्यायचं नाकारल्याचं ते म्हणाले ... कोणत्याही तऱ्हेच्या घटनात्मक चर्चेत शिरायचीही त्या वेळी गांधींची इच्छा नव्हती.

"या आठवड्याचा 'यंग इंडिया' तुम्ही वाचा" देसाई म्हणाले, "गांधींच्या मनात दुसरंच काही चाललंय हे त्यावरून तुम्हाला दिसेल !"

गांधींच्या मनात जे काही चाललं होतं ते आश्चर्यजनकच म्हणायला हवं ! अंक वाचल्यावर तरी मला तसं वाटलं. जवळजवळ अख्खा अंक त्यांनी एकटाकी लिहून काढला होता ! बऱ्याचदा ते असं करत. सतीप्रथेवर टीका करणारा एक प्रदीर्घ लेख त्या अंकात होता. अशा तऱ्हेच्या घृणास्पद गोष्टी या देशात अजून असतील यावर माझा विश्वासच बसत नव्हता.

दुसरा लेख होता वैवाहिक सुखाबद्दल. सूतकताई आणि चरख्याविषयी त्यात माहिती होती. डॉ. हॅरी वार्ड या अमेरिकन माणसाची एक तारही अंकात छापली होती. अमेरिकेत न येण्याचा सल्ला त्यानं गांधींना दिला होता. "सध्या अमेरिकन वृत्तपत्रांच्या भावना फारच नाजूक बनल्या आहेत. ती तुमचं योग्य प्रतिनिधित्व करणार नाहीत." तारेत म्हटलं होतं.

अख्ख्या अंकात राजकारणाबद्दल एक शब्दही नव्हता. मग लंडनला जाण्याविषयीचा उल्लेख सोडाच. गांधींचा धूर्तपणा मला पुन्हा जाणवला. लंडनमधले सत्ताधीश सिमल्याला काय झालं हे जाणून घेण्यासाठी तारावर तारा पाठवत होते आणि गांधी सतीप्रथा, सूतकताई आणि वैवाहिक सुखावर पानंच्या पानं लिहिण्यात मग्न होते !

अखेर तीस मेला मी गांधींना बारडोलीला तार पाठवली–

महात्मा गांधी.

बारडोली.

तुमच्या लंडनला जाण्याविषयी परस्परविरोधी बातम्या येताहेत. जाणार की नाही हे नेमकं कळवा. जाणार असाल तर निरीक्षक म्हणून की वाटाघाटीत सहभागी व्हायला याविषयी तुमची भूमिका स्पष्ट करा.

विल्यम शिरर
हॉटेल सेसिल
सिमला

एक जूनला गांधींची उत्तराची तार मला मिळाली –

'लंडनविषयीच्या उठणाऱ्या बातम्या अधिकृत नाहीत. जातीय प्रश्नावर तोडगा निघत नाही त्यामुळं लंडनला जाण्यात अडथळे येताहेत. गांधी-आयर्विन कराराने निर्माण झालेल्या नाजूक परिस्थितीमुळे मी त्वरित देशाबाहेर जाणं कठीण आहे. तरीसुद्धा गोलमेज परिषदेला हजर राहून, तिथल्या कामकाजात भाग घेऊन कॉंग्रेसच्या मागण्या रेटण्यास मी उत्सुक आहे. अडचणीतून मार्ग काढायच्या प्रयत्नात मी आहे. जातीय प्रश्न जर सुटला नाही आणि करारावरचे मतभेद फक्त मिटले आणि मला लंडनला जायची विनंती करण्यात आली तर मी लंडनला जाईन असं मी मित्रांना सांगितलं आहे. थोडक्यात वाटाघाटींनी शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून मी उत्सुक आहे.

**मो. क. गांधी**

मी तार पुन्हा पुन्हा वाचली बातमीपत्र लिहिण्यापूर्वी दहादा डोकं खाजवलं. काय अर्थ निघत होता त्यातून ?

अखेर बराच वेळ विचार केल्यावर मी माझ्या बातमीचा सूर जास्तीत जास्त आशावादी ठेवायचं ठरवलं.

'वाटाघाटींनी शांतता प्रस्थापित करायला गांधी उत्सुक आहेत.' मी बातमीपत्राची सुरुवात केली 'गोलमेज परिषदेला जाऊन तिथल्या कामकाजात भाग घ्यायची त्यांची तयारी आहे. बारडोलीतल्या आपल्या मुक्कामाहून या प्रतिनिधीला पाठवलेल्या तारेद्वारे त्यांनी आपलं या विषयावरचं दीर्घकालीन मौन सोडलं.'

त्या संध्याकाळी मी एका ब्रिटिश अधिकाऱ्याला भेटलो. ते अजूनही अंधारात होते. माझ्यासारखीच एक तार गांधींनी व्हाइसरॉयला पाठवली होती. पुन्हा मला येणाऱ्या आणि मी पाठवलेल्या सर्व टपालावर त्यांची नजर होतीच. गांधींनी स्वत:ची भूमिका त्या तारेद्वारे स्पष्ट केली आहे असं त्या अधिकाऱ्याला वाटत नव्हतं.

'ते कधी स्पष्ट असतात ?' चेहऱ्यावर एक हताश हास्य आणत तो म्हणाला.

□

त्या उन्हाळ्यात काही हिंदू–मुस्लिम प्रश्न सुटू शकला नाही. बाहेरच्या माणसाच्या दृष्टीनं ही एक साधी सरळ समस्या होती; पण भारतीयांच्या दृष्टीनं दिवसेंदिवस गुंता वाढत होता.

मार्चमध्ये शौकतअलीबरोबर वाटाघाटी झाल्याबरोबर तोडगा निघाला असं गांधींना वाटलं होतं; पण नंतर शौकतअली फिरले. ब्रिटिशांनी त्यांना खरेदी केल्याचं त्या वेळी कॉंग्रेसच्या गोटात बोललं जात होतं. सिमल्यामध्ये या मुस्लिम नेत्यांची कॉंग्रेसमधल्या मुसलमानांशी जूनच्या अखेरीला भेट झाली; पण मतभेद मिटू शकले नाहीत. शौकतअलींचा हिंदूविरोध तर अधिक तीव्र झाला होता. असा रासवटपणा मला त्यापूर्वी कधी त्यांच्या डोळ्यांत दिसला नव्हता.

'हिंदूंनी आमच्या मागण्या मान्य केल्या नाहीत तर आम्ही त्यांच्याविरुद्ध युद्ध पुकारणार आहोत.' शौकतअली माझ्या अंगावर जवळजवळ ओरडलेच, 'एके काळी आम्ही या हिंदूंवर राज्य केलंय. आता आम्हाला राज्य मिळालं नाही तर बेहत्तर; पण हिंदूंची सत्ता आम्ही मान्य करणार नाही !'

काँग्रेसच्या ब्रिटिश मालावरच्या बहिष्काराविरुद्ध प्रतिआंदोलन उभारायचे बेतही हे मुस्लिमनेते करत होते. जिथे जिथे म्हणून काँग्रेसची निदर्शनं चालायची तिथे तिथे प्रतिनिदर्शन करायची योजना शौकतअलीच्या मनात होती.

मला हे दुर्दैवी वाटलं. इस्लामचा प्रसार आशियात करण्यासाठी महमदाच्या काळी हाती तलवार आणि अग्नी घेणारा अरबी योद्धाच जणू शौकतअलीच्या अंगी संचरला होता! त्याच्याइतकी निकराची भूमिका भारतात कुणाचीच नव्हती. ब्रिटिशांना ते विकले गेले होते की नाही ठाऊक नाही; पण तसं ते वागत मात्र होते.

डॉ. सय्यद महमूद यांना हे सगळं अपमानास्पद वाटत होतं. ते प्रतिष्ठित मुस्लिम तर होतेच; पण त्याहीपेक्षा काँग्रेसचे सरचिटणीस होते!

'मुस्लिमांचा गांधी आणि काँग्रेसला पाठिंबा नाही हा ब्रिटिशांनी आणि आमच्या काही मुस्लिम बांधवांनी पसरवलेला समज साफ खोटा आहे' ते मला म्हणाले, 'मुस्लिम नेत्यांना हिंदू आपल्याला दडपतील अशी भीती वाटते. मग सर्वसामान्य मुस्लिमही मागेमागे राहातो; पण कायदेभंगाच्या चळवळीत बारा हजार मुस्लिम तुरुंगात गेले हे साऱ्या जगाला माहीत आहे. गांधींनी वर्षापूर्वी दांडीयात्रेला सुरुवात केल्यापासून या लढ्यात पाचशे मुस्लिमांनी प्राणाहुतीही दिली आहे!'

सिमल्याची मुस्लिम नेत्यांची बैठक निष्फळ ठरली आणि सगळ्या आशा दुरावल्या. या नेत्यांना आपसातले मतभेदही मिटवता आले नाहीत, मग काँग्रेस किंवा हिंदूंबरोबरच्या तणावावर तोडगा निघायची गोष्टच दूर. एकजुटीसाठी मुसलमान जे काही मागतील ते द्यायची गांधींची तयारी होती. ते फारच दुखावले गेले. 'तुम्ही एकमेकांचे गळे पकडाल तर त्यात ब्रिटिशांचा फायदा आहे हे लक्षात ठेवा!' ते आपल्या देशबांधवांना सांगण्याचा प्रयत्न करत होते.

अखेर ब्रिटिशांकडून फारच दबाव आल्यामुळं गांधी लंडनला जायला तयार झाले. काही पुरोगामी संस्थानिक आणि भारतीय प्रतिनिधींनी एकजुटीनं स्वातंत्र्याची बाज मांडायचं आश्वासन त्यांना दिलं होतं. अर्थात गोलमेज परिषदेविषयी त्यांच्या मनात कोणत्याही भ्रामक कल्पना नव्हत्या हे मला त्यांच्याशी बोलताना अनेकदा जाणवलं होतं. परिषद अयशस्वी होणार याविषयी त्यांच्या मनात शंका नव्हती. केवळ सदिच्छेनं ते तिथे जात होते. भारताला स्वातंत्र्य द्यायची ब्रिटिशांची तयारी नव्हती. स्वातंत्र्याचा लढा पुन्हा जोमानं सुरू करावा लागणार हेही गांधींनी माझ्याकडे स्पष्ट केलं होतं.

–आणि हा लढा दीर्घ काळ चालणार होता. माझ्याप्रमाणे क्रांतीच्या कल्पनेनं ते भारावून गेले नव्हते की कसल्या भ्रमात नव्हते. गांधींचं व्यक्तिमत्त्व मला स्फूर्तिदायक तर वाटत होतंच; पण त्याहीपेक्षा त्यांच्या विविध छटा अधिक रंगतदार होत्या! असा अफाट माणूस मी त्यापूर्वी पाहिला नव्हता, पुढे पाहीन अशी शक्यता फार कमी होती!

पण आता मला युरोपात परतायचं होतं. भारतातल्या गर्मीनं माझी पार दुर्दशा करून टाकली होती.

युरोपातही अनेक घटना वेगानं घडत होत्या. फॅसिझम, अंदाधुंदी आणि युद्धानं जणू साऱ्या युरोपलाच ग्रासलं होतं. जर्मनीत हिटलर आणि त्याच्या नाझीझमचा उदय होत होता. रोममध्ये मुसोलिनीनं वादळ निर्माण केलं होतं. युरोपातल्या या घटना साऱ्या जगाचंच भवितव्य घडवणार आहेत असं मला त्या वेळी वाटत होतं आणि घटनास्थळी असण्यासाठीही परतण्याची आवश्यकता होती.

जून सपेपर्यंत हगवण आणि हिवतापाच्या त्रासानंही मी पिचलो होतो. हे दोन्ही रोग हटू म्हणता हटत नव्हते. सिमल्यात तर अनेक दिवस मी तापामुळे बिछान्यालाच खिळलो होतो. फारसं कामही माझ्या हातून होत नव्हतं. घटनाही घडत नव्हत्या म्हणा! सगळं कसं संथ, अवसानहीन झालं होतं. आता त्यात जीव येणार होता सप्टेंबरमध्ये, गांधी लंडनला पोचल्यावर!

मी शिकागोतल्या माझ्या ऑफिसकडून व्हिएन्नाला परतायची परवानगी मिळवली. तिथे मी आजारावर चांगले उपचारही करवून घेणार होतो.

मला परवानगी तर मिळालीच; पण वर आमच्या मालकानं कर्नल–मॅकक्रोमिकनं, सदिच्छा धाडल्या–!

'लवकर बरा हो. सप्टेंबरमध्ये तुला गांधींबरोबर लंडनला जायचंय!' त्यानं निरोप पाठवला.

मला हेच हवं होतं. मी खुष झालो. कधी एकदा सप्टेंबर उजाडतो अशी हुरहुर मला लागली ...

(क्रमशः)

---

गांधींच्या पंचाकडे पाहून शेरेबाजीला सुरुवात झाली.
विशेषत: ते बंकिमहॅम पॅलेसमध्ये राजाला भेटायला गेले तेव्हा.
काहीजणांना तो राजाचा अपमान वाटला;
पण गांधींनी ते फारसे मनावर घेतले नाही.
"बंकिमहॅम पॅलेसमध्ये जाण्यासाठी तुम्हाला पंचा योग्य वाटतो का?" एका पत्रकारानं विचारलं.
"हो, नाही तरी राजाने आम्हाला दोघांना पुरतील एवढे कपडे घातले आहेतच की!" गांधींनी टोमणा मारला...

महात्मा आणि माणूस
भाग ८ वा

## गांधी : लंडनमध्ये

पुढील अंकात

# साहित्यातील बांधिलकी !

## बारामती चर्चासत्र

५ सप्टेंबर १९८२ चा 'धर्मयुग' ज्यांच्या वाचनात आला असेल त्याचे लक्ष प्रा. गंगाधर गाडगीळ यांच्या मिश्किल व कोपरखळी शैलीत लिहिलेल्या 'सेमिनार' या लघुनिबंधाने वेधून घेतले असेल. त्यात ते म्हणतात– 'सौंदर्यशास्त्रीय समस्येपासून आर्थिक नाकेबंदीपर्यंतच्या सर्व समस्या आमच्या सेमिनारनी एकदम सोडवून टाकल्या आहेत. आम्हा भारतीयांना तात्त्विक विवाद करण्याचे वेड अंमळ जास्तच. आता 'साहित्याचा मार्क्सवादी संदर्भ' यासारख्या विषयांवर जोरजोराने वाद–विवाद करण्यासाठी कुणाचे चारचवल काही खर्च होणार नसतात......' इत्यादि. योगायोगाची गोष्ट अशी की प्रा. गाडगीळ यानी उदाहरणादाखल ज्या विषयाचा उल्लेख केला आहे त्याच विषयावर आणि अगदी ४ व ५ सप्टेंबर याच दिवशी बारामती येथील, विक्रमी वाटचाल करीत पुणे जिल्ह्याच्या एका कोपऱ्यात तळपणाऱ्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या दृष्ट लागावी अशा वास्तूत सेमिनारवाल्याची एक 'टोळी' मारे हिरीरीने बांधिलकीच्या प्रश्नावर अटीतटीची चर्चा करण्यात गुतली होती. चर्चेत भाग घेणारे सर्व प्राध्यापकच होते, एम. ए. पीएच डी. असलेले. ते एकमेकाशी वाद घालीत होते, आपले मुद्दे पटविण्याचा प्रयत्न करीत होते. त्याचे ते वाग्युद्ध विद्यार्थीवृंद व क्वचित काही नागरिक कौतुकाने पाहात होते. चर्चेमध्ये काही विद्यार्थीही काहीशा सकोचाने सहभागी होण्याचा प्रयत्न करीत होते. मग मध्येच चहा येत होता. मध्यांतरात अटळ असे जेवणही होतेच.

मनात प्रश्न आला की, हे सर्व कोणासाठी? हिंदी साहित्यातील वयोवृद्ध पत्रकार व साहित्यिक श्री. बनारसीदास चतुर्वेदी यांनी ३० वर्षांपूर्वी लिहिलेल्या 'कस्मै देवाय ?' या आपल्या निबंधात हाच प्रश्न साहित्याच्या संदर्भात उपस्थित केला होता. त्या निबंधाची आठवण होऊन मनात आले की साहित्यावरील चर्चेच्या बाबतीत हाच प्रश्न लागू होत नाही का ? ही सर्व मंडळी आपलंच एक कोंडाळं करून एकमेकाला ठावे असलेल्या गोष्टी एकमेकांना सागून काय मिळवत असतात ? त्यांच्या त्या 'अॅबॉर्टिव' चर्चेतून काय निष्पन्न होत असते ? या प्रश्नाची उत्तरं अर्थातच आहेत आणि याचं प्रत्यंतर काही प्रमाणात तरी बारामतीच्या चर्चासत्रात मिळालं असं म्हणता येईल. हे चर्चासत्र मराठी, हिंदी, इंग्रजी विभागाच्या संयुक्त विद्यमानं कोहसिप योजनेखाली आयोजित करण्यात आलं होतं. भाषाविषयाचा संबंध उघडच साहित्याशी आहे. साहित्याच्या निर्मितीमागील प्रेरणा आणि साहित्यनिर्मितीचं परीक्षण व आस्वासन यासंबंधीचा विचार हा महाविद्यालयीन भाषाशिक्षणाचा एक महत्त्वाचा भाग आहे व ते योग्यच आहे त्यामुळे प्राध्यापकांनी त्यावर विचार करणे व त्यासंबंधी दुसऱ्याचे विचार समजून घेणे हा त्यांच्या व्यवसायाचा एक पक्ष आहे हेही मान्य होण्यास हरकत नाही. प्राध्यापकाच्या विकासातूनच विद्यार्थ्यांचा विकास व्हावयाचा आहे. तो घडवून आणण्याच्या कामी अशा चर्चासत्राची योजना उपकारक ठरत असते. चर्चासत्रात श्रोते म्हणून व क्वचित सहभागी म्हणून उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांनाही यातून काही प्रशिक्षण मिळत असते बारामतीच्या चर्चासत्रामध्ये या गोष्टी अल्पप्रमाणात का होईना पण घडून आल्या हे निश्चित.

चर्चासत्राच्या संयोजनात पुढाकार मराठी विभागाचा होता व त्यांना सहाय्य हिंदी व इंग्रजी विभागाचे होते आणि या सर्वांना पाठिंबा व मार्गदर्शन प्राचार्य डॉ. जे. के. गोधा याचे होते. खरं तर चर्चासत्राच्या लक्षणीय व्यवस्थेत व यशस्वितेत भाषाविभागाच्या बहुतेक प्राध्यापकांचा सहभाग डोळ्यात भरत होता. छोट्या नगरातील महाविद्यालयांच्याबाबतीत काही तरी घडते आहे याचा उत्साह सर्वांना कार्यप्रवण करीत असतो. येथे बहुतेक बैठकांना प्राचार्यांची व सस्थेचे अध्यक्ष डॉ कोठारी यांची संपूर्ण उपस्थिती जाणवत होती. तर ते असो. 'साहित्यातील बांधिलकी' च्या चर्चेला सोबतकार श्री. ग. वा. बेहरे यांच्या उद्घाटनपर संक्षिप्त भाषणानंतर लगेचच आरंभ झाला आणि बांधिलकीचे मूळ आणि तिचे कूळ यावरच्या चर्चेला आरंभापासूनच एक प्रकारचा वेग मिळाला.

साहित्यातील बांधिलकी हा आज एक लक्ष्यवेधी प्रश्न झालेला आहे. या बांधिलकीकडे 'साहित्याचा मार्क्सवादी संदर्भ' या दृष्टीने मुख्यतः पाहिले जाते. साहित्याने कामगारवर्गाचे प्रश्न मांडले पाहिजेत. ज्या साहित्यात हे नसते ते साहित्य आम्ही श्रेष्ठ मानणार नाही, हा विचार मार्क्सवादी साहित्य–विचारात खुद्द मार्क्स व लेनिन यांच्यानंतरच्या काळात पुढे आला व त्याचा बलपूर्वक पाठपुरावा करण्यात येऊ लागला. हिंदी व मराठी साहित्यावरही याचा परिणाम अर्थातच झाला. प्रा. धनंजय शहा यांनी आपल्या निबंधात फडके–खांडेकरांच्या जीवनवाद–कलावादापासून आचार्य जावडेकर व दलित वाङ्मयाचे अभ्यासक प्रा. भालचंद्र फडके याच्यापर्यंत बांधिलकीच्या संकल्पनेची जी वाटचाल झाली त्याचा थोडक्यात परामर्श घेतला. आज दलित वाङ्मयाच्या उदयाबरोबर बांधिलकीच्या कल्पनेस आणखीच चालना मिळाली आहे.आज साडेतीन टक्क्यांविरुद्धाच्या बडखोरीचा विचार मांडला जात आहे. 'सत्यकथा' मासिकाचा पराभव (?) हा कलावाद्यांचा पराभव आहे, असेही प्रतिपादन केले जात आहे वस्तुतः बांधिलकी म्हणजे विचारपूर्वक स्वीकारलेले बंधन. ती मुख्यतः मूल्यकेंद्री असते. नव्या मूल्यांची बांधिलकी स्वीकारणे म्हणजे जुन्या मूल्यांना झुगारून देणे. यातून स्थितिशीलता आणि गतिरोध निर्माण होतो. बांधिलकीचे एक तत्त्वज्ञान बनते. त्यातून भावनिक गुलामगिरी जन्माला येते आणि साहित्याचा विकास खुटतो. आज साहित्यात बांधिलकीप्रेरित

साहित्य आग्रही, आक्रमक व परिणामशून्य बनत असलेले जे दिसते ते यामुळेच.

लेखकाने आपली सामाजिक जबाबदारी ओळखली पाहिजे. त्याने समाजाचे भान ठेवावे, वास्तवाचे चित्रण करावे; परंतु हे सर्व कलेशी इमान राखूनच केले पाहिजे ! साहित्याने समाजाशी संवाद साधला पाहिजे हे तर खरेच. बांधिलकी मानणाऱ्या साहित्याने तर हा संवाद विशेषेकरून साधला पाहिजे. त्यासाठी प्रतिभास्पर्शाच्या योगाने प्रत्येक अनुभवाला 'दर्शना' च्या स्तरापर्यंत नेणे अपरिहार्य ठरते. साहित्यातील सामाजिक आशयाचे आकलन देखील शेवटी व्यक्तिगत स्तरावरच शक्य होत असते आणि लेखकाचे व्यक्तिगत अनुभव हेही समाजाचा भाग नाहीत काय? प्रेम,शोक, सौंदर्य, अध्यात्म ही देखील जीवनाच्या वास्तवाचीच अंगे आहेत. एक प्रकारे कोणत्याही 'वादा' चा स्वीकार ही एक बांधिलकीच होय. कलावादाचा गुलाम बनणे हीही बांधिलकीची एक प्रत मानायला हरकत नाही. या बांधिलकीतही धोका आहेच. (ना. सी. फडके याचे उदाहरण आहे.) एवंच बांधिलकी हे साहित्याचे मूल्य म्हणून स्वीकारता येणार नाही.

## बांधिलकी असू द्या; पण–

बांधिलकीसंबंधीच्या या पूर्वपक्षानंतर प्रा. स. शि. भावे यांनी आपल्या आटोपशीर टिपणातून साहित्यकाराच्या बांधिलकीचा एक मार्मिक अर्थ सांगितला बांधिलकीतून कुणीही सुटलेला नाही. वकिलाने न्यायदानात योग्य सहकार्य केले पाहिजे, डॉक्टराने योग्य प्रकारे औषध दिले पाहिजे, विचारवंताने वास्तव व तर्कशुद्ध विचार मांडला पाहिजे आणि तसाच साहित्यिकाने भाषेचा खरा साहित्यिक उपयोग केला पाहिजे. यातील खरा व साहित्यिक हे शब्द महत्त्वाचे आहेत. साहित्यातून प्रचार घडवणे, एखाद्या राजकीय पक्षाची तळी उचलून धरणे, केवळ स्वस्त मनोरंजन करणे म्हणजे काव्य–भाषेचा खोटा व असाहित्यिक उपयोग करणे होय. यावरून बांधिलकीसंबंधीचा प्रा. भावे यांचा दृष्टिकोण लक्षात येतो. डॉ. रामजी तिवारी (पुणे विद्यापीठ, हिंदी विभाग) यांनी सांगितले की, साहित्याची प्रतिबद्धता (बांधिलकी) याचा वास्तविक अर्थ समग्र जीवन व समग्र परिवेश यांच्याबद्दलची जागरूकता असा घेतला तर बांधिलकीचा प्रश्न सुटू शकेल. साहित्यकाराजवळ भविष्यभेदक दृष्टी आणि निर्मितिक्षम प्रतिभा असते. तिच्या बळावर तो जीवनाचे खरे चित्र काढू शकतो; परंतु त्याला 'तू सर्वहारावर्गाची समस्या मांडलीस तरच तुझे साहित्य श्रेष्ठ' अशी धमकावणी देणे योग्य होणार नाही. केवळ मनोरंजन आणि केवळ प्रचारात्मकता या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. दोन्हीतूनही 'खतरा' आहे. खरे साहित्य यापासून दूरच राहते. तेव्हा बांधिलकीचा अतिरेक हा साहित्याला केव्हाही घातकच ठरणार, असे डॉ. तिवारी यांचे प्रतिपादन होते. डॉ. कृष्ण दिवाकर (पुणे विद्यापीठ, हिंदी विभाग) यांनी सामाजिक जाणीव व सामाजिक बांधिलकी याकडे लक्ष वेधून साहित्याने 'साम्यवादी पार्टीका साहित्यिक मोर्चा' बनणे कितपत योग्य होईल असा प्रश्न केला. लेखकाजवळ सामाजिक जाणीव असणे हे निश्चितच अगत्याचे आहे. अतिरेकी दृष्टिकोणामुळेच संघर्षाला वाव मिळत असतो. लेखकाला जे म्हणायचे आहे ते त्याच्या अंतःप्रेरणेतून आले पाहिजे. वरून लादलेले असता नये. डॉ. म. सु. पाटील (मनमाड) यांनी आपल्या निबंधात बांधिलकी व वाङ्मयीन महात्मता यांचा परस्परसंबंध विशद केला. राष्ट्रवाद, उदारमतवाद, साम्यवाद हे विशिष्ट सूर पुनःपुनः उठले की, ते साहित्य बांधील आहे असे आपण म्हणतो; पण चिरंतनाचा आविष्कार समकालीन घटनेवर आधारित असतो काय याचा विचार झाला पाहिजे. बांधील साहित्यात व्यापक वास्तव व लेखकाचा दृष्टिकोण यांची यथायोग्य अभिव्यक्ती झाली तरच त्याचे महत्त्व वाढते. वाङ्मयीन महात्मतेचे निकष वेगळे असतात. येथेदेखील परिणाम व प्रभाव याचाच विचार केला जातो; पण ही वाङ्मयीन मूल्ये वस्तुनिष्ठ आहेत. समीक्षाविचारात बहुधा कलाकृतीविषयी बोलणे कमी व तिच्या परिणामाविषयी बोलणे अधिक होत असते. वस्तुतः 'शब्दार्थरूपसंहिता' हा ध्रुव मानून सौंदर्यसर्जक गुणांचा शोध घेतला गेला पाहिजे. ज्या कलाकृतीत सौंदर्यक्षमता अधिक ती चिरनूतन असते. तिच्यात अनेकसंदर्भसूचकता असते. बांधील साहित्याला हेही निकष लावणे आवश्यक आहे; परंतु अशी क्षमता बांधिलकीवाल्यांत असते का ? जेथे मतप्रणाली असते तेथे सर्वसमावेशकता येऊ शकेल काय? आपण 'कमिटमेंट'कडून 'इन्वॉल्वमेंट'कडे जात आहोत की काय ?...डॉ. कृ. म. सुर्वे (बारामती) यांनी आपल्या हिंदी निबंधात साहित्याने मानवाला देवत्वाकडे घेऊन जाण्याचे कार्य केले पाहिजे असे प्रतिपादन केले.

तेव्हा या तीन-चार निबंधांतून बांधिलकीची बाजू कशा प्रकारे मांडली गेली हे लक्षात येईल. याला विरोधी बाजू ही अर्थातच असणार. डॉ. भालचंद्र नेमाडे (औरंगाबाद) डॉ. देवेश ठाकूर (रुइया, मुंबई), डॉ. दयाराम पाटील (बारामती), श्री. विनय हर्डीकर (फ्री प्रेस) यांनी बांधिलकीचा पुरस्कार वेगवेगळ्या दृष्टिकोणांतून केला. डॉ. नेमाडे यांनी सांगितले की, बांधिलकीची कल्पना प्राचीनच आहे. फक्त विसाव्या शतकाच्या मध्यावर ती केवळ जाणवली असे म्हणता येईल. ज्याप्रमाणे पाय मुरगळल्यावरच आपल्याला पाय असतात हे जाणवते किंवा त्याचे महत्त्व कळते, त्याप्रमाणे मानवी समाजाचे विघटन सुरू झाल्यावरच बांधिलकीची चर्चा सुरू झाली. महाराष्ट्रात स्वातंत्र्योत्तरकाळात रशियावादी व अमेरिकावादी विचारवंतांचे जे विनोदी चाळे आजपर्यंत आपण पाहात आलो त्यामागे बांधिलकीच्या कल्पनेचे विडंबनच अधिक होते. बांधिलकीच्या कल्पना आदर्शवादी होणे म्हणजेच बांधिलकी कृत्रिमपणे लादणे होय. सामाजिक संदर्भाचा खरा अर्थ स्पष्ट करताना नेमाडे म्हणाले की, विकृत सामाजिक संदर्भाचे साहित्य हे आभासात्मक व रंजनवादी प्रवृत्तींना जोपासणारे असते. त्यामुळे समाजाच्या अंतःस्तरातील नैतिक व्यवस्था लेखकाला मांडता येत नाही. मग लेखक, स्वातंत्र्याच्या नावाखाली साहित्याचा समाजविन्मुख 'व्यापार' सुरू करतो आणि या ठिकाणी त्याची बांधिलकी नष्ट झालेली असते. उलटपक्षी निकृष्ट दर्जाचे प्रचारकी साहित्य पाहिले म्हणजे बांधिलकी हे सौंदर्यशास्त्रीय तत्त्वांच्या विरोधात काम करणारे तत्त्व आहे असे म्हटले जाते व ते बरोबरही आहे; परंतु बांधिलकी नसलेल्या लेखकाचे साहित्य मात्र हटकून निकृष्ट असते असे

म्हणता येते. आज आपल्या समाजात लेखकाच्या बांधिलकीला प्रतिष्ठा मिळणे दिवसेंदिवस कठीण होत आहे, या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

डॉ. देवेश ठाकूर हे नेमाडे यांच्याप्रमाणेच सर्जनशील लेखक (कादंबरीकार) आहेत. त्यांनी आपल्या प्रदीर्घ हिंदी निबंधामध्ये भारतातील अन्याय व भ्रष्टाचार यांनी भाराक्रांत झालेल्या परिस्थितीचे चित्र उभे करून सवाल केला की, या वास्तविकतेकडे डोळेझाक करून लेखकाळा लेखक म्हणून जगता येईल काय ? लोकमंगलकारी आदर्शांच्या प्रतिष्ठापनेसाठी समाजातील विषमता दूर करणे, मोक्याच्या उच्चपदी विराजमान असणाऱ्या श्रेष्ठींच्या भ्रष्टाचाराचा बुरखा फाडणे आणि सत्याचा बोध व सत्याची प्रतिष्ठा यासाठी आपली लेखणी राबवणे हेच आजच्या परिस्थितीत लेखकाचे आद्य कर्तव्य ठरते. पुंजीवादी समाजाकडून आज मोठ्या प्रमाणावर कृष्णकृत्यें होत आहेत आणि प्रतिभासंपन्न लेखक 'सुख कुरवाळणारे' साहित्य लिहिण्यात मग्न होत आहेत, ही परिस्थिती बदललीच पाहिजे ! 'परिवेश अस्वस्थ (अनहेल्दी) है इसलिए प्रतिबद्धता अनिवार्य है।' असे त्यांचे प्रतिपादन होते. त्यांनी हिंदीतील आदर्श बांधील साहित्यिकांमध्ये भीष्म साहनी, हिमांशु जोशी यांच्याबरोबर श्री कमलेश्वर यांचीही गणना केली. आजच्या वातावरणात व्यक्ती व समाज यांना राजकारणापासून अलिप्त मानून लेखन करणे म्हणजे एक तर शतमूर्खपणाचे आहे किंवा ती जाणूनबुजून स्वीकारलेली 'बदमाशी' आहे, असे स्पष्ट मत प्रा. ठाकूर यांनी नोंदविले.

डॉ. दयाराम पाटील यांनी साहित्यातील बांधिलकीकडे साहित्याची (समाजविषयक) जबाबदारी या दृष्टिकोणातून पाहणे आवश्यक आहे. असे मत व्यक्त करून सानेगुरुजींच्या कवितामध्ये आढळणाऱ्या बांधिलकीकडे लक्ष वेधले. बांधिलकीवाचून साहित्याचे सामर्थ्य प्रत्ययाला येत नाही. ज्ञानदेवांनी मराठीत ज्ञानेश्वरी लिहिली ही एक प्रकारची बांधिलकी होय असे प्रतिपादन त्यांनी केले. साहित्य ही एक प्रभावी शक्ती आहे. या शक्तीचे राष्ट्राच्या जडण-घडणीत सहाय्य होते. ते कलाविहीन असणे शक्यच नाही. उलट जे जीवन घडविते ते कलापूर्ण असते अशी भूमिका घेणे योग्य ठरेल. कलावाद व जीवनवाद यात खरोखर विरोध नाही. कलावादी कलात्मक बाजूवर भर देऊन त्याचे समर्थन करतात तर जीवनवादी कलेची बूज राखूनच तिचे जीवनाच्या उन्नयनाशी नाते जोडतात. लोककल्याण हेच साहित्याचे साध्य आहे. साहित्यातील बांधिलकीचे नवे रूप आपणास आजच्या दलित साहित्यात दिसते ... श्री. विनय हर्डीकर यांनी पाश्चिमात्य साहित्यात आढळणाऱ्या बांधिलकीच्या धारणेचे विस्तृत विवेचन केले.मार्क्स व एंजिल्स यांच्या साहित्यात बांधिलकीचा एकांतिक पुरस्कार आढळत नाही. हा विचार रशियन क्रांतीनंतर पुढे आला. तो भांडवलशाही विरोधी होता. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर सार्त्र यांनी मांडलेली बांधिलकीची संकल्पना ही भांडवलशाहीविरोधी नाही तर ती टोकाला गेलेल्या कलावादाविरुद्ध आहे. तुम्ही जर नुसते 'झऱ्यां'त बसलात तर तुम्ही 'सिन्सिअर'नाही आहात. तुम्ही तुटत चाललेले आहात.' असे सार्त्र यांनी बजावले. त्यानंतर आलेल्या विचारातून याच तत्त्वाचा पाठपुरावा दिसतो. नवीन समाजनिर्मितीत साहित्यिकाचा वाटा मोठा आहे. नोकरशहा व मंधिसाधू लोक म्हणजेच सौंदर्य-तत्त्वाचा काथ्याकूट करणारे लोक. 'आता मी वेश्यांच्या जीवनावर कादंबरी लिहिणार आहे' असल्या घोषणा म्हणजे निव्वळ ढोंग. श्री. हर्डीकर यांनी 'प्रथमपुरुषी एकवचनी वृत्तांतकथन' करणाऱ्या (उदा. त्यांचेच 'जनांचा प्रवाहो चालिला') साहित्यिक 'फॉर्म' मधूनच आदर्श बांधिलकी खरी जोपासली जाईल असे प्रतिपादन केले. कथा-कादंबरी हे प्रकार या दृष्टीने कमी पडतील असा त्यांचा रोख होता.

## सूर्य आणि जयद्रथ

ही झाली चर्चासत्रातील दुसरी बाजू आता सर्वच निबंधावर चर्चा ही झालीच व त्यातून मनातले अभिनिवेश नकळत प्रकट झाले आणि असे लक्षात आले की, 'साहित्यातील बांधिलकी' या विषयावर आजही बारा 'मती' आहेत आणि त्या तशाच राहणार आहेत. वानगीदाखल काही झलक पाहता येईल. बांधिलकीरहित साहित्य निखालस निकृष्ट असते या डॉ. नेमाडे यांच्या विधाना वर प्रश्न विचारण्यात आला की 'औदुंबर' या कवितेबद्दल आपले मत काय आहे ? त्यांनी सांगितले की एखादी रचना घेऊन बोलणे अडचणीचे आहे. 'मग आपण संबंध बालकवी घेऊ' असा प्रश्न विचारायचा राहून गेला, परंतु पुढील चर्चेमध्ये असा एक सूर निघाला की बांधिलकीच्या संदर्भात 'कविता' या प्रकाराचा विचार आज तरी अडचणीचा ठरतो आहे. त्याबद्दल आणखी विमर्श होणे जरुरीचे आहे. (श्री. हर्डीकर). पुढे याच संदर्भात नेमाडे यांना विचारण्यात आले की, आपण 'वाचा प्रकाशना' तर्फे प्रकाशित केलेल्या दिलीप चित्रे यांच्या 'कवितेनंतरच्या कविता' यातील कविता व तुमची प्रस्तावना यात तुमच्या निबंधातील बांधिलकीचे दर्शन घडत नाही. यावर नेमाडे समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत. साने गुरुजी यांच्या कविताबद्दल विचार झाला. या कवितात बांधिलकी असेल; पण 'कवितापण' आहे का ? या विधानावर वातावरण तप्त झाले. पण त्यावर नीटसे उत्तर मिळू शकले नाही. 'मेघदूत हे श्रेष्ठ काव्य मानण्यास मी तयार नाही.' असेही विधान करण्यात आले. (श्री. हर्डीकर). या विधानामागील वैचारिक बांधिलकी लक्षात यावी. श्री. कमलेश्वर यांना आदर्श बांधील लेखक ठरविताना त्यांच्यावर आपण 'अन्याय' तर करत नाही ना याकडे लक्ष वेधले असता व्याख्यात्यांना पटणारे उत्तर देता आले नाही. कुसुमाग्रजांच्या 'गर्जा जयजयकार' मध्ये बांधिलकीचे दर्शन घेत असताना 'काढ सखे गळ्यातील चादण्याचे हात' याचे काय करायचे याकडे लक्ष वेधण्यात आले. हास्यरसाला साहित्यात स्थान द्यायचे असेल तर त्यात बांधिलकी कशी शोधायची हाही प्रश्न उपस्थित करण्यात आला. 'प्रथमपुरुषी एकवचनी वृत्तांतकथन' यात कथा-कादंबरीसारखा साहित्यपणा असतो का या अर्थाचा आक्षेपही मार्मिक होता.तसेच यात लोकाकर्षक वाचनीयता कितपत असणार हाही प्रश्न उरतोच. चर्चासत्राचे एक चांगले असते की, तेथे सूर्य आणि जयद्रथ यांची समोरासमोर भेट होऊ शकत असते, तसे या ठिकाणीही घडले. प्रा. ब. वि.

उपाध्ये, प्रा. कंडारकर (बारामती), प्रा. प्रभाकर बागले. (मडमान) इत्यादींनी चर्चेत मोलाची भर टाकली.

या चर्चासत्रातील आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे साहित्यातील प्रत्यक्ष उदाहरणांच्या सहाय्याने बांधिलकी संबंधीचे विवेचनही करण्यात आले. त्यात डॉ. सुधाकर गोकाककर (गडहिंग्लज) यांनी १९७०–८० च्या कालखंडातील हिंदी लघुकथांमधील बांधिककीवर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, आजची हिंदी लघुकथा सामान्य वाचकापर्यंत पोचण्याचा प्रयत्न करीत आहे आणि तिच्यामध्ये बांधिलकी व कलेची बूज या दोन्हींचे संतुलन दिसून येत आहे. डॉ. के. एस. अय्यर (बारामती) यांनी 'कमिटमेंट इन अमेरिकन लिटरेचर' हा निबंध सादर केला. 'आज अमेरिकन साहित्यात यंत्रयुगाच्या आक्रमणातून निर्माण झालेल्या मानवजातीच्या समस्यांवर भर देण्यात येत आहे. आज तेथील मानवाला हरपलेल्या लोकसंस्कृतीची व लोकजीवनाची तहान लागून राहिली आहे. विलयम फॉकनर हे या प्रकारच्या बांधिलकीचे अध्वर्यू आहेत, असे त्यांचे विचार होते. डॉ. सच्चिदानंद परळीकर (पुणे) व डॉ. श्रीरंग संगोराम (पुणे) यांनी आधुनिक हिंदी कवितेच्या संदर्भात बांधिलकीचा विचार अनेक उदाहरणे प्रस्तुत करून मांडला, १९६० नंतरच्या कवितेतच बांधिलकीचे साहित्यिक रूप प्रकर्षाने प्रकट झालेले दिसते असा त्यांचा मुद्दा होता. या सर्व चर्चामालिकेत एक वेगळे फूल गुंफले प्रा. प्र. ना. परांजपे यांनी. (पुणे) साहित्यातील बांधिलकीचा भाषांतराच्या अंगाने त्यांनी विचार मांडला आणि बांधिलकीबद्दल व्यक्त झालेल्या बारा मतींच्यामध्ये एक तेरावी मती व मिती जोडली. त्यांच्या निबंधात भाषांतराच्या रूपनिष्ठतेशी निश्चितच बांधिलकी होती. परंतु चर्चासत्रात अनुस्यूत झालेल्या वैचारिक बिंदूशी ती कितपत जमत होती हे शेवटपर्यंत कुणाच्या ध्यानात येऊ शकले नाही.

चर्चासत्राचा समारोपही अकृत्रिम व हृद्य अशा वातावरणात प्रा. भालचंद्र नेमाडे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. चर्चासत्रे निर्णायक उत्तरे देण्यासाठी नसतात तर एखाद्या समस्येच्या वेगवेगळ्या बाजूंनी समोरासमोर येऊन भिडावे यासाठी असतात याचे प्रत्यंतर विद्यार्थी व उपस्थितांना मिळाले. तथापि अनेकांच्या मनात एक विचार दाटून आला असावा असे वाटते '— बालकवींचे साहित्य बांधील नाही या कारणास्तव ते कनिष्ठ नाही. ते श्रेष्ठ आहे याचे कारण त्यात कलावादाचे व्यापारीकरण नाही. निखळ अनुभूतीची प्रामाणिक अभिव्यक्ती प्रतिभेच्या स्पर्शाने त्यात झालेली आहे. (गेल्या आठवड्यात दिवंगत झालेल्या सदानंद रेगे या देदीप्यमान कवीला बांधिलकीच्या काट्यावर बसवून भागणार आहे का ?) आपल्या श्रीमंत लोकसाहित्याला बांधिलकी बाधणार आहे का ? साहित्याला बांधिलकीची फूटपट्टी लावताना या गोष्टीचा विचार झाला पाहिजे. मात्र साहित्यिकाने तटस्थ तराजूप्रमाणे समाजजीवनाकडे पाहावे हेही पटणारे नाही. त्याचा काटा अन्यायपीडितांकडे म्हणजेच आत्याकडे झुकलेला असणे वश्यक आहे. अन्याय हा समाजातील सर्व थरांतील लोकांवर होत असतो. प्रामाणिक वेदना व संवेदना मानव असल्यामुळे सर्वांना असतात. साहित्यिक या सर्वांचा 'वाल्मीकी' असायला हवा.'

—प्रा. डॉ. श्रीरंग संगोराम

---




# देवाची माणसं

## ललित निबंधातली 'व्यक्तिचित्रं'

'देवाची माणसं' हा डॉ. भीमराव कुलकर्णी यांचा नवा व्यक्तिचित्रसंग्रह. या संग्रहात समाविष्ट असलेली व्यक्तिचित्रे वेगवेगळ्या वेळी आणि "प्रसंगोपात्त" लिहिलेली आहेत. शिवाय या व्यक्ती काहीशा वेगवेगळ्या क्षेत्रांतील असून वेगवेगळ्या प्रकृतींच्याही आहेत. त्यामुळे ह्या साऱ्या व्यक्तिचित्रांची एकत्र गुंफण कशी काय होऊ शकते हा एक प्राथमिक प्रश्न. याचे उत्तर अर्थातच काही प्रमाणात या पुस्तकाच्या 'देवाची माणसं' या शीर्षकात व काही प्रमाणात भीमरावांच्या व्यक्तित्वात (श्री. ज. जोशींनी प्रस्तावनेत भीमरावांच्या व्यक्तित्वाचे मजेदार निदान केले आहे, त्यात) सापडते.

भीमराव हे एक प्राध्यापक, समीक्षक नि ललितलेखक आहेत; पण त्याहीपेक्षा त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आणखी एक महत्त्वाचा अंश आहे. तो म्हणजे त्यांचा लहानथोर माणसांचा लोभ. लहानथोर माणसांना गाठणे, त्यांच्या सहवासात राहणे, त्यांच्या आवडीनिवडी सांभाळणे, त्यांचा लहानथोरपणा—म्हणजे लहानांचा थोरपणा नि थोरांचा लहानपणा— गमतीने जोपासणे या साऱ्यांची भीमरावांना मनापासून हौस आहे, हे भीमरावांशी परिचित असलेल्यांना माहीत आहे. या माणूसलोभामुळे ते अनिल, काणेकर, मालशे, पु.ल., माडगूळकर यांच्यासारख्या 'बोलघेवड्यां'शी तर जवळीक साधू शकतातच; पण दुर्गा भागवत, गं. बा. सरदार, कुसुमाग्रज यांच्यासारख्या गंभीर, संयत, अबोल वा 'दूरस्थ' व्यक्तींच्या बाबतीतही 'जवळचे' राहतात. पंडितकाका केळकर किंवा ग. रं. भिडे यांसारख्या थोड्या बाजूला असणाऱ्या व्यक्तींशीही भीमराव मनःसंवाद करू शकतात हेही मुद्दाम लक्षात घ्यायला हवे. या पुस्तकातील साऱ्या व्यक्तिचित्रांतून भीमरावांचा हा माणूसलोभ सतत जाणवत राहतो.

भीमरावांनी चितारलेल्या या व्यक्तिरेखांपंकी पंडितकाका केळकर वा ग. रं. भिडे यांसारखी एखाददुसरी अपरिचित वा अल्पपरिचित व्यक्ती वगळली तर बाकीच्या साऱ्या व्यक्ती (दत्तो वामन पोतदार, मामा वरेरकर, अनिल, काणेकर, ग.दि.मा, पु.ल., मालशे इत्यादी) त्यांच्याविषयीच्या सर्व कथा-दंतकथांसह वाचकांच्या चांगल्या माहितीच्या आहेत. तरीही वाचक अशा व्यक्तींची भीमरावांनी (किंवा अन्य कुणीही) चितारलेली व्यक्तिचित्रे का वाचतो ? याचे उत्तर असे की, या व्यक्तींविषयी भीमरावांचे सांगणे-म्हणणे काय आहे, भीमरावांचा नि या विलक्षण देवमाणसांचा संबंध कसा नि कोठे आला इत्यादीसंबंधीचे वाचकाचे कुतूहल दाट असते. त्यामुळेच सर्वसामान्य वाचकांना अतिपरिचित असलेल्या, विशेषतः निरनिराळ्या दंतकथांचे मोहोळ सभोवती असलेल्या (मामा वरेरकर, कुसुमाग्रज इ.) व्यक्तींबद्दल लिहिणे तसे कठीण असते; पण हे कठीण काम भीमरावांच्या लेखी (शब्दशः लेखी) सोपे झालेले

दिसते; हे असे सोपे होण्याचे एक कारण आहे. ते म्हणजे या सर्व व्यक्तिचित्रातून भीमरावांनी आपणा स्वत:कडेच कुतूहलाने पाहिलेले आहे. या व्यक्तिरेखाटनात भीमरावांच्या व्यक्तित्वाच्या छटाही मिसळून गेल्या आहेत. भीमरावांच्या लेखनातील या आत्मपरतेमुळे यातील काही व्यक्तिचित्रे चांगलीच सजीव झालेली आहेत पोतदार-वरेरकरांच्या व्यक्तिरेखा प्रस्तावनाकार श्री. ज. जोशींना आवडल्या, त्याचे मर्मही भीमरावांच्या ह्या आत्मपरतेतच आहे. अशा विलक्षण व्यक्तींच्या ध्येयधुंदीचा नि अभ्यासूपणाचा, तऱ्हेवाईकपणाचा नि विक्षिप्तपणाचा आणि त्याचबरोबर प्रेमाचा नि माणुसकीचा जो प्रत्यय भीमरावांना आला त्याचे साक्षात् वर्णन वाचून खूष होतात. उदाहरणार्थ पोतदारांचा मिस्किलपणा वाचकांना माहिती असतो. भीमराव तो कसा रंगवतात याचे वाचकांना कुतूहल असते. वाचकांचे हे कुतूहल भीमरावांनी चांगल्या प्रकारे जपले—जोपासले आहे.

व्यक्तिचित्रे रेखाटताना भीमरावांसारखे बहुश्रुत लेखक जे किस्से देतात त्यांच्या खरेखोटेपणाविषयीचा एक प्रश्न महत्त्वाचा आहे. वास्तविक 'विलक्षण', 'लोकोत्तर' इत्यादी सदरात मोडणाऱ्या व्यक्तींच्या चरित्रातील किंवा व्यक्तिचित्रांतील अशा किस्सेकहाण्यांचा खरेखोटेपणा हा सत्याच्या निकषावर तपासून पाहायचा नसतो; (तसे करताही येणे अनेकदा अशक्य असते) तर अशा किस्सेकहाण्यांतून त्या त्या व्यक्तीचे एक सलग मन:चित्र उभे राहाते की नाही हे पाहायचे असते. दुर्गा भागवतांनी पीएच.डी.साठी लिहिलेला प्रबंध मार्गदर्शकाशी मतभेद झाला म्हणून फाडला किंवा आचार्य अत्र्यांनी ग. ह. खऱ्यांवरील अग्रलेख त्यांचे हस्ताक्षर पाहून टरकावला या घटनांच्या सत्यतेपेक्षाही दुर्गा भागवत व आचार्य अत्रे यांच्या विशिष्ट मनोधर्मामुळे त्या घटनांची शक्यता मोठी वाटत असते. अशा रीतीने व्यक्तिचित्रलेखक ह्या व्यक्तिवर्णनापेक्षाही व्यक्तिवेधात गुतलेला असतो. त्यामुळेच असा वेध घेताना सत्यापेक्षाही शक्यतेकडे तो अधिक लक्ष पुरवितो. वाचकांच्या थेट मनात व्यक्तिरेखा घुसविण्याचे काम हे किस्से करीत असतात. त्यामुळे त्यांना केवळ रंजकतेपेक्षाही अधिक मोल असते.

या व्यक्तिरेखा वेधक करण्याकरिता काही गंमतीचे शैलीविशेष भीमरावांनी आत्मसात केलेले दिसतात. अमक्या—तमक्याचे अगोदरचे नाव काय होते, नतर कोणते झाले; कोण कुणाचा भाचा वा मामा इत्यादी वाचकाचे कुतूहल चाळवणारी उगाच माहिती भीमराव देतात मात्र अशी माहिती देण्यातही त्यांची काही हेतुगर्भता असतेच. एक तर थोर व्यक्तींच्या वैयक्तिक, खाजगी माहितीत सामान्य वाचकांना भरपूर रस असतो हे भीमराव ओळखून आहेतच; पण त्याचबरोबर अशी नुसती माहिती पुरवून चालत नसते तर त्या माहितीची एक सुसंगत अशी व्यवस्था लावायची असते, हीही विद्या भीमरावांनी ओळखलेली आहे त्यामुळेच पुलंचे आजोबा मंगेश विठ्ठल दुभाषी यांनी रवींद्रनाथ टागोरांच्या 'गीतांजली'चे 'अभंग गीतांजली'च्या रूपाने भाषांतर केले अशी नुसती माहिती देऊन भीमराव थांबत नाहीत, तर या माहितीचा संबंध ते पुलंच्या बंगाली भाषा, बंगाली साहित्य, वंगनाट्य इत्यादिविषयक आस्थेशी जोडतात. पुल किंवा गंगाधर गाडगीळ यांसारख्या मान्यवर लेखकांच्या मानधनविषयक व्यवहारीपणाच्या कथा चांगल्याच प्रसृत असतात. अशी माहिती देतादेताच भीमराव या व्यवहारीपणामागे असलेली त्यांची साहित्यनीती नि साहित्यनिष्ठाही उलगडून दाखवितात. मानधनविषयक मतभेदातून 'रहस्यरंजन'ला कथा नाकारणारे गंगाधर गाडगीळच आपला मौलिक लेख त्याच मासिकाला स्वत:होऊन देतात ही गोष्ट साहित्यिकात एकाच वेळी 'व्यवहारदक्ष माणूस' नि 'निष्ठावान कलावंत' दडलेला असतो, हे सांगणारी आहे. भीमरावांनी सांगितलेल्या रागालोभाच्या गोष्टीमुळे 'मानधनासाठी अडविले' छापाच्या एकतर्फी गोष्टी ऐकून आपल्या मनात त्या त्या लेखकाविषयी अंकुरलेली रागाची छटा हलकेच मावळून जाते.

या संग्रहातील पोतदार, वरेरकर, काणेकर, ग. ह. खरे, ग. रं. भिडे ही व्यक्तिचित्रे खुसखुशीत नि गंमतीदार झाली आहेत तर दुर्गा भागवत, गं. बा. सरदार, अ. का. प्रियोळकर ही व्यक्तिचित्रे गंभीर उठली आहेत. असे का झाले असावे ? मला वाटते जी ती व्यक्तिरेखाच आपल्या व्यक्तिचित्राचा आकार काही प्रमाणात का होईना ठरवीत असते. प्रियोळकर, दुर्गाबाई वा सरदार यांसारख्यांचे व्यक्तित्वच असे असते की, हाती काही किस्से वा गंमतीशीर मजकूर असूनही कोणाही व्यक्तिचित्रलेखकाची लेखणी अडावी. सरदारांच्या व्यक्तिमत्त्वातील वैचारिकतेच्या प्रभावामुळे त्यांच्या सपूर्ण व्यक्तिचित्रालाही त्याच वैचारिकतेचे अस्तर आपोआप लाभलेले दिसेल.

एका बाजूने व्यक्तीच आपल्यावरील लेखनाचा असा आकार ठरवीत—घडवीत असताना दुसऱ्या बाजूने काही अंशी ज्या निमित्ताने वा प्रसंगाने ही व्यक्तिचित्रे लिहिण्याची प्रेरणा झाली ती प्रेरणाही हा आकार घडवीत असणार हे उघड आहे.

ही व्यक्तिचित्रे रंगतदार करण्यासाठी भीमराव हेतुतः काही 'पोझ' घेतात. उदाहरणार्थ काही व्यक्तींच्या प्रथमभेटीच्या संदर्भात आपण बावळटपणे समोर गेलो वा आपला प्रश्न 'बालिश' होता असे भीमराव सांगतात. (पु. भा. भावे वा पु. ल. देशपांडे यांच्या व्यक्तिचित्रांचा आरंभ) ही 'पोझ' खरी की खोटी अशी शंका वाटावी असे नाट्यमय वर्णन असते हे; पण जसजसे भीमराव त्या त्या व्यक्तींच्या अंतरंगाचे दर्शन घडवू लागतात तसतसे आपल्या लक्षात येते की, ही 'एक व्यर्थ पोझ' नाही तर व्यक्तिचित्ररेखाटनाचा तो एक यशस्वी आरंभबिंदू आहे. भीमरावांसारख्या सामान्य मुलाला शोधत पुल ग्रंथसंग्रहालयात आले नि 'खूप लिही' असं प्रोत्साहन देऊन गेले, ही आठवण भीमरावांच्या नव्हे तर पुलंच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारी आहे. 'पुलंच्या शाबासकीने अनेक लेखकांना आपली वाट सापडल्याचा आनंद झाला आहे' (पृ. ९४). हे भीमरावांचे म्हणणे पुलंनी राम नगरकर, यशवंत मनोहर इत्यादींना दिलेल्या प्रोत्साहनाच्या गोष्टी लक्षात घेता यथार्थच नव्हे काय ?

व्यक्तिचित्ररेखटनात भीमरावांनी त्या त्या व्यक्तीचे महत्त्वाचे वा अनन्यसाधारण वैशिष्ट्य केन्द्रस्थानी ठेवले आहे. त्याचा त्यांच्या व्यक्तिचित्रलेखनावर काहीएक परिणामही झालेला दिसतो. प्रियोळकरांवर लिहिताना भीमरावांनी दुर्मिळ ग्रंथ, त्यांचे संपादन—संरक्षण इत्यादींवर पोटतिडिकेने लिहिले आहे, असा गंभीर निबंधात्मक मजकूर प्रियोळकरांच्या ग्रंथप्रेमी व्यक्तिमत्त्वामुळे

आपल्यालाही या लेखात अपरिहार्य वाटू लागतो. असले विलक्षण ग्रंथप्रेम प्रियोळकरांच्या पुढील पिढीतल्यांना जगता-जोपसता आलेले नाही अशी आपल्या मनात डोकावणारी खंत अशा मजकुरामुळे तीव्रतर होते. वरेरकराचे व्यक्तिचित्र वाचून वरेरकरांविषयीच्या आपल्या समज-गैरसमजात चांगलीच भर पडते. या संपूर्ण लेखावर मामांचा पुणे व पुणेकर यावरील राग किंवा अढी या एका बाबीवर चांगलीच छाया पडलेली दिसेल.

मोठ्यांच्या आयुष्यातला एखाददुसरा छोटा प्रसंग व्यक्तिचित्रलेखनात कधीकधी बलस्थान ठरतो. उदाहरणादाखल अनिल व मालशे यांची व्यक्तिचित्रे पाहावीत. कैलासलेणे पाहाताना अनिलांचे डोळे पाणावतात, हा प्रसंग अनिलांच्या ललित व्यक्तिमत्त्वासंबंधी बोलणारा आहे. प्रबंधलेखनाची चालढकल केली म्हणून ज्याची हजेरी घेतली तोच विद्यार्थी आजारी पडल्यावर त्याच्यासाठी डॉ. स. गं. मालशे जागरणे करतात, हा प्रसंग मालशांच्या व्यक्तिमत्त्वातील सहृदय 'गुरुत्व' दिग्दर्शित करतो.

आपल्या 'संस्काराची बीजे, जुन्या निष्ठा आणि श्रद्धा यांमधून प्रस्फुरित झाली असल्याने आजच्या युगातील तुटकपणा, माणूसघाणेपणा आणि जीवनाबद्दलची तुच्छतावृत्ती यांचा 'आपणास अर्थच कळत नाही' असे अण्णा माडगूळकर म्हणायचे, अशी माहिती जेव्हा भीमराव आपल्याला देतात तेव्हा अण्णा माडगूळकरांचा नवकाव्याबद्दलचा तिटकारा आपण समजून घेऊ शकतो. इतिहाससंशोधक खऱ्याचे कष्टमय, व्रतस्थ जीवन चितारता-चितारताच जेव्हा भीमराव '...स्त्रीपुरुष-व्यवहाराचे कुतूहल सतत त्याच्या डोळ्यात तरळताना दिसते' (पृ.७०) असे लिहितात तेव्हा 'देवाची' असली तरीही ही 'माणसे'च आहेत हे आपल्याला कळते. याच व्यक्तिचित्रात सांगितलेली कै. शं. ना. जोशी यांनी दिलेली देणगी परत मागण्याची (आणि मंडळाने काही काळ ती परत देण्याविषयी घातलेल्या हुज्जतीची) गोष्टही माणसाचे माणूसपण—सामान्यपण सांगणारी आहे. माणसे असामान्य कोटीतली, उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची असली तरी तीही सामान्याप्रमाणे भावविवश होतात, रागलोभ धरतात, चुकतात—माकतात हे पाहून आपल्यासारख्या सामान्य वाचकांना एक प्रकारे दिलासाच मिळतो.

पंडितकाका केळकर, ग. रं. भिडे या व्यक्ती अगोदर म्हटल्याप्रमाणे जरा आडबाजूच्या म्हणून अपरिचित वा अल्पपरिचित. त्यामुळेच त्यांच्या मोठेपणाविषयीचे कुतूहल दामदुप्पट होते. पंडितकाकांसारखी व्यक्ती आपल्याला माहीत नव्हती याची वाचकाला एका बाजूने शरम वाटते नि प्रसिद्धीच्या सतत झोतात न येता व्रतस्थ आयुष्य क्रमणाऱ्या या व्यक्तीबद्दल अचंबाही वाटत राहातो. पंडितकाका केळकर व सानेगुरुजी यांचा अमळनेर येथे एक 'आत्महत्यासंघ' होता. हे वाचून सानेगुरुजींनी आत्महत्या का केली या प्रश्नरहस्यातला एक धागा हाती आल्यासारखे वाटते. तेराव्या शतकातल्या ज्ञानेश्वरांप्रमाणे जिवंत समाधी घेण्याचा पंडितकाका केळकरांचा ध्यास आपल्याला थक्क करतो. पुन्हा ह्याच वेदान्ती पंडितकाकांना क्रिकेटचे विलक्षण वेड आहे हे वाचूनही आपण थक्क होतो!

पु. भा. भावे यांच्या व्यक्तिचित्रातल्या एकदोन वगळता सर्व आठवणी त्यांच्या संतप्तपणाच्या, समीक्षकांबद्दल कडवट अभिप्राय व्यक्त करणाऱ्या वृत्तीच्या निदर्शक आहेत. त्यातून भावे यांच्या व्यक्तित्वातील एकारलेपण छानपणे पुढे येते. ग. रं. भिडे यांचे व्यक्तिचित्र तसे त्रोटक, पण छान 'जमलेले' आहे. याची सुरुवात 'सापडलेले भिडे'पासून होते आणि शेवट अर्थातच 'कायम हरवलेले भिडे' येथे होतो. दि. बा. मोकाशी म्हणताच त्यांच्या रेडियोदुरुस्ती दुकानातील साहित्यिकांच्या अड्ड्याची आठवण येतेच. कारण हे मोकाशींचे दुकान म्हणजे साहित्यिकांच्या वेव्हलेंग्थ जमविण्याचे केंद्रच होते.

माणसे ध्येयधुंद असोत, एकाकी असोत वा एककल्ली असोत ती स्वतंत्रपणे वा एकेकटी जगत नसतात. त्यांच्या अवतीभोवती इतर माणसे असतातच. काहींना तर आजूबाजूला माणसे घेऊनच जगण्याचा छंद असतो. त्यामुळे व्यक्तिचित्रात वर्ण्य व्यक्तीबरोबर दुसऱ्याही एकदोन व्यक्तीचे, लहानथोर व्यक्तीचे चित्र हळूच डोकावून जाणारच. भीमरावांनी केलेल्या व्यक्तिचित्रलेखनात या अनुषंगाने येणाऱ्या व्यक्तीही ठळकपणे उभ्या राहतात, चमकून जातात. उदाहरणार्थ पुलंवर लिहिताना भीमराव सहजपणे तात्या ढमढेरे यांच्यावरही लिहून जातात. पुलंचे 'खोगीरभरती' तात्यांनी प्रकाशित केले होते ही माहिती तर सुखद धक्काच देणारी आहे. काणेकरांवर लिहितानाही असेच भीमराव मध्येच प्रभाकर पाध्यावर लिहितात आणि खरोखरच भीमरावांप्रमाणे आपलाही प्रभाकर पाध्यांकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलून जातो.

वर दिलेल्या कारणांखेरीज आणखी अनेक कारणांकरिता 'देवाची माणसे' हे भीमराव कुलकर्णी यांचे पुस्तक वाचनीय ठरते; परंतु ह्या सर्वांचा ऊहापोह येथे करायलाच पाहिजे असे नाही. जाता जाता वर निर्देशित झालेल्या एका मुद्द्याचा पुन्हा परामर्श घ्यावासा वाटतो. भीमरावांच्या या साऱ्या व्यक्तिचित्रलेखनात एक चांगली आत्मपरता आहे, हे वर स्पष्ट केले आहेच. लेखकाची आत्मपरता हा ललितनिबंधाचा मूलाधार असतो. त्यामुळे अशा आत्मपरता असणाऱ्या व्यक्तिचित्रांना ललितनिबंधच का म्हणू नये? भीमरावांच्या या संग्रहातल्या काही व्यक्तिचित्रांच्या बाबतीत तरी 'व्यक्तिचित्र' व 'ललितनिबंध' यातील सीमारेषा पुसट केल्या आहेत.

—द. दि. पुंडे

**देवाची माणसं :**
लेखक : डॉ. भीमराव कुलकर्णी
उत्कर्ष प्रकाशन, पुणे
पृ. १४८, मूल्य : वीस रुपये

---

मांडणी, विचार व देखणेपणा या साऱ्यातच 'उत्तम' असे म्हणता येईल असे हे पुस्तक आहे.

—प्र. भा. भोसले
संपादक, बळीराजा मासिक

# योद्धा शेतकरी

ले. विजय परुळकर
राजहंस प्रकाशन, पुणे ३०
मूल्य : ३६ रुपये

## फिनिक्स निवड

# चंद्र वाढतो कलेकलेने व ग्रंथालय वाढते किलो-किलोने

अलीकडे काही पुस्तके २–४ किलो वजनाची असतात. उदाहरणार्थ मुल्कराज आनंदचं कामसूत्र, ४ किलो. (आता किती पानं व किंमत आहे, याच्यापुढे कॉमा टाकून वजनही लिहावंसं वाटतं) ग्रंथालय सदा वर्धिष्णु असतं या उक्तीनुसार ग्रंथांची लायब्ररीत कशी भर पडत जाते हा एक गमतीदार विषय होऊ शकतो. मी हे फक्त खाजगी वर्गणी–ग्रंथालयांपुरतंच लिहीत आहे. कारण मला अनुदानाची ग्रंथालये कशी मॅनेज केली जातात याची माहिती नाही.

खाजगी वर्गणी–ग्रंथालये आता इतकी वाढली आहेत की, जिथे जिथे को–ऑपरेटिव्ह सोसायट्या होतात तिथे तिथे एखादी बेकरी व एखादं वाचनालय–ग्रंथालय निघालंच म्हणून समजा! सोसायटीचा व तिकडील परिसराचा फारच विकास झाला तर पुढे किरणाची दुकाने दिसू लागतात एवढा विकास झाल्यावर फ्लॅटवाले सुखावतात व बाहेरगावच्या पाहुण्या मंडळींना मोठ्या अस्मितेने सांगत सुटतात की, 'आमचा एरिया आता किती डेव्हलप झाला!' कलकत्ता बघा आता कसं 'डेव्हलपमेंट'च्या पलीकडे गेलं आहे. मुंबई त्याच मार्गावर मार्गस्थ आहे. पुण्याचं 'माहेरघर' वगैरे संपलंच आहे. डेव्हलपमेंटमुळे फ्लॅटवाल्यांना व बंगलेवाल्यांना एक फार मोठा दिलासा असतो. चलनफुगवट्यामुळे आपल्या जागेची व फ्लॅटची किंमत किती वाढली या एकाच प्रॉपवर ते आयुष्य सहज जगू शकतील. मला जेव्हा जेव्हा डिप्रेस वाटतं तेव्हा तेव्हा मी सुद्धा माझ्या ॲसेटस्‌ची यादी करतो आणि शेवटी स्वतःला एक जब्बर थप्पड मिळाल्यासारखं वाटतं. असो.

अज्ञानाची भुयारे दूर करण्यासाठी लायब्ऱ्या ही ज्ञानाची कोठारे असतात. डेव्हलपमेंटच्या ओघात ग्रंथालये निघतात हे तर चांगलेच आहे. खाजगी ग्रंथालयाचे संचालक हे असे अर्थार्जनाच्या सोबत विद्यार्जन करीत असतात.

पहिली गोष्ट म्हणजे ग्रंथालय उघडायला इतर धंद्यांपेक्षा सुरुवातीला तरी कमी भांडवल लागतं. जागा मिळाली की, थोडी-फार मासिके व पुस्तके टाकून लगेच धंदा सुरू करता येतो. अलीकडे तर मुख्य धंद्यासाठी असलेल्या जागेत जोडधंदा म्हणून बऱ्याच ठिकाणी ग्रंथालये सुरू झाली आहेत. कुठे चहाच्या दुकानात एखादं काउंटर टाकून, तर कुठे मेन ऑफिसच्या शेजारी एखाद्या खोलीत पुस्तके रचून, अनेक लोक हा व्यवसाय सुरू करतात. त्यातील बरेचसे चिकाटी ठेवून हा व्यवसाय दामटत रहातात. बरं, घरच्या ब्रेडविनरनीच हा व्यवसाय सांभाळायला पाहिजे, असेही नाही. रहात्या जागेतच ग्रंथालय असले तर घरातील इतर मंडळीही ते चालवू शकतात. बायकांना तर ग्रंथालय चालवणं फार आवडतं एक तर यामुळं स्त्रीमुक्ती चळवळीला हातभार लावल्यासारखं होतं आणि दुसरं म्हणजे मिळवती होता येतं. त्याशिवाय संचालिका म्हणूनही थोडंसं मिरवता येतं.

परिसर सुखवस्तू व स्वच्छ लोकांचा असेल तर ग्रंथालय भूमितीच्या पटीने वर्धिष्णु होत जातं. एकदा एरंडवणा परिसरातून एक स्त्री-संचालिका आमच्या फिनिक्समध्ये आल्या होत्या. ग्रंथालय उघडल्यापासून थोड्या अवधीतच त्यांनी एक हजार का दोन हजार मिल्स अँड बून्स ग्रंथालयात टाकले होते! हे अशा रीतीने ग्रंथालय भराभर वर्धिष्णु झाले म्हणजे संचालकाला त्रास तर कमी होतोच; पण ती एक संचालकाच्या डायमेनिझमचीसुद्धा पावती असते.

परंतु समजा सदाशिवपेठेसारख्या एरियात ग्रंथालय असले तर तेवढे सहजासहजी व सुखासुखी ते वर्धिष्णु होत नाही.

आपल्या पैशाचा पुरेपूर फायदा मिळणे ही एक रास्तच अपेक्षा आहे. कुणीही सुज्ञ व शहाणा माणूस तसेच करील. तेव्हा खाजगी ग्रंथालयाची वर्गणी भरून ग्रंथालय–चालकांना अनेक प्रकारची पुस्तके व मासिके आणण्यास भाग पाडणारा वाचक हा अनरिझनेबल आहे असे काही म्हणता येणार नाही. ग्रंथालय वर्धिष्णु होण्याच्या अनेक कारणांपैकी हे एक मुख्य कारण असतं.

आमच्या सदाशिवपेठेतील ग्रंथालयात पूर्वी एक भारदस्त बाई येत असत. जेवढं व्यक्तिमत्त्व वजनदार तेवढाच आवाजही! या बाई नेहमी रिक्षेतून येत असत. कधीकधी आमच्या ग्रंथालयात गर्दी असताना येत, "अहो, माझी रिक्षा बाहेर उभी आहे. मला लवकर पुस्तक द्या!" असे या बाई बहुतेक वेळा म्हणत असत. कधीकधी त्या असेही बोलून दाखवत की, निव्वळ पुस्तक बदलायला त्यांना रिक्षा करावी लागे. एके दिवशी ग्रंथालयात गर्दी नसताना मी त्यांना सुचवले की, जर त्यांनी आमची तीन किंवा चार पुस्तकांची वर्गणी भरली तर त्यांचा रिक्षाखर्च थोडा वाचून आणखी थोडीशी बचतही होईल. माझ्या मनात याशिवाय दोन फायदे होते. प्रदूषणही कमी होईल व ऊर्जेची थोडीशी बचतसुद्धा होईल; पण हे काही मी त्या बाईंना सांगितलं नाही. त्याची बाईंवर प्रतिक्रिया काय झाली ते मला त्या वेळी तरी कळले नाही; परंतु जेव्हा त्यांची वर्गणीची मुदत संपली, तेव्हा त्यांनी "लायब्ररी बंद करायची" असं नेहमीचं एक अनप्लेझंट वाक्य सुनवलं. निदान मला तरी "लायब्ररी बंद करायची आहे" हे वाक्य 'लायब्ररी बंद करा" असेच वाटते.

खाजगी ग्रंथालये वर्धिष्णु होण्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे panic buying हा प्रकार फक्त माझ्याच वाट्याला येत असेल असे वाटत नाही. लायब्ररीचा 'धंदा' हा बायर्स मार्केटमध्ये असतो हे मी आधीच सांगितले आहे. खाजगी ग्रंथालयाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे 'लाटेने' होण्याचे प्रकार. लायब्ररी बंद करायची लाट येते, पुस्तके खराब होण्याची लाट येते, नवीन मेंबर्स घेण्याची लाट येते, पुस्तके गहाळ होण्याची लाट येते, बाइंडिंगसाठी एकदम पुस्तके निघण्याची लाट येते, भांडणे होण्याची लाट येते, हे सर्व असे होत राहिल्याने "लायब्ररी बंद करायची आहे."ही लाट आली की, बिचारा संचालक भांबावून जातो व आपले ग्रंथालय लोकांना उणे वाटते आहे की काय या भीतीने पुस्तके खरेदी करून बसतो. या

प्रकारात ग्रंथालय वर्धिष्णु होते खरे; परंतु दर्जाच्या बाबतीत मात्र ग्रंथालय इथे मार खाते.

लायब्ररी वाढण्याचे दुसरे गमतीदार कारण बघा. परवा कित्येक अभिजात साहित्यिक-मूल्ये असणारी पुस्तके एकदम विकत घेतली तेव्हा एक डिसेंट बाई अगदीच हळू म्हणाल्या, "अभ्यासाची आहेत वाटतं." इतक्या गोड व इनॉक्युअस (innocuous) स्वरात म्हणाल्या की, मग अशा वेळेला याला अँन्टिडॉट म्हणून "त्या" ग्रुपसाठी व ग्रंथालय संतुलित ठेवण्यासाठी हलकीफुलकी पुस्तके आणावीच लागतात. बरं. गंभीर पुस्तके घेतलीच नाहीत किंवा कमी घेतली तर ग्रंथालयाला प्रतिष्ठाच लाभणार नाही. बोला आता!

अशी पुस्तके वाढत जातात त्याच प्रमाणात व्यवस्थापनखर्चेही वाढत जातो. जुन्या पुस्तकाला डागडुजी, बाइंडिंग, पुस्तकाची लावालावी यासाठी अधिक कर्मचारी. सर्व काही अगदी पार्किन्सन लॉसारखे! या सर्व प्रकारात बजेटचं व ग्रंथपालाचं काय होत असेल याची कल्पना न केलेलीच बरी!

मी याआधी 'पाचपट' टाइप मेंबर्सविषयी लिहिले आहेच हे पाचपटवाले अर्थात आपल्या वर्गणीपेक्षा चाळीस–पन्नासपट वाचून घेतात; पण त्याशिवाय त्यांच्या वर्गणीपेक्षा ग्रंथालयांना सुमारे पाचपट पुस्तके सजेस्ट करून विकत घ्यायला लावतात. त्यामुळं बजेट जरी ताणले गेले व ग्रंथपाल जरी जेरीस आला तरी ग्रंथालय वाढत जाते. या 'पाचपट'-वाल्यांपासून आमच्या एका सभासदाने "मी पाचपटवाल्यांच्या प्रकारात मोडेन" असे आमच्या ग्रंथालयात येऊन सांगितले. त्याचे नांव श्री. भालचंद्र आत्माराम भोळे, १३५९ सदाशिव, पुणे ३०. त्यांचं असं म्हणणं आहे की, ते महिन्यात एखाद दुसरंच पुस्तक बदलतात. तेव्हा त्यांनी भरलेल्या वर्गणीच्या सुमारे पावपटच ते वाचतात! हे मात्र खरं असतं. हे भोळे दुसऱ्या एका ग्रंथालयात गैरसमज निर्माण झाल्यामुळे आमच्याकडे आले होते. आता हे भोळे मला तरी इतके जॉली व चांगले वाटले की, कुणाशी त्यांचा गैरसमज होईल असे मुळीच वाटत नाही. जेव्हा मला कळले की ते हार्ट पेशंट आहेत तेव्हा विचार आला, (He is too jolly to get heart disease!) ते सुरुवातीला आमच्या ग्रंथालयात आले ते माझा 'ग्रंथनिगा' हा 'माणूस'मधील लेख आवडला म्हणून. त्याना ते इतकं पटलं की, त्यांनी आमची वार्षिक वर्गणीच भरून टाकली! बघा आता. या लेखामुळे मला तांब्याचा पैसा तर राहोच, पण एक ग्रॅमची वेढणी घेता आली असती! (मी आणखी नवीन पुस्तके घेतली, एवढच.) पण माझ्या लेखामुळे माजगावकरांना काही खडा घेता आला असता असे वाटत नाही! (नाही तरी त्यांनी सुद्धा कागदच घेतला असता म्हणा!) ग्रंथालय चालवण्यात या पावपटवाल्यांचा एक फायदा असा की, या लोकांचा ग्रंथालयावर एकूण ताण कमी येत असतो. फक्त पुस्तक परत पाठवण्याची रिमाइंडर्स पाठवावी लागतात, त्याचा पोस्टेज खर्च येतो, तेवढाच! छापील कार्डाचा खर्च जास्त. हाताने लिहिली तर वेळ खाणार–त्यामुळं आम्ही पावपटवाल्यांसाठी रबर स्टँपची रिमाइंडर्स करून घेतली आहेत.

क्वचितच असे घडते की, संचालकाकडे फंडस् फ्लश होतात. म्हणजे लाल बिल होत नाही; पण त्याच्या खिशात चार पैसे खेळत असतात. (नंबर दोनवाल्यांकडे फंडस् फ्लश झाले तर त्यांनी 'फिनिक्स'ची दीर्घ मुदतीची वर्गणी भरून टाकावी म्हणजे दोन्ही पाटर्यांना बाप्टीझम (baptism) झाल्यासारखे होईल.) अशा वेळी ग्रंथालयाचा संचालक असा विचार करतो की, आहेत पैसे तर थोडी पुस्तके खरेदी करून टाकावी. ग्रंथपाल जर सुज्ञ असेल तर असल्या वेळी अभिजात ग्रंथ किंवा क्लासिक्स खरेदी करून ग्रंथालय वृद्धिंगत करतो. ग्रंथखरेदी करण्याची ज्यांना नेहमीच सवय लागलेली असते त्यांची तृष्णा अघोरी असते. अगदी अलीकडे थोडीशीच पुस्तके खरेदी केली तरी चार आकड्यांवर बिल गेले! लगेच दुसऱ्या दिवशी पुस्तकाच्या दुकानाच्या शोकेसमध्ये लावलेल्या काही पुस्तकांपैकी २–४ तरी आपल्या ग्रंथालयात दाखल झाल्याशिवाय ते पूर्ण होणार नाही असेच वाटायला लागले!

ग्रंथालयाचा विषय निघाला की, उपराष्ट्रपति श्री. हिदायतुल्लांची आठवण येते. मी त्यांच्या 'बॉसवेल' पुस्तकावर लेख लिहिला तो अॅड. श्री रानडे यांनी त्यांना पाठवून दिला. तेव्हापासून आमच्यात पत्रव्यवहार सुरू झाला. मोठी खुमासदार पत्रं ते लिहितात. एकदा त्यांनी मला लिहिलं की, दहा हजार पुस्तके असतील तर त्याला कलेक्शन म्हणायचे असते, लायब्ररी नव्हे! दहा हजारांच्यावर गेलं तर त्याला लायब्ररी म्हणता येईल. आता माझ्या ग्रंथालयात दहा हजार पुस्तके आहेत हे मी त्याना लिहिलं का ते आठवत नाही; पण हा १०,००० चा आकडा फ्लेक्झिबल, म्हणजे कटिंग डाउन टू साईजसाठी वापरला गेला, अशी मला शंका वाटते. आमच्या लायब्ररीची पुस्तकेही ते वाचतात. त्यांचं वाचन अफाटच आहे हे सर्वांना माहीत आहेच. त्यांनी केंब्रिज युनिव्हर्सिटीमध्ये इंग्रजी साहित्याचा अभ्यास केला होता. त्यांच्या पत्रांतून बरंच काही घेण्यासारखं व शिकण्यासारखं असतं. त्यांच्या भाषणात पूर्वतयारी किती असते तेही बऱ्याच लोकांना माहीत आहे. एकदा स्त्रियांच्या समारंभात त्यांनी एक चुटका सांगितला होता. आजारी बायको नवऱ्याला चहा करून द्या म्हणते. 'अग, चहाची भुकटी कुठे आहे ते सांग.' 'ती काय नेहमीच्याच जागी. कॉफीच्या टिनवर कोकोचं लेबल लावलंय ना, त्यात!' हा चुटका फ्रॉइडनं सायकोॲनालाईझ् करायला हवा होता!

ग्रंथालय वर्धमान होण्याचे आणखी एक छोटेसे कारण म्हणजे सदिच्छेने ग्रंथलयाला भेट दिलेली पुस्तके. कधी या प्रकारात खरंच सदिच्छा असते, तर कधी getting rid चाही प्रकार असतो; पण करणार काय? कुंकू लावायला आलेली लक्ष्मी तशीच परत पाठवायची नसते असे म्हणतात. तर मग कुंकू लावायला आलेली सरस्वती परत पाठवणे योग्य होईल का?

सेकंडहँड पुस्तकांनीसुद्धा ग्रंथालय कलेकलेने वाढत जाते. घरी जागा कमी पडली किंवा पैशाची निकड असली, तर कधीकधी काही लोक जुनी पुस्तके कमी दरात लायब्ऱ्याना विकून टाकतात. विशिष्ट प्रकारची परीक्षणे वाचूनही लायब्ररीत त्या त्या पुस्तकांची भर पडत जाते.

काही वेळेला एखादा सिनेमा गाजतो. ज्या पुस्तकावर हा सिनेमा आधारित असतो ते पुस्तकही मग वाचनालयात टाकावे लागते. अशा अनेक प्रकारे ग्रंथालय कलेकलेने वाढते; पण जागा मात्र इंचाइंचाने वाढत नाही! मारुतीच्या शेपटासारखे, वाढणाऱ्या पापडासारखे ग्रंथालय वाढत रहाते!

—जे. एन्. पोंडा

# दोन द्रष्टे, आणि एक महात्मा

डॉ. शरद अभ्यंकर, वाई

१९८२ प्रजासत्ताकदिन. इलस्ट्रेटेड विकलीचा खास अंक. या अंकातील खास विभाग. नाव आहे : भारत–उत्कर्षाला संधी देणारा देश. (India–Land of opportunity) यामध्ये अल्पपरिचय आहे आपआपल्या क्षेत्रात उत्कृष्ट यश मिळवणारे काही उद्योगपती, अभिनेते, व्यवस्थापक आणि डॉक्टर्स यांचा. प्रास्ताविकात संपादक म्हणतात, 'हे लोक म्हणजे दुःखपूर्ण जीवन जगणाऱ्या कोट्यवधी भारतीयांचे प्रतिनिधी नव्हेत; पण या भारताची सूत्रे चालू ठेवणाऱ्या सहस्रावधीचे ते प्रतिनिधी आहेत. गेल्या अनेक वर्षांत 'भारत आता रसातळाला जाणार' असे भाकित वर्तवणाऱ्या परदेशी तज्ज्ञांची वाणी खोटी ठरवणारे हे आणि यांचे भाईबंद.

आपल्या देशातल्या पराभूत मनोवृत्तीने ग्रासलेल्या बुद्धिजीवीवर्गाला सद्यःस्थितीचे यथायोग्य दर्शन घडवण्यासही या लेखांचा उपयोग व्हावा. हे लोक व्यक्तिगत कार्यक्षमता, उभारी, धडाडी आणि कष्ट याचे महत्त्व निश्चित जाणतात; पण वैयक्तिक अपयशाबद्दल मात्र निरपवादपणे आणि अन्यायाने, समाजाला व सरकारला दोष देतात. ...जगातील प्रत्येक देशात शिक्षण, कार्यानुभव, संपत्तीचा वारसा आणि घराण्याचे संबंध हे आयुष्यात प्रगती साधण्याकरता उपयोगी पडतात. भारतही याला अपवाद नाही; पण या सर्व गोष्टी नसतानाही यश मिळण्याची, सेवा करण्याची किंवा उत्कृष्ट पातळीवर पोचण्याची जिद्द बाळगणाऱ्या माणसाला यश मिळण्याची संधी या देशाइतकी अन्यत्र कुठेही नसेल! पुढील काही उदाहरणे पुरेशी बोलकी आहेत.

रिलायन्स टेक्स्टाइलचे धिरुभाई अंबानी वय ४०. परदेशी शिक्षण नाही. व्यवस्थापनशास्त्रातल्या पदव्या नाहीत. बापजाद्यांचा प्रचंड वारसा नाही. उत्तम व्यापाराची आणि आपली कंपनी सर्वोच्च पदी नेण्याची ऊर्मी. जगातील सर्वोत्तम तंत्रज्ञान आणि यंत्रसामुग्री आणून भारतात तिचा प्रथम उपयोग करण्याचे वेड. गिऱ्हाइकाच्या पैशाचा पुरेपूर मोबदला मग ओघानेच आला. साहजिकच यांच्या कंपनीचे रोखे सोन्यापेक्षा जास्त वेगाने किंमतीत वाढलेले दिसतात. आजचे उत्पादन वर्षाला साडेतीन कोटी मीटर कापड!

या धिरुभाईंचे वडील साधे शाळामास्तर होते. धिरुभाईंनी तर वयाच्या १६ व्या वर्षी शाळा सोडून त्यांच्या आवडीच्या विषयात, म्हणजे व्यापारात उडी घेतली. एडनला एका फ्रेंच व्यापारी कंपनीत कारकून म्हणून त्यांनी सुरुवात केली. इथल्या अनुभवाच्या जोरावर भारतात आल्यावर त्यांनी नायलॉन धागे आयात करण्याचा आणि तयार कापड निर्यात करायचा व्यवसाय सुरू केला. परदेशी पाठवण्यायोग्य कापड मिळेना. तेव्हा स्वतःचाच एक कारखाना नरोडा इथे चालू केला. आजच्या सुप्रसिद्ध 'विमल' टेक्स्टाइलची ही सुरुवात होती. आज हा कारखाना जगातील सर्वोत्तम कारखान्यांच्या तोडीचा आहे असे वर्ल्ड बँकेचे तज्ज्ञ मान्य करतात!

¤

सार्वजनिक क्षेत्रातील मोठे उद्योगधंदे म्हणजे पांढरे हत्ती असा समज सर्वत्र पसरलेला आहे. तो बराचसा खरा आहे. कारण खाजगी मालकाला जशी धंद्याची आच असते तशी इथे कुणालाच नसते. Everybody's business is nobody's business, हे अगदी खरे ठरते. अशापैकीच एक हत्ती भारत हेवी इलेक्ट्रिकल्स् लिमिटेड (बी. एच. इ. एल) विद्युतनिर्मितियंत्रे बनवणाऱ्या जगातील पहिल्या दहा कारखान्यांत नंबर असणारा; पण अकार्यक्षमतेच्या गाळात रुतलेला. ६०००० कर्मचारी, त्यातले ११००० प्रशिक्षित अभियंते, नऊ कारखाने, ४५० कोटींची गुंतवणूक, वर्षाला ७०५ कोटींची उलाढाल, विविधांगी उत्पादन आणि भारतातील मोठ्या विद्युतप्रकल्पांकडूनच नव्हे, तर जगातील ३० देशांतून मालाला मागणी! इतके असूनही BHEL कडून वेळेवर यंत्रसामुग्री मिळत नाही आणि मिळते ती वारंवार बिघडते, त्यामुळे साऱ्या देशात वीजटंचाई आणि तज्जन्य शेकडो तोटे, असे चित्र नुकते नुकते होते. आता के. एल. पुरी यांनी १९८० ऑगस्टपासून या हत्तीचे माहूतपद स्वीकारले आहे आणि त्याला ताळ्यावर आणला आहे.

¤

दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन हा असाच आणखी एक पांढराशुभ्र हत्ती होता. १३६१ मेगॅवॅट क्षमतेपैकी ५०० मेगॅवॅट विजेचेसुद्धा उत्पादन तिथे होत नव्हते. गलथान व्यवस्थापन, कामगारांचे नैतिक खच्चीकरण आणि विरोधी कामगार संघटनांचे झगडे याने हा हत्ती जर्जर झालेला होता. साहजिकच याचा परिणाम कोळशाखाणी, रेल्वे आणि पोलाद-प्रकल्पांवर होऊन प्रचंड नुकसान होत होते. अशा या महाप्रचंड उद्योगाची सूत्रे बी. सी. ल्यूथर यांनी २।३ वर्षांपूर्वी हाती घेतली आणि या राक्षसाला आळस झटकून पुन्हा कामाला लावला आहे. या भागाची संपूर्ण विजेची गरज भागवून त्यांनी कॉर्पोरेशनला २–३ कोटी रुपये फायदा मिळवून दिला आहे. पूर्वीच्या सहा महिन्यातील आकडे ७.३ कोटी रुपये नुकसान! अर्थात सपाटून काम करवून घेणारा माणूस फार कुणाला आवडत नाही. एका युनियनच्या कामगारांनी त्यांच्यावर हल्ला चढवला होता. ते स्वतः १६ तास काम करतात हे अर्थात हल्लेखोर विसरले होते. अशाही परिस्थितीत डगमगून न जाता कामगारांना चुचकारून, समजावून त्यांनी परिस्थिती सुधारली. आता तिथे दरमहा ८००–८५० मेगॅवॅट विद्युतनिर्मिती होते. तीसुद्धा पावसाअभावी सर्व जलविद्युतकेन्द्रे बंद असताना!

¤

मद्रासच्या मरीना–बीचवर हप्त्याने घरे घ्या अशा जाहिराती मुंबईच्या वृत्तपत्रात तुम्ही वाचल्या असतील. ती घरे बांधून विकणारे व्ही. जी. पण्णीरदास यांची जीवनकथा म्हणजे एक परीकथाच आहे. यांचे वडील सैन्यात ट्रकड्रायव्हर होते. कुटुंब मोठे असल्यामुळे शाळा संपताच घरगडी म्हणून कुणाकडे काम करणे भाग पडे. नशीब काढण्याकरता मद्रासला जाणे, बऱ्याच भटकंतीनंतर ३ रु. महिना पगारावर एका किराणा दुकानात नोकरी, विजातीय मुलीशी प्रेम-

विवाह, थोडेसे पैसे जमल्यावर चहाचे दुकान, मग शब्दकोड्याची एजन्सी, मोटार घेणे. त्यातच दुर्दैवाचे फटके म्हणजे एका मुलाला उंदीर चावल्यामुळे मृत्यू, शब्दकोड्यावर सरकारी बंदी. असे चढ-उतार झाल्यावर पण्णीरदासने गजराची घड्याळे विकणे सुरू केले. एकदम एवढे पैसे देणे बऱ्याच जणांना शक्य होत नाही, हे पाहिल्यावर त्याने हप्त्याने पैसे घेणे सुरू केले आणि या परीसस्पर्शाने लवकरच त्यानी भारतीय बाजारपेठेत धमाल उडवून दिली. घड्याळेच काय, सायकली, रेडिओ, शिवणयंत्रे, रेफ्रिजरेटर्स, फर्निचर काय म्हणाल ती वस्तू हप्त्याने विकण्याचा V. G. P. आणि कंपनीने सपाटा लावला.

१९७० साली प्रथमच परदेशात गेले असताना त्यांना पूर्ण तयार घरांची कल्पना आवडली आणि मद्रासला त्यांनी लगेच या योजनेचा आरंभ केला. दोन आठवड्यात तीन पूर्ण तयार घरें उभारण्यात आली. या घरांची छायाचित्रे एका अमेरिकन मासिकात प्रसिद्ध झाली आणि पुढच्याच वर्षी मॉन्ट्रिअल येथे भरणाऱ्या 'गृहनिर्माण परिषदे'त भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पण्णीरदासांना निमंत्रण आले. तिथून त्यांनी डिस्नेलँडलाही भेट दिली आणि अमेरिकन वार्ताहरांना, मियामीपेक्षा सुरेख समुद्रतटावरची वसाहत भारतात उभारून दाखवू असे आश्वासन दिले. त्यानुसार लवकरच मद्रास महाबलीपुरम् रस्त्यावर ५६ एकर वाळूत 'गोल्डन बीच रिसॉर्ट' ही वसाहत-पौर्वात्य आणि पाश्चात्य संस्कृतीचा जणू संगम-उभी राहिली.

तामिळनाडूच्या कमाल जमीनधारणाकायद्यामुळे, शब्दकोडेबंदीमुळे पुन्हा एकदा त्यांच्या व्यवसायावर संकट कोसळले; पण तरीही त्यानी मुंबई, दिल्ली, बंगलोर आणि अंदमानमध्ये प्रदर्शनालये उभारून गिऱ्हाइकांशी संपर्क कायम ठेवला. पुढे हा कायदा रद्द झाला आणि दुप्पट उत्साहाने व्ही. जी. पी. चे काम सुरू झाले.

आज या कंपनीतर्फे जमीनजुमला, गुंतवणूक, यात्रा-सहली, गृहनिर्माण, कलावस्तूंची निर्यात, फर्निचरनिर्मिती, भारतीय संस्कृतीचा प्रसार आणि आता नवीनच भारतीय चित्रपटांद्वारे व्हीडीओ कॅसेट्स निर्यात करणे एवढे उद्योग चालतात. तरीही पण्णीरदासांची एक महत्त्वाकांक्षा अद्याप पूर्ण व्हायची आहे. ती म्हणजे भारतात डिस्नेलँड उभारण्याची!

¤

विकलीच्या याच विभागात चित्रपटअभिनेते मिथुन चक्रवर्ती आणि रजनीकांत, अल्पखर्चात घरे बांधणारे वास्तुशिल्पज्ञ लॉरीबेकर आणि पोलिओ-डोसपासून हृदयाच्या शस्त्रक्रियेपर्यंत आरोग्यसेवा पुरवणारे वेल्लोरचे ख्रिश्चन मेडिकल कॉलेज यांचेही परिचय आहेत.

हे व असेच असंख्य उद्योजक, अधिकारी, अभियंते, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, वैद्यकविशारद, लघुउद्योजक, संशोधक भारतात आणि भारताबाहेर उत्कृष्ट कामगिरी बजावून आपल्या देशाचे नाव उज्ज्वल करीत आहेत. स्वतःबरोबरच आपल्या राष्ट्राचा उत्कर्ष घडवून आणीत आहेत.

¤

अव्वल इंग्रजी अंमदानीत औद्योगिक प्रगतीच्या दृष्टीने जगात शून्य क्रमांकावर असणारा हा देश पुढे स्वावलंबी आणि स्वतंत्र कसा होईल याचे स्वप्न लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी रंगवले होते. ते असे-

१ एप्रिल १८४९

शतपत्रे क्र. ५४

इंग्रजी राज्यापासून फळ

... या मूर्ख समजुती जातील ... आणि व्यवस्थित होईल. या लोकांच्या पायातील शृंखला तुटतील; हे चोहो देशात जाऊन व्यापार करतील. विद्वान होतील व आपले देशात कापड वगैरे जिन्नस करावयास शिकतील, तेव्हा सुखी होतील. लोक शहाणे झाले म्हणजे हळूच इंग्रजाजवळ म्हणतील, आम्हाला तुमच्या देशात आहे तसे पार्लमेंट द्या. नंतर आपले लोक त्यामध्ये बसू लागले म्हणजे हळूच म्हणतील आम्ही तुमच्यासारखे शहाणे आहो, मग आम्हास तुमच्यासारखे अधिकार का नसावे? हिंदु लोकांचे बहुमत असे पडले म्हणजे सरकारास देणे अगत्य आहे. इकडील लोक राज्याचा वगैरे कारभार चांगला करू लागले, लाच खाण्याचे सोडून दिले म्हणजे बहुतकरून मोठाली कामे गव्हर्नरचीसुद्धा यांचे हाती येतील आणि आपले लोक पार्लमेंट आणि स्वराज्य भोगतील. राज्यकारभारात त्यांस महत्त्व प्राप्त होईल असे हे लोक प्रबल झाले म्हणजे इंग्रजाचे काही दिवसपर्यंत आभार मानतील.कारण की त्यांच्या योगाने हे ज्ञानी झाले; परंतु ज्या काळी इंग्रज गडबड करू लागतील किंवा काही नवीन कानू बसवावयाचा आग्रह धरतील, त्या काळी अमेरिकेत झाले तसे होऊन हे लोक आपल्यास स्वतंत्र करून घेतील आणि इंग्रजास सांगतील की, तुम्ही आपले देशास जावे. आता आमचे देशाचा कारभार आम्हाला चांगला करता येतो. तुमचे गुरुत्व नको.. तुम्ही पाहिजे तर व्यापारापुरते इकडे येत जा. आमचे प्रजेचे आम्ही जसे रक्षण करतो, तद्वत तुमचेही करू; परंतु तुमचे वर्चस्व नको! याप्रमाणे या देशाची गती होईल आणि नवीन राज्यस्थिती चांगल्या प्रकारची होईल. पहिले अज्ञान अगदी नाहीसे होईल. यास दोनशे वर्षे तरी पाहिजेत; परंतु असे होईलच यात शंका नाही, अशी मागले इतिहासावरून कल्पना होते आणि हे तथ्य आहे, अशी खातरजमा आहे.

¤

लोकहितवादीचा अंदाज १०० वर्षांनी चुकला आणि पुढच्या ३०-३२ वर्षांतच कापडच काय पण कॉम्प्युटरही येथे निर्माण होऊ लागले. परदेशातून उच्च शिक्षणाकरता इथे विद्यार्थी येऊ लागले. हा चमत्कार कसा घडला? असे काही घडेल याचे स्वप्न आणखी एका द्रष्ट्याने पाहिले होते. त्यांच्या मतानुसार या बिकट परिस्थितीतून देशाला योग्य मार्ग दाखवणाऱ्या नेत्याची उणीव होती-

राम गणेश गडकरी, 'एकच प्याला' अंक ३. प्रवेश ३. (लेखनकाल १९१७)

रामलाल : भगीरथ, लोककल्याणाचा एकच राजमार्ग म्हणून दाखविण्याइतकं हिंदुस्थानचं भावी सौख्य आज एकदेशीय नाही. एकीकडे सामाजिक सुधारणा आहेत. एकीकडे राजकीय सुधारणा आहेत, इकडे धर्म आहे, इकडे उद्योग आहे, इकडे शिक्षण आहे, इकडे स्त्रियांचा प्रश्न आहे, इकडे अस्पृश्यांची बावत आहे, तर तिकडे जातिभेदाचा गोंधळ आहे. अशा या चमत्कारिक प्रसंगी अमुक एकच मार्ग इतरांच्यापेक्षा चांगला आहे, असं सांगणं मोठं धाडसाचं आहे. परिस्थितीच्या अनुभवाप्रमाणं या विषयावर ज्याचे त्याचे विचार अगदी निरनिराळे झालेले आहेत. हजारो वर्षांच्या ओझ्याखाली ३३ कोटी

जीवांच्या जडपणानं खालावत चाललेल्या आमच्या भरतभूला उचलून धरण्यासाठी जितक्या भिन्नभिन्न प्रकृतींच्या मूर्ती आम्हाला लाभतील तितक्या हव्याच आहेत. लोकहितात पडू पहाणाऱ्या विद्यार्थ्याला *काय-वाचा-मनसा आधी हा धडा अगदी हस्तगत– नाही,अगदी* जिवाशी–नेऊन भिडवला पाहिजे. आपल्याहून भिन्न रीतीने लोकहिताचा प्रयत्न कोणी करीत असेल तर त्याबद्दल सहानुभूती न दाखवणे, दुसऱ्याच्या प्रयत्नाबद्दल अनादर दाखवणे, देशहिताच्या बुद्धीतच स्पर्धा वाढवून एकमेकांना खाली पाडणं, या कारणांमुळं आमची आज जितकी अवनती होत आहे, तितकी दुसऱ्या कोणत्याही कारणामुळे होत नसेल! भगीरथ, मी लोकोत्तर बुद्धीचा एखादा महात्मा नाही; पण शक्य तितक्या शांतपणानं आणि समतोल मनानं सरळ गोष्टी पहात असल्यामुळं माझे विचार असे होऊ लागले आहेत ... आर्यधर्माचा भलता अभिमान धरणारे, आर्यधर्माची पताका अधिकाधिक उंच दिसावी म्हणून धर्माभिमानाच्या भरात तिच्या उभारणीसाठी सहा कोटी महारा–मांगांच्या हाडांच्या सांगाड्यांची योजना करीत आहेत. नामशूद्रांचे आणि अतिशूद्रांचे वाली म्हणवणारे त्या वर्गाला उच्चपदी नेण्याऐवजी बिचाऱ्या ब्राह्मणवर्गाला रसातळी नेण्याचा अधम प्रयत्न करीत आहेत. व्यक्ती तितक्या प्रकृतो, प्रकृती तितकी मतं आणि मतं तितके मार्ग असा प्रकार होऊन आज जबाबदार आणि बेजबाबदार लोकांना सर्वांनाच बारा वाटा मोकळ्या होऊन बसल्या आहेत. त्रिसप्त कोटि कंठकृत निनाद कराले जननि, इतक्या हाका–*आरोळयांचे कल्लोळात तुझ्या नेमक्या हिताचा संदेश आम्हा पामर* बाळाना कसा ऐकू जाणार ? भगीरथ, व्यापक लोकशिक्षण, सार्वजनिक लोकशिक्षण हा तरी सध्या असा एक मार्ग दिसतो आहे की, जो एकटाच आम्हाला आत्यंतिक लोकहिताला नेऊन पोचवणारा नसला,तरी इतर सर्व मार्गांवर आपला प्रकाश पाडणारा आहे खास ! भगीरथ, आर्यावर्ताच्या उदयोन्मुख भाग्याचा अचूक मार्ग सांगणारा मंत्रद्रष्टा महात्मा अजून अवतरावयाचा आहे मनुष्यस्वभावाला शोभणाऱ्या आतुर आशेने त्याच्या आगमनाची वाट पहात बसणे हेच आज तुझ्या–माझ्यासारख्या पतिताचे कर्तव्य आहे ......

*गडकऱ्यांच्या स्वप्नातला हा महात्मा लवकरच अवतरला! त्याने* कोट्यवधी भारतीयांना अचूक मार्गही दाखवला आणि त्यामुळेच लोकहितवादींना २०० वर्षांनंतर घडून येतील अशा वाटणाऱ्या गोष्टी १०० वर्षांतच प्रत्यक्षात आल्या।

आज २ ऑक्टोबर. त्या महात्म्याच्या स्मृतीला नम्र अभिवादन !

□

---

## अणुबॉंब : पृष्ठ १२ वरून

सर्वांच्या नजरेस आणून दिलेच पाहिजेत. अणुशक्तीही त्यास अपवाद नाही.

मानवी संस्कृतीचा विकास जसजसा झाला तसतसा शस्त्रास्त्रे; आयुधे याचाही विकास होत गेला. मानवाला नव्या नव्या शक्ती प्राप्त होत गेल्या, त्याच वेळेस त्याचा विध्वंसक कार्यासाठीही उपयोग करण्याची मानवाची उलटी अक्कलही वाढत गेली. अणुशक्तीही त्यातून वगळली जाणे शक्यच नव्हते.

प्रत्येक मानवप्राण्यात पूर्वपरंपरेने चालत आलेली पशूंची 'आक्रमक' प्रवृत्ती दडून राहिलेली असतेच. हीच प्रवृत्ती समूहात, मानवगटात, राष्ट्रात एकत्रितपणे 'लढाऊ उत्साह' म्हणून वेळोवेळी पुढे येत गेली. तिचा अतिरेक होऊ लागला व मानवगटात राष्ट्रा-राष्ट्रांत सत्तेची व श्रेष्ठत्वाची स्पर्धा सुरू झाली. हिंसक मार्गाने एकमेकावर वचक ठेवण्याचा प्रयत्न होऊ लागला. 'बळी तो कान पिळी' हे तत्त्व मान्य होऊ लागले व त्यामुळेच संहारक, अतिसंहारक अशी एकापेक्षा एक वरचढ व विध्वसक हत्यारे; शस्त्रे–अस्त्रे निर्माण होऊ लागली. म्हणूनच विसाव्या शतकात अण्वस्त्रधारी राष्ट्रांना समर्थ मानले जात आहे, ही वस्तुस्थिती स्पष्ट आहे.

कोणत्याही शक्तीचा उपयोग विधायक व विध्वंसक अशा दोन्ही प्रकारच्या कार्यांसाठी करता येतो आणि म्हणूनच भारतीय तत्त्वज्ञानात शक्तीला शिवाची–पावित्र्याची मर्यादा घातली गेलेली आहे. अणुशक्ती त्यास अपवाद नाही. शेतीउत्पादन, खनिजे, ऊर्जा इ. अनेक क्षेत्रात अणुशक्तीचा उपयोग करून मानव प्रगतीचा आणखी पल्ला गाठू शकेल हे सिद्ध झालेले आहेच; परंतु अणुशक्तीचा उपयोग करून विध्वंसक, संहारक असे अणुबॉंब व अणुयुद्धाचे गंभीर, भयंकर परिणाम यांची कल्पनाच डोके चक्रावून टाकत आहे. अणुशक्तीच्या विध्वंसक रूपाचेच परिणाम मानवजातीला भेडसावत आहेत. अशा भीतियुक्त तणावापेक्षा, गंभीर काळजीने मृत्यूच्या छायेतच सदैव रहाण्यापेक्षा मानवजातीचा विकास जरा सावकाश गतीने झाला तरी चालेल; परंतु ती शक्ती नको हाच विचार जोर धरू लागतो.

अणुबॉंब विरुद्ध 'माणूस' या वादात माणसाचीच बाजू घ्यावी लागेल. कारण परमेश्वराने निर्माण केलेली सुंदर वसुंधरा, सृष्टिसौंदर्य व प्राणिजीवन हेच महत्त्वाचे आहे. मानवाने शोधून काढलेली शक्ती नव्हे ! अणुयुद्धात मिळणारा विजय उपभोगायलाच कोणी जिवंत रहाण्याची शक्यता नाही. तेव्हा अणुबॉंबची बाजू घेताच येणार नाही.

अणुशक्ती व विध्वंसकता यांचं जोडलेलं नातं एकांगी असलं तरी अणुशक्तीच्या कल्याणकारी उपयोगापेक्षा तिची विध्वंसकताच अणुबॉंबमुळे प्रखरतेने नजरेत भरून येत आहे. कोणत्याही प्राण्याला आपला जीव सर्वांत प्यारा असतो हे सत्य एकदा मान्य केले तर "भीक नको पण कुत्रा आवर" या म्हणीप्रमाणे "माझा जीव मृत्यूच्या खुंटीला टांगून, मला कोणतीही प्रगती नको" असेच कोणताही मानवप्राणी म्हणेल ! म्हणूनच या वादात शेवटी मानवाचा "अधिक विकास, भौतिक प्रगती" यापेक्षा मानवाचे निव्वळ भवितव्य, जगणे, जगवणे' हेच श्रेष्ठ ठरणार आहे व खऱ्या अर्थाने मानवजातीचा विजय ठरणार आहे असेच अणुयुद्धाच्या महाभयंकर परिणामांकडे डोळे उघडे ठेवून बघितल्यास म्हणावे लागेल.

"शांततेसाठी अणुबॉंब' हे धोरण वरवर पाहता विसंगत वाटत नाही; परंतु राज्यकर्ते व अणुबॉंब बनविणारे शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ हेही शेवटी मानवच आहेत हे लक्षात ठेवलेच पाहिजे ! मानवाचे षड्‌रिपु काम, क्रोध, लालसा इ. त्याच्यातही राहाणारच. कोणतेही शस्त्र दुधारी असतेच असते. चांगल्या किंवा वाईट कार्याकरिता शस्त्राचा

उपयोग करणे हे त्या त्या परिस्थितीवर व निर्णय घेण्याच्या समतोल बुद्धीवरच अवलंबून राहील. राज्यकर्त्यांचा, शास्त्रज्ञांचा तोल ढळणार नाही, त्यांच्या हातून चूक घडणार नाही व अणुयुद्ध होऊ शकणार नाही अशी खात्री देता येणारच नाही. आता तर गणकयंत्रांच्या नियंत्रणात युद्धाची सूत्रे व अणुबाँब दिले जात आहेत ते निर्जीव यंत्र. त्याला मानव-जातीचे कल्याण काय कळणार? गणकयंत्राची क्षुल्लक चूकसुद्धा मानवजात नष्ट करून या पृथ्वीचे वाळवंटात रूपांतर करून टाकील!

शांततेसाठी अणुबाँबच पाहिजे असे काही नाही. राज्यकर्त्यावर्गाकडे असलेली सत्ता, पैसा, इतर शस्त्रास्त्रे, अन्य साधने वेळप्रसंगी सत्तास्पर्धेसाठी, प्रतिष्ठेसाठी वापरली जाऊन विध्वंसक युद्धे झालेली आहेत असा इतिहास आहे. मग विजयोन्मादासाठी, सत्तेसाठी, प्रतिष्ठेसाठी अणुबाँब वापरला जाणारच नाही यावर विश्वास कसा व का ठेवावा? 'शांततेसाठी अणुबाँब' या घोषणाचा नारा कितीही लावला गेला तरी त्यास सामान्य माणसाने बळी पडणे हिताचे ठरणार नाही. अण्वस्त्रे धारण करून जगात शांतता ठेवू पाहणारी राष्ट्रे एक प्रकारची चूकच करीत राहतील. कारण ती 'भीतियुक्त शांतता' राहील व अण्वस्त्रांच्या बाबतीत मात्र स्पर्धा सर्वत्र सदाकाळ चालूच राहील! स्पर्धेला अंत रहाणार नाही. आपण कोठे थांबावे ते राज्यकर्त्यांना व इतर महत्त्वाकांक्षी वर्गांना कळणार नाही व एकमेकाचा मिळून सर्वांचाच विनाश मात्र ही मंडळी ओढवून घेतील! म्हणूनच 'शांततेसाठी अणुबाँब' हे धोरण म्हणजे मानवजातीची घोर फसवणूकच ठरेल. जेथे प्रश्नच 'अखिल मानवजातीच्या जिवंत रहाण्याचा' निर्माण झालेला आहे तेथे शांततेसाठीसुद्धा अणुबाँब नको असेच म्हणावे लागेल. प्रकाशासाठी माकडाच्या हाती जळती मशाल देण्यासारखेच ते ठरेल!

विसाव्या शतकात अणुशक्ती ही निर्णायक शक्ती ठरत आहे हे खरे असले तरी आज युरोप-अमेरिकेत याविषयी जनमत प्रखरतेने जागृत होत आहे. युनो आमसभेच्या खास अधिवेशनाच्या वेळी न्यूयॉर्कला सात-साडेसात लाख स्त्री-पुरुषांचा अण्वस्त्रविरोधी मोर्चा काढण्यात आला. सर्वसामान्य जनतेला आता अणुयुद्धावर विचार करणे भागच आहे. त्यापासून पळून जाता येणार नाही. बुद्धिजीवी वर्ग आता जनतेस आवाहन करीत आहे. त्याना झोपेतून जागे करून "अणुयुद्ध तुमच्या दाराशी आले आहे", "राक्षसी महत्त्वाकांक्षेच्या शासनकर्त्यांना, शास्त्रज्ञांना आवरा!" असे सांगत आहेत व त्याचा परिणामही दिसून येत आहे. या चळवळी, अशा संघटना उत्तरोत्तर प्रबळ होत गेल्या पाहिजेत व हीच खरी जनमत संघटित करण्याची वेळ आहे.

तिसऱ्या देशांतील अविकसित देशांनी व भारतासारख्या विकसनशील देशानी अणुबाँब बनविण्यात श्रम, पैसा व वेळ घालविण्यापेक्षा, हिंसक शस्त्राच्या स्पर्धेत अडकण्यापेक्षा अधिक उदात्त भावनेने, राष्ट्रीयत्वाच्या सीमा पार करून 'हे विश्वचि माझे घर' या भावनेने अखिल मानवजातीच्या भवितव्याचा विचार करून विश्वबंधुत्वाच्या नात्याने अणुबाँबविरुद्ध आवाज उठविला पाहिजे. तशा प्रकारच्या चळवळींना मदत करून प्रोत्साहन दिले पाहिजे! युनोसारख्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर आशियाई देशाचा, गरिबांचा, दीन-दुबळ्यांचा आवाज उठविला पाहिजे. शेवटी जनमत हीच खरी सत्ता व शक्ती असते असे इतिहासाने वेळोवेळी सिद्ध करून दिलेले आहेच व हेच तत्त्व चार-सहा राष्ट्रप्रमुखाना मान्य करून जनतेसमोर मान तुकवावीच लागेल व विध्वंसक अणुबाँबचे या पृथ्वीवरून उच्चाटन करावेच लागेल.

नग्नावस्थेतील प्रोफेसर टाकेनाका यांच्या हातांतील 'भाताचो मूद' व नजरेसमोरील 'पाणी' हेच मानवी संस्कृती वाचविणार आहेत. एवढे एक आणि एकच सत्य सर्वांनी समजून घेतले पाहिजे व अणुबाँबविरोधी लढ्यात प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे भाग घेतलाच पाहिजे-मग ते शतक विसावे असो की पचविसावे! ◻

---

# अणुबॉंब : नैतिक अधिष्ठान नाही

**प्रा. नारायण केदार**
दहिवडी, जि. सातारा

---

अमेरिकेतील शिकागो विद्यापीठातील फुटबॉलच्या मैदानाच्या पश्चिमेकडील टोकास असलेल्या एका तांब्याच्या पाटीवर खालील अक्षरे कोरण्यात आलेली आहेत: 'या ठिकाणी २ डिसेंबर १९४२ रोजी स्वयंचलित शृंखला-प्रक्रिया (chain reaction) करण्यात मानवाने प्रथम यश मिळविले व नियंत्रित अणुशक्तीच्या निर्मितीस सुरुवात केली.' या साध्या पण चित्तथरारक शब्दात अणुशक्तिनिर्मितीच्या आपल्या प्रयोगाचे यश एनरिको फर्मी (Enrico Fermi) व त्याच्या सहकाऱ्यांनी नोंदले आहे. या प्रयोगानंतर अडीच वर्षांतच म्हणजे १६ जुलै १९४५ साली न्यू मेक्सिकोच्या ओसाड वाळवंटात पहिला अणुस्फोट करण्यात आला आणि नंतर तीन आठवड्यांनी ६ व ९ ऑगस्ट रोजी सर्व जगाला या संहारक आणि विध्वंसक शक्तीचे प्रत्यंतर दिसले! तीन लाख वस्तीचे जपानमधील हिरोशिमा शहर फक्त काही पौंड वजनाच्या अणुबाँबने बेचिराख करून टाकले! त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाला नवीन वळण प्राप्त झाले; परंतु या प्रयोगांना काही नैतिक अधिष्ठान आहे का? ही बाँबफेक आवश्यक होती का? याचा फारच थोड्यांनी विचार केला असेल! युद्धाच्या यातना संपवाव्यात आणि हजारो अमेरिकन तरुणांचे प्राण वाचावेत म्हणून आम्ही ही संहारकशस्त्रे वापरली असे प्रे. ट्रुमन या हल्ल्याचे समर्थन करीत असे. बहुसंख्य लोकांचे त्याने समाधानही झालेले असेल. आज ३७ वर्षांनी जेव्हा आपण या घटनेकडे शांतपणे पाहातो तेव्हा मनात अनेक प्रश्न उद्भवतात. अणुबाँब फेकणे हा केवळ लष्करी स्वरूपाचा निर्णय होता का, की त्याच्यामागे काही राजकारण होते? वास्तविक पाहता ज्या वेळी जपानवर हा निर्घृण हल्ला झाला त्या वेळी जपान हे राष्ट्र युद्धात पिचून निघाले होते. निकराने लढा देण्याचे त्राण त्याच्यात राहिले नव्हते. आता शरण केव्हा आणि कसे जायचे याचाच ते राष्ट्र विचार करीत होते. जपानवर अणुबाँब टाकण्यापूर्वी त्याच्या भयंकर परिणामाची कल्पना द्यावी अशी सूचनाही काही विचारवंतांनी अमेरिकेला केली होती. ९ ऑगस्टला

दुसरा बॉंब 'फॅटमॅन' अमेरिकेने नागासाकीवर टाकला. तत्पूर्वी अमेरिकेने थोडा धीर धरला असता तर कदाचित ४०,००० जपान्यांचे प्राण वाचले असते! मानवाला आज अणुबॉंबची जी भीती वाटते ती वरील अमेरिकेने केलेल्या चमत्कारामुळे!

ज्ञान ही शक्ती आहे; पण तिचा उपयोग जसा विधायक कार्यासाठी करता येतो, तसाच संहारकार्यासाठी करता येतो. येथे एका संस्कृत गोष्टीचा दाखला देणे बरे. एकदा एका कुटुंबातील चार भाऊ ज्ञान संपादन करण्यासाठी पृथ्वी धुडाळावयास सज्ज झाले आणि परत भेटण्याच्या अटीवर चारी दिशांना निघून गेले. कालांतराने ते चौघे एकत्र आले आणि प्रत्येकाने काय ज्ञान मिळविले याची चर्चा करू लागले. पहिला म्हणाला, 'मी असे ज्ञान संपादन केले की, ज्यायोगे मी हाडावर मांस निर्माण करू शकतो.' दुसरा म्हणाला, 'माझ्या ज्ञानाने मी त्या मांसावर कातडे आणि केस निर्माण करू शकतो.' तिसरा म्हणाला, 'अशा या प्राण्याला मी माझ्या ज्ञानबलाच्या योगे पाय देईन' यानंतर चौथा म्हणाला की, 'तुम्ही सर्वांनी आपल्या ज्ञानाच्या साहाय्याने प्राणी निर्माण केला, तर त्या प्राण्यास प्राण देऊन मी त्याला सजीव करीन.' अर्थात हे सर्व प्रयोगानिशी सिद्ध करणे असल्याने ते चारही भाऊ हाडाच्या शोधार्थ एका जंगलाकडे रवाना झाले. पहिल्याला हाड मिळाले; पण ते एका सिंहाचे निघाले. त्या हाडावर आपले ज्ञान पारखून पाहण्यासाठी त्यांनी प्रारंभ केला. पहिल्या तिघांनी हाडाचा प्राणी तयार केला. चौथ्याने मग त्याच्या नाकपुडीत प्राण सोडून त्याला जिवंत केले. सिंह तयार झाला आणि त्या सिंहाचा पहिला पराक्रम म्हणजे या चारी भावांचा संहार हा होय! चौथ्याने त्याला प्राण दिला तो सर्वांत मूर्ख ठरला! सिंहासारखा हिंस्र प्राणी निर्माण झाल्यानंतर केवळ आपले ज्ञान तपासून, पारखून घेण्याकरिता म्हणून चौथ्या भावाने त्या प्राण्याला प्राण दिले ही फार मोठी चूक ठरली. अणूच्या निर्मितीतून अशीच शोककारक घटना निर्माण होते की काय अशी साऱ्या जगाला भीती वाटू लागली आहे. ज्ञान हे हत्यार डोळसपणे वापरल्याखेरीज त्याचा योग्य तो उपयोग होणार नाही!

भारताने अणुशक्तीचा उपयोग शांततेच्या कार्यासाठी करावयाचे धोरण जाहीर केले आहे अणुचाचणीचा प्रयोग जरी भारताने अलीकडे केला असला तरी तो केवळ आपल्याला अण्वस्त्र निर्माण करता येते किंवा नाही हे पाहाण्यासाठीच प्रामुख्याने होता; परंतु या यशस्वी प्रयोगाने बड्या राष्ट्रांना धक्का बसला आहे. काही राष्ट्रांनी भारताविरुद्ध बराच कांगावा केला; पण प्रत्यक्षात भारताची प्रतिष्ठा या प्रयोगाने वाढली आहे. भारताने हा प्रयोग अगदी कमी पैशात आणि परकीय राष्ट्रांची कसलीही मदत न घेता केला हे त्याचे वैशिष्टय होय. जगातील प्रत्येक सार्वभौम राष्ट्राला जोपर्यंत आपले संरक्षण शक्तीवरच करावे लागणार आहे. तोपर्यंत अण्वस्त्रनिर्मितीची तीव्र इच्छा त्याच्या मनात राहाणार हे अगदी स्वाभाविक आहे. दुसरे राष्ट्र काय करीत आहे याबद्दल त्याच्या मनात सतत भीती राहाणार आहे आणि स्वतःचे अस्तित्व टिकविण्याकरिता ते राष्ट्र लष्करीदृष्टया समृद्ध होण्याचा प्रयत्न करणार. त्यामुळे अणुशक्तीवर नियंत्रण ठेवण्याचे व अण्वस्त्र–निर्मितीवर बंधने घालण्याचे प्रयत्न अयशस्वी झाले आहेत. अण्वस्त्रांचा विस्तार थांबविण्याची जर बड्या राष्ट्रांची प्रामाणिक इच्छा असेल तर त्यांनी कोणत्या तरी एका खंबीर धोरणाचा अवलंब केला पाहिजे. या बाबतीत दोन मार्ग सुचतात : नव्या राष्ट्रांच्या मनात भीती निर्माण करून किंवा दहशत बसवून त्यांना अणुनिर्मितीच्या कार्यापासून परावृत्त करणे किंवा बड्या राष्ट्रांनी स्वत वर काही बंधने लादून घेणे. यापैकी पहिला मार्ग प्रत्यक्षात उतरण्याची शक्यता फार कमी असल्याने दुसऱ्या मार्गाचा अवलंब करणे क्रमप्राप्त आहे. या बड्या राष्ट्रांनी इतर राष्ट्रांमध्ये असा विश्वास निर्माण केला पाहिजे की, अण्वस्त्राचा सध्याचा जो साठा आहे त्याचा वापर केला जाणार नाही आणि इतर राष्ट्रांच्या संरक्षणासाठी आणि विकासासाठी आपण प्रयत्नशील राहू बड्या राष्ट्राच्या आश्वासनांवर आपल्याला दीर्घकाळ विसंबून राहाता येईल अशी छोट्या राष्ट्रांची मनोमन खात्री पटल्याखेरीज सध्याचे भीतीचे सावट दूर होणार नाही. अर्थात अण्वस्त्रविरहित राष्ट्रांनीदेखील आंतरराष्ट्रीय पातळीवर अण्वस्त्रविरोधी मत निर्माण केले पाहिजे आणि जागतिक शांतता व सुरक्षितता यासाठी पोषक वातावरण निर्माण केले पाहिजे. छोटया राष्ट्रांनी बड्या राष्ट्रांवर संयुक्तपणे दबाव आणण्याचे प्रयत्न केल्यास अण्वस्त्रबंदी प्रत्यक्षात उतरण्याची शक्यता बरीच आहे. अण्वस्त्रे बनविणे प्रत्येक राष्ट्राला शक्य नाही. कारण यासाठी लागणारा पैसा आणि साहित्य प्रत्येकाला सहज उपलब्ध होणारे नाही. आपली राष्ट्रीय संपत्ती या कार्यासाठी वापरायचे ठरवले तर त्यांना आर्थिक विकासाला खीळ घालावी लागेल. ही राष्ट्रे अणुशक्तीच्या विकासाच्या कार्यात गुंतली तर बड्या राष्ट्रांचे आर्थिक साहाय्य आणि सहानुभूती त्यांना मिळणार नाही. जगातील ४० राष्ट्रे अण्वस्त्रे निर्माण करणारी झाली तर त्याचा जागतिक राजकारणावर काय परिणाम होईल याची कल्पना करणे कठीण आहे परस्पर राजनैतिक संबंधावर आणि आतरराष्ट्रीय तंटे सोडविण्यासाठी त्याचा काय परिणाम होईल हे सांगणेही अवघड आहे तटस्थपणाचा देखावा करून साम्राज्यवादी राष्ट्रे या परिस्थितीचा फायदा उठवतील. बड्या राष्ट्रांची मर्जी संपदण्याकरिता राष्ट्राराष्ट्रामध्ये चुरस निर्माण होईल. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सुरक्षिततेची परिस्थिती निर्माण करणे दुरापास्त होईल. अर्थात यातून काही चांगले निर्माण होण्याची शक्यताही नाकारता येणार नाही. जगात निर्माण झालेली अस्थिरता इतकी असह्य होईल की, एखादी सुसबद्ध अशी सुरक्षापद्धती निर्माण करणे अनिवार्य ठरेल!

अखिल मानवजातीचे भवितव्य शेवटी उच्चपदावर जी माणसे आज अधिष्ठित आहेत, त्यांच्यावरच अवलंबून आहे. विशेष संकटकाळी ही अधिकारी माणसे कशी वागतात यावरच सारे अवलंबून राहाणार आहे.

□

# ‘ उंबरठा ’

## तिचं घरात ‘ निष्क्रिय ’ वाटणं समजू शकतं, पण....

—मेधा देशपांडे

संगमवाडीच्या अनाथ महिलाश्रमात अधीक्षिकेचं काम करणाऱ्या सुलभा महाजनवर आश्रमाच्या मॅनेजिंग कमिटीनं काही आरोप ठेवलेले असतात. चौकशीसाठी वन–मॅन कमिशन नेमलं जातं. कमिशनचे अधिकारी सुलभा महाजनला विचारतात— ‘ घर सोडून संगमवाडीसारख्या गावात अनाथाश्रमाच्या अधीक्षिकेचं काम करण्यासाठी तुम्हा एकट्या का आलात ? संसारात काही अडचण ?’ या प्रश्नाला सुलभा महाजनने दिलेलं उत्तर आपल्याला अस्वस्थ, अंतर्मुख करतं, तेच ‘उंबरठा’चं सूत्र आहे सुलभा महाजन सांगते— ‘तशी मी संसारात ठीक होते, आर्थिकदृष्ट्या मला तशी गरजही नव्हती; पण माझ्या संसारात मला एखादं विशिष्ट स्थान नव्हतं.’ याआधीचा प्रश्न असतो, ‘ हे काम का स्वीकारलंत ?’ तर—‘समाजानं टाकलेल्या स्त्रियांच्या प्रश्नाबद्दल मला पहिल्यापासूनच आस्था होती आणि मला वाटतं, त्यांचे प्रश्न, त्यांच्या अडचणी यांच्याशी माझं नातं आहे.’

‘ उंबरठा’तली नायिका अशी वेगळी आहे. सुस्थितीतलं घर, आर्थिक सुबत्ता, यशस्वी नवरा, समाजसेविका म्हणून मान्यता मिळवलेली सासू, प्रेमळ दीर–भावजय आणि अगदी तिची मुलगी, ५।६ वर्षाची राणी इतक्या माणसाच्या गराड्यात राहूनही सुलभाचं गुदमरणं दिवसेंदिवस त्या घरात वाढतं आहे. तिचं घर, त्यातली माणसं तिला आपली वाटतात, तरीही ती त्यात विरघळून जाऊ शकत नाही. समाजशास्त्राची पदवी घेतल्यामुळं, त्यात प्राविण्य मिळवल्यामुळं तिला बाहेरच्या समाजाबद्दल आणि स्वत बद्दल एक भान आलेलं आहे. सुलभात निर्माण झालेलं सामाजिक जाणिवेचं भान तिला घरातल्या इतरांपासून वेगळं करतं. परिणामी तिचा नवरा (सुभाष–गिरीश कर्नाड) ‘ तू समाजशास्त्राची पदवी घेतल्यापासून फार शिष्ट झाली आहेस.’ असं म्हणतो.

सुलभात होत असलेल्या बदलाबद्दल सुलभाचा नवरा ढोबळ मानानं ‘ शिष्ट ’ हा शब्द वापरतो; पण तिनं त्यांच्या संसारात लावलेल्या परकेपणाच्या सुराची त्याला जाणीव आहे. तिला त्या घरात ‘ निष्क्रिय ’ वाटतं, त्याबद्दल आपण काही तरी करायला हवं, असं त्याला मनापासून वाटतं. ‘ तू आईच्या समाजकार्यात मन रमव, तिला कोणा तरी ‘ ट्रेंड ’ माणसाची गरज आहेच ’ असा तो त्याच्या परीनं पर्याय सुचवू पहातो. सुलभाची अडचण वेगळी आहे. सामाजिक प्रश्नांबद्दल विचार करण्याची तिची स्वतःची एक भूमिका मनात ठरली आहे, ज्याबद्दल तिला विश्वास वाटतो. आपली वैचारिक भूमिका आपल्या सासूच्या कामात रुजू शकणार नाही हे तिला पक्कं माहीत आहे. किंबहुना तिची सासू समाजकार्य ज्या पद्धतीनं करते त्याबद्दल तिला आस्थाच नाही. सुलभाचं त्या घरातलं उपरेपण असं क्रमाक्रमानं वाढत जातं. सुलभाचा नवरा यशस्वी वकील आहे नवरा म्हणून त्याच्याबद्दल तिला आदर वाटत असला तरी सामाजिक प्रश्नांच्या केसबाबत उदाहरणार्थ बलात्कार, जिथे गुन्हा ढळढळीत दिसत असतो, तिथे फक्त वकिलीबाणा चालवून केस फिरवून गुन्हेगाराची बाजू घेणाऱ्या नवऱ्याबद्दलही तिच्या मनात एक तीव्र चीड आहे.

संगमवाडीच्या अनाथ महिलाश्रमात अधीक्षिकेची घरच्या घरी चालून आलेली नोकरी सुलभा स्वीकारायचं ठरवते तोपर्यंतचे टप्पे सिनेमात अतिशय प्रभावीपणे स्पष्ट होतात.

सुलभाला घरापासून लांब, तिच्या आवडीच्या कामासाठी जाऊ देण्यासाठी सुभाष अनिच्छेनं पण समजुतदारपणे परवानगी देतो. त्याच्या आईजवळ तो सुलभाची ‘ बाजू ’ माडतो. सुलभा त्याबद्दल कृतज्ञ आहे. ती त्याचे आभार मानते तेव्हाही, ‘ मी जे आईला बोललो ते मला पटतंय असं नाही. मी फक्त तुझी ‘ केस ’ मांडत होतो,’ असं तिला स्पष्ट बजावतो. तिला जाऊ देण्यातली त्याची भूमिका लोकांच्या दृष्टीनं मूर्ख ठरलो तरी चालेल; पण बायकोच्या नजरेत दुष्ट ठरू नये अशीच असते.

सुलभा संगमवाडीला जायला निघते तेव्हापासून सिनेमात सुलभा आणि तिचं आश्रमातलं जग हे दुसरं आयुष्य सुरू होतं. एका सुरक्षित घरातून बाहेर पडल्यापासून ती दुसऱ्या जगात सुरक्षित जागा मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू करते. घरातली संसारी सुलभा आणि आश्रमातल्या अधीक्षिकाबाई अशा दोन स्वतंत्र व्यक्तिमत्त्वांचा उत्कट आविष्कार चित्रपटात आहे.

आश्रमाचं स्वरूप तिच्या अपेक्षेपेक्षा खूप वेगळं, अस्वस्थ करणारं आहे. समाजानं नाकारलेल्या आश्रमातल्या मुलींचं दुःख, त्या दुःखाचं बेडर प्रदर्शन, बाहेरच्या रंगीत जगाबद्दल प्रचंड कुतूहल आणि ते मिळत नाही म्हणून निर्माण होत असलेल्या मानसिक, शारीरिक विकृती बघून ती सुन्न होते; पण खचत नाही.

आश्रमात वडलांची मदत नाकारणारी ‘ उत्पला ’ आहे, पोटच्या तरुण मुलीनं प्रत्यक्ष सावत्र बापाशी संधान बांधल्यामुळं रस्त्यावर आलेली ‘ कमळाबाई ’ आहे, म्हाताऱ्या नवऱ्याचा तिरस्कार करणारी, प्रियकर शिवचरणचं नाव लावणारी ‘ सुभद्रा ’ आहे. उर्मट ‘जास्वंदी’ आहे. प्रत्येकीचे प्रश्न वेगळे! कुणी लहान वयात वाडीतल्या २।४ मुलानी बलात्कार केल्यामुळं वेडी झालेली आहे, कुणी पैशासाठी स्वखुशीनं स्वतःला विकून घेतलं आहे. या बेघरांच्या आयुष्यात सुलभा स्वतःला झोकून देते. जणू तिच्यातली समर्पणाची भावना अशी राखूनच ठेवलेली असते.

सुलभा आश्रमात जितकी गुंतू पहाते तितकी आश्रमातल्या गैरव्यवहाराबद्दल समजदार होते. बाहेरच्या प्रस्थापित जगाचे आतल्या सडलेल्या जगाशी असलेले हितसंबंध बघून तिला किळस येते. तिला हे सगळं मोडून काढायचं असतं. तिची शक्ती म्हणजे तिचा सच्चेपणा, अनाथ महिलांच्या पुनर्वसनाची प्रामाणिक तळमळ आणि आश्रमातल्या किडलेल्या मनातील चांगुलपणावर विश्वास ! सुलभाचा आश्रमातला प्रवास असा खडतर आहे. व्यवस्थापकीय निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य सुलभाला नाही. आश्रमाच्या मॅनेजिंग कमिटीचे सदस्य, त्यांचा ढोंगीपणा आणि चेअरमनबाईंच्या पुनर्वसनाच्या निष्ठुर पद्धती, या सर्वांविरुद्ध सुलभा उभी रहायला बघते.

सुलभा प्रयत्न करते ते अटीतटीनं ! आश्रमातली अंतर्गत शिस्त जरा पकड घेते, आश्रमातल्या मुलींचा विश्वास सुलभाला मिळतो, त्याच वेळेला आश्रमातून पळून गेलेल्या आणि नंतर डांबून ठेवलेल्या दोन

मुली स्वतःला जाळून घेतात. या गंभीर प्रकरणाची पार्श्वभूमी लक्षात घेण्यासारखी आहे. स्वतःच्या जबाबदारीवर सुलभा एका मुलीचं तिच्या प्रियकराशी पुन्हा लग्न लावून देऊन तिला चांगल्या जगण्याची संधी देते. सुभद्राच्या शिवचरणला शोधून काढण्यासाठी स्वतःच्या अधिकारात प्रयत्न करते. बाहेरच्या जगाचे घाणेरडे हितसंबंध सुलभा स्वतःच्या अधिकारात नाकारते, तुच्छपणे त्याची हेटाळणी करते. कमिटीचे सदस्य आणि चेअरमनबाई यांच्या अभिमानाला असे तडे जात असताना दोन मुलींच्या आत्महत्येचा अर्थातच गवगवा होतो. आश्रमाच्या कारभाराविषयी विधानसभेत चौकशी होते. वन–मॅन–कमिशन नेमलं जातं.

'तुम्ही डोळ्यासमोर आणलेलं आश्रमाचं चित्र आणि इथलं प्रत्यक्ष चित्र यात काही तफावत आहे असं तुम्हाला वाटतं का?' असा प्रश्न त्या अधिकाऱ्यानं विचारताच सुलभा असह्यपणे बोलत सुटते. सार्वजनिक संस्था इतक्या वाईट पद्धतीनं चालवल्या जातात याबद्दल चीड, आश्रमातल्या मुलींच्या प्रश्नाबद्दल कमिटी सदस्यांना असणारी अनास्था, त्यांच्या मदतीनं चालणारे आश्रमातले गैरकारभार, अशा सार्वजनिक संस्थांवर डोळा ठेवून असणारी बाहेरची लाचखाऊ माणसं, छोट्या छोट्या आकर्षक वस्तूसाठी स्वतःला विकून घ्यायला तयार असलेल्या तिथल्या मुली, त्यांना तसं करायला भाग पाडणारे बाहेरचे उच्चभ्रू जग आणि वापरून टाकाऊ झाल्यावर परत आश्रमाच्या सडक्या, बंदिस्त इमारतीत त्यांना आणून फेकणार विकृत समाजमन...सुलभा बोलत जाते. तिचा उद्वेग, कळकळ डोळ्यातल्या पाण्याबरोबर वाहून जाते. चौकशीसाठी आलेल्या अधिकाऱ्याला सुलभा ठामपणे बजावते, 'काहीही झालं तरी मी खचणार नाही!' अधिकारी तिला विचारतो, 'प्राप्त परिस्थितीत तुम्हाला हे फार romantic वाटत नाही का?' त्याला उत्तरही सुलभा तितक्याच रोमँटिकपणे देते 'मग प्राप्त परिस्थितीच बदलायला हवी!'

संस्थेच्या अधीक्षिकापदाचा राजिनामा देऊन सुलभा पुन्हा एकदा तिच्या घराकडे येते. ती थोडी खचलेली आहे; पण ज्या पद्धतीनं तिला अनेक अनुभवांना तोंड द्यायला लागलेलं आहे त्यामुळं ती पहिल्यापेक्षा अधिक ठाम, समंजस 'मॅच्युअर्ड' वाटते.

घरात सुलभाचं स्वागत कमालीच्या थंडपणे होतं घरात नव्यानं लागलेली नोकर तिला 'कोण पायजे? कोणाला भेटायचंय?' असं विचारते. सासू समाजकार्यात गुग असते. सुलभाचं स्वागत करायला तिला फुरसत नसते, खरं तर तशी इच्छाच नसते. राणी दोन वर्षांच्या कालावधीत तिला पूर्ण परकी होते. त्रयस्थपणे तिच्यापासून दूर पळून जाते. शेवटी राहिला प्रत्यक्ष नवरा, तो अनुत्सुकपणे, 'तू एक-दोन दिवस आहेस नं?' अशी जुजबी चौकशी करतो. त्या घरातला परकेपणा अधिक गडद झालेला असतो.

ती घरात कायमसाठी आली आहे हे लक्षात येताच सुभाष तिच्या गैरहजेरीत त्याच्यात झालेल्या काही बदलांची तिला स्पष्ट जाणीव देतो. त्याच्या फक्त स्वतःच्या गरजेसाठी त्याच्या आयुष्यात एक बाई आलेली असते. (त्याची सारवासारव – nothing very serious, nothing emotional...) सुलभा परत आल्यामुळं तिच्याशी असलेले संबंध तोडणं त्याला अशक्य होणार असतं. तो म्हणतो, 'आपण अजूनही पूर्वीसारखेच असू शकतो. तुझं घरातलं स्थान तेच राहील; पण ही लहानशी 'अ‍ॅडजस्टमेंट' तुला समजून घ्यायला हवी. मी तुझी गरज ओळखली; तू माझी ओळखशील अशी खात्री आहे.'

सुलभा या क्षणी मोडून पडते, उन्मळून रडत रहाते. दुसऱ्या दिवशी पहाटे परत एकदा बॅग भरण्याची तयारी करते. सुभाष विरोध करतो; पण पूर्वीइतक्या अटीतटीनं नाही. तुला परत इथंच यावं लागेल असा धोक्याचा इशारा मात्र देतो. 'सवयीनं त्रास कमी होईल' असं समजावतो.

बाहेरच्या लॉजवर राणीसकट सगळे चहा घेत असताना सुलभा खिडकीतून त्रयस्थपणे बघत रहाते. नजर निर्णय झाल्याप्रमाणे ठाम. राणी पक्ष्याच्या पिलाचं गाणं म्हणत असते–पिलू उडायला बघत असतं, आई सांगते तुझ्या पंखात जरा बळ येऊ दे. पंखात बळ येतं मग–पिलू उडून जातं...

मोकळ्या, मुक्त मनानं श्वास घेत सुलभा घराबाहेर पडते.

□


पडद्यावर 'समाप्त'ची पाटी येते. सुलभानं स्वीकारलेलं भविष्य अस्वस्थ करून जातं; पण तिचा निर्णय चुकीचा वाटत नाही. आज ना उद्या सुलभा त्या घरातून बाहेरच पडणार होती असंच वाटत राहातं. सुभाष दुसऱ्या स्त्रीमध्ये गुतला नसता तरी ती घरात राहूच शकली नसती. जब्बारनं ज्या पद्धतीनं संपूर्ण चित्रपटात सुलभा उभी केली आहे तिचा शेवट सुलभाच्या अशा बेघर होण्यातच आहे.

संपूर्ण चित्रपट दोन पातळीवर चालू रहातो. सुलभाचं वैयक्तिक जीवन, त्या संदर्भातलं तिचं भावविश्व आणि अनाथ आश्रमातलं विश्व, या दोन पातळीवर विचार करताना चित्रपटाच्या अखेरीला सुलभाच्या वैयक्तिक दुःखापेक्षा (बेघर होण्याच्या) अनाथ आश्रमातल्या बेघर बायकांचं व्यापक दुःख अधिक पकड घेतं. सुलभाचं वैयक्तिक आयुष्य झाकोळून टाकतील असे परखड विदारक अनुभव आश्रमाच्या दगडी भिंतीत घडतात. वैयक्तिक दुःखापासून सुरू झालेली कथा सामाजिक दुःखाकडे जाते. जब्बारच्या दिग्दर्शनाचा हाच हेतू असेल असं मात्र वाटत नाही

चित्रपटाची पटकथा आणि संवाद लिहिले आहेत तेंडुलकरांनी! उंबरठा बघितल्यावर 'बेघर' आणि 'पंखांना ओढ पावलांची' पुन्हा एकदा वाचून काढलं. 'उंबरठा' पाहिल्यानंतर जी अस्वस्थता येते त्याचं श्रेय जितकं स्मिता पाटीलला, जब्बारला आहे तितकंच ते तेंडुलकरांच्या संवादांना आहे. इतके नेमके आणि स्पष्ट व्यक्त होणारे सवाद मराठी सिनेमात ऐकायची आपल्याला सवय नसते. या संवादांना जब्बारनं शोधलेल्या जागा सूचक आहेत. सुलभा संगमवाडीला जाण्यासाठी प्रथम घरातून बाहेर पडते, त्या वेळी सासूला भेटायला तिच्या खोलीत जाते. सासू डिक्टेशन थांबवून तिला, 'प्रकृतीला जपा' असं रुक्षपणे सांगते. डिक्टेशन पुन्हा सुरू... 'बाकी मदत आम्ही करू; पण इमारतबांधकामासाठी आर्थिक निधी तुम्हांलाच जमवावा लागेल.' आश्रमातून सुभाषला पत्र लिहिताना 'इथे सगळा आनंद आहे' असं खोडून 'मी आनंदात आहे' अशी सुलभानं बदललेली वाक्यरचना, अशा कित्येक सूचक जागा चित्रपटात आहेत. आश्रमातल्या मुलींचे संवाद परिणामकारक आहेत.

जब्बारचं दिग्दर्शन आणि राजन किणीचा कॅमेरा खरोखर दाद द्यावा असा आहे. पात्रांची निवड अचूक आहे. आश्रमातल्या उर्मट गेटमनची निवड तर लक्षात रहाण्याइतकी चांगली आहे. मनोरमा वागळे, दया डोंगरे, स्वरूपा खोपकर यांच्या निवडीबद्दलही असंच म्हणता येईल.

जब्बारच्या दिग्दर्शनाला, तेंडूलकरांच्या संवादांना योग्य मान देऊनही 'उंबरठा' स्मितानं साकार केला आहे अशी स्पष्ट कबुली द्यायलाच हवी. सुलभाच्या वेगवेगळ्या छटा तिनं इतक्या छान व्यक्त केल्या आहेत! सुभाषच्या घरात तिला जाणवणारं परकेपण तिच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वातून बोलत राहातं. घरातली तिची थंड, लयबद्ध चाल, डोळ्यातली दूरस्थ जाणीव, संवादातला शुष्कपणा



शिवचरणने सचमुच शादी कर ली बाईजी ?

आणि आश्रमातलं तिचं कणखर व्यक्तिमत्त्व, बोलण्यातली दगडी जरब, आश्रमातल्या गैरकारभारांबद्दलची किळस आणि मुलींच्या पतित आयुष्याबद्दल प्रामाणिक ममत्व, असहाय्य एकटेपणात सावरण्याची तिची धडपड, आश्रमातून फोनवरून घरी बोलण्याचा सुलभाचा प्रयत्न, जिवाचे कान करून आवाज ऐकण्याची धडपड आणि ‘मी बरी आहे, तुम्ही कसे आहात? राणी कशी आहे? तिला माझी आठवण येते का ?’ असं काकुळतीनं ओरडून विचारणारी सुलभा. स्मिता पाटीलनं सुलभाच्या व्यक्तिरेखेत कमाल केली आहे. स्मिताच्या अभिनयात अभिनिवेष नाही. फिल्मी कृत्रिमपणा नाही. संवादांवर तिची हुकमत आहे, अभिनयात एक समंजस मोकळेपणा आहे. तिनं साकार केलेली सुलभा पहाताना वाटतं, स्मितामध्ये ही सुलभा आहेच. फक्त जब्बारनं ती समोर ठेवली. तेंडुलकरांचे संवाद तर तिला डोळ्यांसमोर ठेवूनच लिहिले आहेत.

चित्रपटात फक्त काळे–पांढरे रंग नाहीत. या रंगांजवळच्या अनेक अस्पष्ट रंगछटा चित्रपटातल्या व्यक्तिरेखांमध्ये आहेत. म्हणूनच सुभाष (गिरीश कर्नाड) चा रोखठोकपणा–‘मी कोणाच्या मधे येत नाही, माझ्यामध्ये कोणी येऊ नये’ ही त्याची वृत्ती समजू शकते. सुलभाची सासू ‘स्युडो’ वाटते; पण खोटी वाटत नाही. प्रत्येक व्यक्तिरेखेला एकच एक रंग देऊन कॅरॅक्टर उभे करण्याचे अगर पाडण्याचे फसवे प्रयत्न यात नाहीत. सुलभा महाजन आणि भारतीय संस्कृती तोलणारी स्त्री यांचं नातं तसं दूरचंच; पण तिचा घरातला अलिप्तपणा आणि ‘निष्क्रिय’ वाटणं जब्बारनं लादलेलं वाटत नाही.

शांता निसळ यांच्या मूळ ‘बेघर’ कादंबरीवर आधारित हा चित्रपट. कादंबरीत सुलभा तावून–सुलाखून परत घराकडे येते. ती तिची गरज ठरते. सिनेमा पाहिल्यावर परत कादंबरी वाचली तेव्हा कादंबरीचा शेवट अगदी मिळमिळीत वाटतो. जसं घडलं तसं लिहिलं असल्यामुळं ते असेल कदाचित! सिनेमातल्या अनुभवांना आलेला प्रखर टोकदारपणा ही जब्बारनं आणि तेंडुलकरांनी ‘बेघर’ मधे घातलेली भर !

उंबरठ्याबाहेर पडलेली स्त्री हे उद्याच्या आपल्या समाजाचं प्रतीक होणार आहे. आर्थिक गरज म्हणून घराबाहेर पडलेली स्त्री आणि फक्त व्यक्तिविकासासाठी घर सोडायला तयार असणारी ते करू शकणारी स्त्री असं त्याचं सरळ वर्गीकरण करता येईल. घरातल्या स्त्रीनं बाहेर पडणं ही जेव्हा संपूर्ण कुटुंबाची गरज असते तेव्हा अपेक्षित तडजोडी कुटुंबातल्या माणसांना स्वीकाराव्याच लागतात. संघर्ष कमी करण्याचा दोन्ही बाजूंनी प्रयत्न केला जातो. फक्त स्वतःला घडवण्यासाठी स्त्रीनं घराबाहेर पडणं आपल्याला अजून पटत नाही. जब्बारनं हे समजून घ्यायचा बराच प्रयत्न केलाय तरीही, सुलभाचं दुःख म्हणूनच प्रातिनिधिक पातळीवर जाऊ शकत नाही.

फक्त स्वतःला घडवण्यासाठी सुरक्षित, भौतिकदृष्ट्या समृद्ध जीवन नाकारण्याचा विचार मनानं प्रगल्भ असलेल्या किती मुली आज करू शकतील ? बंदिस्त कोंडवाड्यांना सुरक्षितता समजणाऱ्या आजच्या आपल्या समाजात सुलभाचं दुःख अपवादात्मकच असू शकतं. कादंबरीतल्या बेघरची नायिका हे समजून आहे. राजिनामा दिल्यानंतर नवीन अधीक्षिकाबाईंना ती म्हणते, ‘मला तुमच्यासारखं होता आलं असतं तर किती बरं झालं असतं ! मला फक्त प्रखर ध्येयवाद आणि त्यानं होरपळून जायचं माहीत आहे.’ या पार्श्वभूमीवर ‘बेघर’ मधील सुलभाचं घराकडे परत जाणं वास्तववादी वाटतं. चित्रपटातली सुलभा मात्र जास्त रोमॅंटिक वाटते. समाजशास्त्राची पदवी घेऊनही समाजाचं योग्य भान नसलेली !

स्त्रीचा व्यक्तिविकास, त्यासाठी घराबाहेर पडायला लागणं आणि त्यामुळं कौटुंबिक जीवनाची वाताहात, होरपळ असं काहीसं चुकीचं समीकरण ‘सावित्री’सारख्या नाटकातून पुढं येत आहे. अनेक शक्यतांपैकी ती एक असते हे निश्चित! उंबरठामध्ये स्वतंत्र, प्रगल्भ ‘स्त्री’चं भावविश्व समजून घ्यायचा जब्बारनं बराच प्रयत्न केलाय. कोणतीही ठाम भूमिका न घेणारा तेंडूलकरी शेवट यात नाही. स्त्री-सामर्थ्याचा वेगळा आविष्कार यात आहे.

‘उंबरठा’ बघून का अस्वस्थ वाटतं ?

टोकाचा आदर्शवाद रुजू शकत नाही; पण तशी प्रामाणिक तळमळ असणं हा काही सामाजिक गुन्हा नाही; नसावा. आदर्शवादाचा शेवट करणं–न करणं शेवटी ज्याच्या त्याच्या कुवतीवर आहे.

‘मी खचणार नाही !’ असं सुलभा म्हणते ते तरी कशाच्या जोरावर ?

□